शनिवार । ५ सप्टेंबर १९८१ । एक रुपया

साप्ताहिक माणूस

# बुद्धिवंतांनो, नका निराश होऊ

## अंतुलेसाहेबांनी मोठ्या मनानं संध्याकाळीही फोटो करता वेळ द्यायचं ठरवलं आहे....

कुठल्याही घटनेवरची किंवा बाबीवरची प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे निरनिराळे प्रस्थापित मार्ग आहेत. त्यावर सरळ टीका करता येते, त्याचा उपहास करता येतो किंवा सरळ सरळ त्याचा अनुल्लेख करून, त्याची उपेक्षा करूनही आपलं मत व्यक्त करता येतं. मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहात गेल्या २२–२३ ऑगस्टला भरलेल्या 'नॅशनल कन्व्हेन्शन ऑफ इंटलिजेन्शिआ' या कार्यक्रमाची संभावना मुंबईतल्या प्रमुख वर्तमानपत्रांनी अनुल्लेखांनी केली असावी. पण केवळ अनुल्लेखांनी काही साधतंच असं नाही. कारण मग त्या कन्व्हेन्शनविषयी तुमच्यापर्यंत काही पोचलंच नसतं. या देशातला तथाकथित बुद्धिवंत कसा डबघाईला आला आहे आणि त्याचं नैतिक अधःपतन कुठल्या रसातळाला पोचलं आहे याचा जिवंत सोहळा म्हणजे हे कन्व्हेन्शन.

विचारात भोंगळपणा आणि आचारात सत्तेपुढे लाळघोटेपणा ही या कन्व्हेन्शनची वैशिष्टये. ऑल इंडिया कॉन्फरन्स ऑफ लॉयर्स ऊर्फ वकील बुद्धिवंतांनी जरी ती भरवलेली असली तरी ही सर्व प्रकारच्या बुद्धिवंताना खुली असल्याचं एक उदार आश्वासन देण्यात आलं होतं. दोन दिवसांच्या ह्या कार्यक्रमाची तयारी पुष्कळच दिवसांपासून चालली होती. मुंबईतल्या नेमक्या मोक्याच्या जागा हेरून तिथे निळे कापडी बॅनर्स लावलेले होते ते केव्हापासूनच. आपले काही उद्देश आणि ध्येयं (असं आपलं मानायचं) या कन्व्हेन्शनवाल्यांनी जाहीर केली होती खरी; पण मला तर या तात्त्विक, वैचारिक बैठकीचा पत्ताच लागला नाही! या कार्यक्रमाच्या निमित्तानं जी स्मरणिका काढली आहे, त्यात ह्या कन्व्हेन्शनची आणि वकिलांच्या कॉन्फरन्सची उद्दिष्टे स्पष्ट मांडली आहेत. परस्परविरोधी आणि विस्कळीत विचारांचा याहून प्रभावी नमुना दुसरा सापडणं कठीण! पहिला परिच्छेद म्हणतो, 'ही कायम स्वरूपाची संघटना आहे आणि हजारो माणसांच्या उत्स्फूर्त निर्णयातून या संस्थेचा उदय झाला.' हजारो लोकांचा हा उत्स्फूर्त बाजार ह्याआधी दिल्लीला भरला होता हे सांगायला नकोच. 'या संघटनेचे कुठल्याही राजकीय पक्षाशी काहीही लागेबांधे नाहीत, पण म्हणून जगातल्या बाकीच्या तटस्थ संघटनांप्रमाणे ही संघटना निष्क्रीय नाही. भारताची लोकशाही, एकता, समता, निधर्मीपणा, भारताचं बळ आणि स्थैर्य इत्यादी गोष्टींशी या संघटनेची बांधिलकी आहे.' ठीक आहे; उत्तमच आहे. पण लगेच खालच्या परिच्छेदात या बांधिलकीचं व्यवहार्य स्वरूप प्रकट होतं. आमची निष्ठा आणि नीतीमत्ता, आमचं धैर्य म्हणजे काय आलतूफालतू समजलात तुम्ही! 'या देशात अशीही माणसं आहेत की जी तोंडानं लोकशाहीचा पुरस्कार करतात, पण प्रत्यक्षात ज्यांनी लोकसभेतून इंदिरा गांधींच्या हकालपट्टीचा पुरस्कार केला कायदा आणि घटना या नावाखाली इंदिराजी आणि त्यांच्या निष्पाप कुटुंबियांवर नाना आळ आणले. (अरे, कुठे फेडाल ही पापं!) आम्ही नाही हो पण त्यातले!' इंटेलिजन्शिआंच्या वरकरणी मुखवटयामागचा भेसूर भगताचा चेहरा एवढ्या चटकन् उघडा पडला. बांधिलकीचे असले अर्थ अभिप्रेत असलेल्या बाजारू बुद्धिवंतांनी राष्ट्रीय बुद्धिवंत यासारखी व्यापक अर्थाची विशेषणं स्वतःला लावून घेणं यासारखं संतापजनक दुसरं काही नसेल!

पण स्मरणिका आणि त्यातले लेख यात तरी गांभीर्य होतं, असं प्रत्यक्ष मेळावा सुरू झाल्यावर वाटलं. स्मरणिकेनं राखलेला कचकडी आब, कन्व्हेन्शनच्या प्रथम दर्शनी पार मोडून तोडून पडला. समारंभाचे उद्घाटक मुख्यमंत्री अंतुले. अध्यक्षीय भाषण म्हणजे अंतुले–स्तुतीच्या नव्या नव्या वाटा शोधायची धडपड होती. 'अंतुलेसाहेब, आम्हा सर्व वकिलांमध्ये तुम्ही केवळ एकमेवाद्वितीय आहात. वकिल म्हणून तुम्ही नसेल केली प्रॅक्टिस फारशी; पण म्हणून काय झालं? तुम्ही केली असतीत प्रॅक्टिस तर सर्वांत थोर वकील तुम्हीच ठरला असतात!'

या मेळाव्याचा उद्देश आहे की, देशातल्या सर्व बुद्धिवंतानी एकत्र यावं. (मार्क्सनंतर हीच हाळी ऐतिहासिक ठरणार!) प्रसंगच मुळी तसा आला आहे आज. स्वातंत्र्य मिळालं देशाला त्याला आज ३४ वर्षं झाली; पण आतापर्यंत एवढा गहन प्रसंग कधी आला नव्हता; पण आता अमेरिकन सरकारनं आपलं धोरण बदललं आहे. पाकिस्तानला मोठ्या प्रमाणात अद्ययावत शस्त्रांचा पुरवठा केला जातो आहे. याच्या समर्थनासाठी

➔

जी कारणं दिली आहेत ती अगदीच तकलादू आहेत. खरं म्हणजे पाकिस्तानला आपलं लष्करी ठाणं करून सगळा आशियाखंड गिळंकृत करायचा दुष्ट अमेरिकेचा हा फार मोठा कट आहे. परिस्थिती इतकी बिकट आणि त्यात आमचे विरोधी पक्ष. ते तरी बिचारे काय करणार म्हणा ! लोकांनी त्याना साफ झटकूनच टाकलंय; पण त्यांनी आता शहाणं व्हायला हवं. अरे, नेहरूघराण्यानं या देशासाठी जे केलं आहे, ते आजवरच्या जगाच्या इतिहासात कुणी कोणासाठी केलेलं नाही; पण आमच्या विरोधी पक्षांना अक्कल येईल तर ना ! यानी तर देश अगदी वाटवूनच टाकला आहे ! शिव, शिव, काय होणार या देशाचं ! बुद्धिवंतानो, नका अशी पाठ फिरवू या देशाकडे. या, आपण एकत्र जमू या, देशाला गरज आहे आपल्या बुद्धीची !'

बिचारे बुद्धिवंत. कोण ही चिंता. सतत काळीज पोखरणारी. देशापुढे घोर प्रसंग आलेला असताना बुद्धिवंतांनी खरं म्हणजे कसं लांब, सुतकी चेहरे करून वावरायला हवं. चष्म्यावरून विषण्ण कटाक्ष टाकून, सुस्कारे सोडत गंभीर कुजबुजत्या आवाजात चर्चा करायला पाहिजेत; पण षण्मुखानंदमध्ये जमलेल्या बुद्धिवंतांचा असला आचारविचार दिसत नव्हता. अर्थात त्याच्या अशा आचारामागची तात्त्विक वकिली भूमिका तुम्हा-आम्हा सामान्यांना काय कळणार म्हणा !

षण्मुखानंदसारखा मुंबईतला मोठ्यातला मोठा वातानुकूलित, अलिशान हॉल दिमतीला तोही फूलमाळा, हार, गजरे लावून नव्या नवरीसारखा "नटवलेला. राष्ट्राच्या चिंतेनं बुद्धिवंत एवढ्या प्रचंड संख्येनं आले होते की, हॉलबाहेरही जिकडे-तिकडे ते सांडले होते. त्यांच्या सुरक्षेला बाहेर पोलीस ! महाराष्ट्र राज्य माहिती आणि जनसंपर्क संचनालयाची गाडीही इमानदारपणे उभी. आणखीही एक उल्लेखनीय दृश्य. वाईला सध्या म्हणे कृष्णाकाठचा परिसर हजारो पोपटांच्या थव्यांनी भरून गेला आहे ! इथे, परिसरात नजर पोचेल तिथपर्यंत महाराष्ट्र राज्य परिवहनाच्या लालचुटुक बसेस उभ्या ! प्रांतोप्रांतीच्या बुद्धिवंताना या परिवहनाच्या गाड्यांनीच आणलं असावं आणि बसेससुद्धा कशा ? तुम्हा-आम्हाला प्रवासाला मिळतात तसल्या नाहीत. त्यांच्या खिडक्या गंजक्या असतात, पाठी उसवलेल्या, छपरं गळकी असतात, रंगाचा नक्की पत्ता तर अंदाजानं लावायचा; पण या बुद्धिवंतांच्या बसेस मात्र कोऱ्या करकरीत आणि एवढ्या लांबवरच्या प्रवासानंतरही टवटवीत दिसणाऱ्या ! या बुद्धिवंत बसेस दोन दिवस कन्व्हेन्शनकरता देण्यात आल्यामुळे सामान्य जनतेची गैरसोय झाली असली तरी, उज्ज्वल भवितव्यावर नजर ठेवून, राष्ट्र संकटात आहे, त्याखातर ही गैरसोय त्यांनी सहन करून घ्यावी. कारण याचा अर्थ समजण्याइतकी अक्कल तरी त्याना कुठे आहे ? राष्ट्रपतींनी युवराजांच्या लग्नाकरता लंडनला भेट दिली आणि प्रचंड खर्चही केला; पण या सगळ्या 'आतर: काऽपि' हेतू असतात ते नाही समजायचे विरोधकांना आणि संपादकाना. त्यांनी अडाणी आणि असांसदीय गदारोळ उठवला. त्याच नशीबच फुटकं म्हणायचं !

आत भाषणं चालू असताना बुद्धिवंत बाहेर थव्याथव्यानं साचले होते. कुणी चहा–कॉफीच्या स्टॉलजवळ कोणी मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वेच्या आरक्षण अधिकाऱ्यांकडे जाण्याचं बुकिंग करीत, कुणी आदल्या दिवशीच्या फोटोग्राफी सेशनच्या आलेल्या फोटोतनं आपले फोटो निवडीत. पुरुष बुद्धिवंत सूटबूट किंवा रेशमी राष्ट्रीय वेषात, तर स्त्री बुद्धिवंत शालू आणि भपकेबाज रेशमी साड्यात ! वातावरणातला उत्साह खास जत्रेतला. हा उत्साह कसला ? 'आपण कित्ती कित्ती प्रगती केलीये, नई' अशा उत्साही भाषणाचा. १५ ऑगस्ट तर नुकताच पार पडलेला; पण आता तर 'राष्ट्रापुढे संकटं आहेत' असं म्हणायचं ठरलंय ! माझी ही अबुद्धिवंत शंका आजूबाजूच्या दोन-चार बुद्धिवंतांना थांबवून विचारण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना धड उत्तर द्यायला वेळही नव्हता. कारण ते सगळे लगबगीनं अंतुल्यांबरोबर फोटोचा कार्यक्रम चालला होता तिथं चालले होते.

लग्नात कसं, नवरानवरीला मध्यभागी कायम ठेवून, त्याचा भोज्जा करून एकदा वराकडची, एकदा वधूकडची अशी वेगवेगळी परम्युटेशन–कॉम्बिनेशन करून ग्रुप फोटो काढतात तसलाच प्रकार इथे. मध्यभागी बॅरिस्टर अंतुलेसाहेब आणि पदाधिकारी बुद्धिवंत यांची प्राणप्रतिष्ठा केलेली. मागचे बाजूचे बुद्धिवंत बदलते. हे हरियाणाचे बुद्धिवंत, हे आता बंगालचे ! ध्वनिक्षेपकावरून त्यांना सूचना देणारा बुद्धिवंत काही शेरेही मारत होता. उत्तरप्रदेशी लोकांना– 'जमा, जमा, शिस्तीत जमा. उत्तरप्रदेश, जिथून पतप्रधानाची परंपरा निर्माण झाली, इतर प्रांताचे पंतप्रधान आले की काय होतं हे आपल्याला ठाऊकच आहे. या या, तुमच्या-


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : चौदावा

५ सप्टेंबर १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

कडून अनेक भावी पंतप्रधानांची अपेक्षा आहे.

' बंगाली बंधूंनो, तुम्ही या, तुमच्यावर आता आमचं राज्य लवकरच येणार आहे '. ही कन्व्हेन्शन जर स्वतःला तटस्थ, निष्पक्ष म्हणवते तर ' आमचं ' म्हणजे ' कुणाचं ' सरकार ? हे लगेच जाहीर करायला हवं होतं. मग काही बुद्धिवंत सल्ले. ' बंगाल्यांनो, मिठाई. ह्यां मुंबईतले रसगुल्ले घेऊन जा '. ' जनहो, आज दुपारी आपल्याला मुंबई दर्शनाला जायचंय विसरू नका ! आपापल्या बसेसमध्ये जाऊन बसा. बुद्धिवंतांनो, धडपडू नका, शिस्तीत बसा '. मग एक अर्जंट सूचना. ' बुद्धिवंतांनो, नका निराश होऊ अंतुले-साहेबांनी मोठ्या मनानं संध्याकाळीही फोटोकरता वेळ द्यायचं ठरवलं आहे. संध्या-काळी तुमच्या गाड्या त्यांच्या बंगल्यावरच जातील ! ' सत्तेची पुंगी वाजवून जमा केलेले हे बुद्धिवंत. काळे बुद्धिवंत, गोरे बुद्धिवंत, बुटके बुद्धिवंत, जाडे बुद्धिवंत, आसामी बुद्धिवंत, केरळी बुद्धिवंत, मराठी बुद्धिवंत, गुजराती बुद्धिवंत, तरुण बुद्धिवंत, वृद्ध बुद्धि-वंत, सगळ्या जातींचे, धर्मांचे बुद्धिवंत ह्या इथे रांगा लावून उभे आहेत. स्टेजवर देखणं लाल जाजम आहे. फुलांची मोहक सजावट आहे. कॅमेरांचा किलकिलाट आहे. फ्लॅशचा लख्ख प्रकाश आहे, व्हिडिओ रेकॉर्डिंगचा प्रखर प्रकाश पडलेला आहे. अंतुलेसाहेबही बसलेले आहेत. याहून आणखी पर्वणी कोणती !

कन्व्हेन्शनमधले बुद्धिवंत पूर्वीही आप-ल्याला भेटले आहेत. जॉर्ज ऑरवेलच्या ॲनिमल फार्ममध्ये तर त्यांचा प्रोटोटाइप आहे. ' सगळे प्राणी समान आहेत, पण काही प्राणी इतरांपेक्षा विशेष समान आहेत,' असं स्वतःच स्वतःबद्दल समजणारी जमात म्हणजे कावळ्यांच्या छत्र्यांसारखे उगवणारे, वारा वाहेल तशी पाठ फिरवणारे बुद्धिवंत ! ते ह्या देशात इतके झाले आहेत हे नव्यानं कळलं; पण असं झालं की समजावं अवन-तीचा काळ सुरू झाला आहे. राष्ट्र खरंच संकटात आहे.

अध्यक्षीय भाषणात बांडुंग परिषदेतल्या पंडित नेहरूंच्या एका भाषणाचा मोठा अभि-मानानं उल्लेख केला आहे. ' आमचा देश आणि आमचे देशवासीय म्हणजे होयबा नव्हेत. भूतकालात झाले असतील पण भवि-ष्यत मात्र अशी कुणाची हुकुमशाही आम्ही सहन करणार नाही. हा माझ्या देशवासियांचा निर्धार आहे. महासत्तांशी आमचं नातं असेल ते समतेचं, मैत्रीचं. लाचारी आणि गुलाम-गिरीचं नाही ! '

पं. नेहरूंचे हे विचार, हे ऐतिहासिक बोल त्यांच्याच देशवासियांनी आपल्या भिक्षुकी, खुषमस्करेपणाचं समर्थन म्हणून वापरावे याहून दैवदुर्विलास तो कोणता ?

—ललिता बर्वे

मुंबई वार्ता

# सप्रेम नमस्कार..

प्रिय माजगावकर

नामांतरासाठी धर्मांतर करू पाहाणाऱ्या बांधवांसाठी खालील पत्र आपण पुनर्मुद्रित करावे.

वि. ग. कानिटकर, पुणे

डॉ. आंबेडकर हे १९३३ साली, राजकीय सुधारणांच्या प्रकरणी ब्रिटिश सरकारने नेमलेल्या संयुक्त समितीच्या कामासाठी बिलायतेला गेले असता, त्यांच्या पश्चात, त्यांच्या विरोधी गोटाकडून ते मुसलमान धर्म स्वीकारणार असल्याची बातमी फैलावण्यात आली. ती ऐकून तिचा खरे–खोटेपणा समजून घेण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांपैकी एक सेवानिवृत्त लष्करी अधिकारी सुभेदार सवादाकर यांनी त्यांस पत्र लिहिले. या पत्रास डॉ. आंबेडकर यांनी धाडलेले हे उत्तर– (विश्रब्ध शारदा खंड पहिला पृ. ४३१.)

लंडन

१३–९–१९३३

अनेक जोहार, वि. वि. आपले १२–८ चे पत्र मिळाले. गवईने (गणेश अ. गवई) केलेल्या मूर्खपणाबद्दल मला आश्चर्य वाटले. धर्मांतरासंबंधाने त्याचे-माझे दोन–चार वेळा भाषण झाले. त्याला मी दोन गोष्टी निश्चया-त्मकपणे सांगितल्या. पहिली ही की, मी स्वतः हिंदु धर्मात रहाणार नाही. दुसरी गोष्ट मुसलमान कदापी होणार नाही. तिसरा कोणता तरी धर्म स्वीकारीन ! तूर्त माझा कल बुद्धधर्माकडे आहे माझी कारणे त्यास पटली. असे असताना त्या मूर्खाने असे खोटे का लिहिले याचे मला आश्चर्य वाटते. मी मुसलमान झालो ही बातमी वाचून मुसलमान लोकांना का हर्ष व्हावा, याचे त्याच्याहीपेक्षा आश्चर्य वाटते......

आपला कृपाकांक्षी

भीमराव

□

□ प्रा. चित्तरंजन दामले यांच्या ' स्वा. सावरकरप्रणीत हिंदुराष्ट्रवाद ' ( माणूस, १५–८–८१) या लेख–चर्चेच्या संदर्भात हे लिहीत आहे. माझ्या मते राजकारणात शक्य व इष्ट नसले तरी सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात एका प्रागतिक, वास्तवाशी संदर्भ असलेल्या नवहिंदुत्ववादाच्या मांडणीची नितांत आवश्यकता सध्याच्या वैचारिक वांझोटेपणाच्या, सुकाणुरहित सुखवादी काळात अत्यंत जाणवत आहे. निधर्मीपणाच्या चलाख गप्पा कितीही मारल्या तरी भारताच्या पृथक राष्ट्रीय अस्मितेचा मूळ पाया इथली एतद्देशीय संस्कृती वा हिंदुसंस्कृती हाच आहे व बाहेरच्या जगात भारताची हिंदु-प्रतिमाच चटकन डोळ्यांपुढे येते. आज दुर्दै-वाने बहुजन समाजाला हिंदु संस्कृती म्हण-ताच मनुस्मृती, वर्णवर्चस्व, ब्राह्मणी संस्कृती वगैरे गोष्टींचीच खऱ्या-खोट्या कारणांनी आठवण होते. मला वाटते, नव्या पिढीने हिंदु संस्कृतीमधील हीन गोष्टींचा स्पष्ट अव्हेर करून व चांगल्या गोष्टीचा तेवढ्याच स्पष्ट-पणे स्वीकार करून व प्रागतिक आशय लक्षात घेऊन सध्याची सांस्कृतिक निरगाठ सोडविणे आवश्यक आहे. सध्याच्या राजकारणग्रस्त नेतृत्वाला, अगदी भा. ज. प. नेतृत्वालाही, ही कामगिरी परवडणार नाही, झेपणार नाही. राजकारणाबाहेरील माणसांना हे जमण्यासारखे आहे.

मुंबई म. मो. पेंडसे

□ आपण मसुराश्रम नि श्री. ब्रह्मचारी विश्वनाथजी यांच्या परावर्तनवृत्ताला प्रसिद्धी दिली हे बघून परमानंद झाला. आज ही काळाची गरज आहे. आपली संपादकीय दृष्टी अचूक आहे. आज परधर्मात जाण्या-साठी प्रवृत्त करण्याची आवश्यकता नसून परधर्मात गेलेल्या लाखोंना परत आणणे

याची नितान्त आवश्यकता आहे, तरच राष्ट्र जगणार आहे.

जो कोई हमसे बिछड गये हैं
उनको साथ मिलायें
हम ऐसा राष्ट्र बनाये ।

१८ ऑगस्ट सु. ह. जोशी, शिरूर

## समृद्धी-शांतता

□ परवा पुण्याहून येताना १/८/८१ चा 'माणूस' घेऊन आलो. 'हरिनाम सप्ताह' हे संपादकांचं अग्रणीभाष्य अतिशय पटलं. त्यासंबंधी सहज सुचलेले विचार कळवीत आहे.

भारतीय क्रांतिवादी व समाजवादी-त्यापैकी बहुसंख्य तरी नक्कीच-हे धर्माच्याच काय, पण अनेक गोष्टींच्या नावाने हाकाटी करताना दिसतात. याचं कारण एकच-त्यांचाहि एक 'पंथ' झालेला आहे. पंथप्रेम आणि पंथनिष्ठा हे धर्माधिष्ठित सघटनाचे दोष समाजवाद्यांना व क्रांतिवाद्यांना ग्रासत आहेत—त्यांच्या नकळत.

इंग्लिशमध्ये आपण ज्याला Linearity Relationship Syndrome असं म्हणू शकतो, तशातलाच हा प्रकार. एखादी परिस्थिती, एखादा उद्‌गार, एखादा प्रसंग-यावर एखादी प्रक्रिया झाली, तर जो परिणाम दिसेल तो अगदीच अचूकपणे एक ठराविकच येईल, अनपेक्षित असं त्यामध्ये काहीच असणार नाही व म्हणून एखाद्या ज्योतिष्यासारखे आपण भाकित म्हणून ठामपणे सांगू शकतो असं हे सिन्ड्रोम. म्हणजे दोन परिस्थितीमधलं बदलाचं नातं हे जणु एखाद्या सरळ रेषेच्या आलेखासारखं बदलतं.

अशा Syndrome मध्ये मनुष्य कधी जातो?—तर कूट प्रश्नाची उत्तरे त्याला सापडत नाहीत, विश्लेषणाला सवडच नसते, शांतपणे बसून चिकित्सा केली तर आपण निष्क्रियतेचा आरोप ओढवून घेऊ अशी भीती असते, यामुळं आपलं एकदा बनलेलंच मत प्रमाण असलंच पाहिजे अशी हट्टी भूमिका घेऊन, त्या मताशी एकनिष्ठ राहणं ही आपली जीवननिष्ठा व मानबिंदू तो मानू लागतो, तेव्हा

## मसुराश्रम (गोरेगाव, मुंबई) तर्फे गेल्या महिन्यात झालेले शुद्धी व विवाहसमारंभ

१) जी. बी. ड्रायव्हर या मुंबईच्या सुशिक्षित पार्शी युवतीने हिंदू धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव 'सुमित्रा' असे ठेवण्यात आले व विवाह श्री. अनिल बाळकृष्ण जोशी या विरार (जि. ठाणे) येथील पदवीधर, उत्साही हिंदू युवकाशी थाटाने पार पडला. या विवाहानंतर वधूवरांचा सत्कार-समारंभ दादर, मुबई २८ येथील सभागृहात ठेवण्यात आला होता. त्याला सौ. सुमित्राचे अनेक पार्शी नातलग व जोशीमंडळीचे आप्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२) जे. बी. डिसोझा या मुंबईच्या रो. कॅ. ख्रिश्चन युवतीने हिंदू धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव 'नीलिमा' असे ठेवण्यात आले व विवाह श्री. मदन कृष्ण काबळे या कारवारकडील तडफदार हिंदू युवकाशी यादव मातोश्री सभागृह, ग्रँटरोड, मुबई येथे मोठ्या थाटाने पार पडला. कन्यादान श्री. दिगबरपंत गडकर व सौ. लताबाई गडकर यांनी केले. श्री. वसंतराव बांदेकर यानी या कार्यासाठी खूपच खटपट केली होती.

३) एम्. के. व्हॅको या केरळीय लॅटिन कॅथॉलिक सिव्हिल इजिनियर युवतीने हिंदू धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव 'शारदा' असे ठेवण्यात आले व विवाह आर. रघुनाथ या केरळीय हिंदू ऑटोमोबाइल इंजिनियरशी यथासांग पार पडला.

४) एच्. यू. मुल्ला या मूळच्या सागलीच्या पण सध्या मुंबई नगरपालिकेत अधिकारी असलेल्या पदवीधर मुस्लिम युवतीने हिंदू धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव 'अस्मिता' असे ठेवण्यात आले व विवाह श्री. अशोक दिगंबर घरत या वसईच्या हिंदू पदवीधर युवकाशी कस्तुरबा महिला मंडळ, माटुगा, मुबई १९, या सभागृहात मोठ्या थाटाने पार पडला. शुद्धिकार्याचे पाठिराखे श्री. प्रेमानंद वैद्य व सौ. शीलाताई प्रे. वैद्य यांनी कन्यादान केले. या कार्यक्रमास मुबई नगरपालिकेतील सर्व पंथीय स्त्रीपुरुष मोठ्या अगत्याने उपस्थित होते.

५) व्ही. बर्नार्डसिंग या नागपूरच्या प्रा. ख्रिश्चन युवतीने हिंदू धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव 'विमल' असे ठेवण्यात आले व विवाह श्री. धनराज यादव चावरे या नागपूरच्या हिंदू बौद्ध युवकाशी पार पडला. कन्यादान श्री. नरेंद्र रा. भालेराव यांनी केले.

६) जे. पी. परेरिया या मुबईच्या रो. कॅ. ख्रिश्चन युवतीने हिंदू धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव 'स्मिता' असे ठेवण्यात आले व विवाह श्री. शशिकात नारायणराव पाटील या वसईच्या हिंदू युवकाशी मोठ्या आनदाने पार पडला. सौ. स्मिताचे आई-वडील, तिच्या दोघी बहिणी व त्याचे पती व अन्य ख्रिस्ती मडळी आश्रमात कार्यक्रमाला उपस्थित होती. त्यांनी एकंदर कार्यक्रम पाहून समाधान व्यक्त करून ब्र. विश्वनाथजी याचे आभार मानले. कन्यादान श्री. हरेंद्र सामंत व सौ. स्वाती ह. सामंत यांनी केले.

७) आर. के. आलेन्बी या सुन्नी मुस्लिम युवतीने हिंदू धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव 'स्मिता' असे ठेवण्यात आले व विवाह श्री. स. र. सावंत या हिंदू युवकाशी पार पडला. सर्व अडचणी बाजूला सारून सौ. स्मिताचा हिंदू धर्म स्वीकाराचा व विवाहाचा निर्णय प्रशंसनीय होता. श्री. सुधीरराव सावंतांचे कुटुबियांनी वरील जोडप्याला अभिनंदनीय साहाय्य केले आहे. श्री. सुधीररावाचे बंधू विधिज्ञ असून त्यांनी वरील जोडप्याला यथायोग्य मार्गदर्शन निरपेक्ष बुद्धीने केले आहे.

वरील सर्व कार्यक्रम ब्रह्मचारी विश्वनाथजी गुरुजींनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या सहकार्याने पार पाडले. श्री. वा. ज. हर्डीकरशास्त्री यांनी पौरोहित्य केले. श्रीमती कुदाताई पराजपे यानी शुद्धिकृताचे व विवाहितांचे स्वागत केले. प्रत्येक कार्यक्रमानंतर ब्रह्मचारी विश्वनाथजींनी शुद्धिकृताना, विवाहिताना व उपस्थिताना त्याचे कर्तव्य, तसेच संस्काराचे महत्त्व समजावून सागून शुभाशीर्वाद दिला व गीताग्रंथ आणि पाडुरंगाचे सुदर चित्र भेट दिले.

**ब्र. मोहन**
मसुराश्रम, गोरेगाव (पूर्व), मुंबई ६३.

मग ते मत कितपत बरोबर आहे, ते कालानुरूप आहे का, सदसद्विवेकाला पटणारं आहे का असा विचार करणं हेच त्याच्या दृष्टीनं 'पाखंडी' (सॅक्रिलेज्) होऊन जातं. क्रांतिवाद्यांनी धर्माच्या नावानं हाकाटी करणं काय किंवा कर्मठ सनातन्यांनी धर्म बुडाल्याच्या नावानं हाकाटी करणं काय, ही दोन्ही एकाच सिन्ड्रोमची रूपं आहेत.

उदाहरणार्थ, गेल्या तीस वर्षांतला राष्ट्रीकृत उद्योगाचा विदारक अनुभव (भारताची सर्व गंगाजळी उधळूनही हे धंदे अजून तोटा दाखवून त्यांत धन्यता मानतात.) पाठीशी असूनही भारतीय क्रांतिवादी कुठल्याही औद्योगिक समस्येवर 'राष्ट्रीयीकरण' हा एकमेवच तोडगा दाखवतात. अफगाणिस्तानात रशियानं काय केलं आहे हे दुर्लक्षून अमेरिकेच्या 'दिएगो गार्शिया' तळाच्या नावानंच फक्त कण्ठशोष करतात. औद्योगिक शांततेसाठी व वाढीसाठी राष्ट्रीयीकरण हे हे एकच रामबाण औषध न मानता युगोस्लाव्हिया, पोलंड, इस्राइल, इथल्यासारखी काही प्रयोगशीलता व कल्पनाशक्ती दाखवायला पाहिजे हे त्याच्या सहज लक्षात येत नाही. जागतिक राजकारणात पक्ष बरेच आहेत; एकाचीच तळी उचलून धरून दुसऱ्याला 'महाराज' बनवणं हा प्रकार हास्यास्पद दिसतो, हे त्याच्या लक्षात येत नाही. मागं मला आठवतं, ५-७ वर्षांपूर्वी एका विद्वान भारतीय मार्क्सवाद्यानं भारतीय शास्त्रोक्त संगीत हे त्याज्य आहे, कारण ते 'फ्यूडल' (सरंजामशाही) आहे असा दिव्य शोध लावला होता. कारण उघड आहे — आपला धर्म, आपली संस्कृती-आपलं सगळं वाईटच! कारण मार्क्सनं कुठं सांगितलंय् ते चांगलं आहे म्हणून!

तर या आग्रही, अभिनिवेशी पवित्र्यातून हा मनुष्य बाहेर कधी पडतो? ह्या प्रश्नाचं उत्तर असं आहे की, ती व्यक्ती जरा समृद्धी भोगू लागली, तिला मानमरातब मिळू लागले की जरा आळसावते. मग त्या माणसाला असं वाटू लागतं की, आपण केली ही हाकाटी कशासाठी? वैयक्तिक धर्मकल्पना आणि समाजवाद यांच्यात, तसंच खाजगी मालकी आणि समता, संस्कृती आणि प्रगती यांच्यात अंतर्विरोध असायला पाहिजे असं नाही. ही प्रक्रिया पोलंड, हंगेरी, इटली, फ्रान्स, रुमानिया, युगोस्लाव्हिया या देशातल्या कम्युनिस्टांमध्ये झाली. यामुळेच शासकीय जुलूम, शासकीय नियंत्रण, विचारस्वातंत्र्यावरील गदा इत्यादी प्रश्नांवर तिथली जनता स्वयंप्रेरणेने त्याच्या मागे गेली व जात आहे.

ही समृद्धी, ही शांतता म्हणजे काय हे अजून भारतीय क्रांतिवाद्यांना माहीतच नाही. कदाचित् ती मन:शांतीच्या स्वरूपात दिसत असेल, कदाचित् ती वैचारिक पातळीवरून दिसत असेल, कदाचित उदार मनातून किंवा अध्यात्मातून ती येत असेल.

ह्या समृद्धीचा उपयोग असा होतो की, मनुष्य विसावतो व विचार, चिकित्सा करू लागतो. हा विसावा (Relaxation) मनुष्याला अत्यावश्यक आहे. ही मनाची एक स्थिती आहे. वाटते त्याहून ती अवघड आहे. उदाहरणार्थ, आपल्या संगीतातला मारव्यातला तीव्र कोमल ऋषभ व मियांकी तोडीमधला अतिकोमल कोमल ऋषभ यांच्यातला फरक कुणाला कळेल, तर ज्याला तेवढी सवड आहे, तेवढा विसावा ज्याला आहे, त्यालाच! ह्या विसाव्यामुळेच तो सूक्ष्म, तरल गोष्टी बघू शकतो.

असा विसावा घेणं व विचार करणं हेच पाप आहे असं आपल्या क्रांतिवाद्यांना वाटणार. कारण मग ती निष्क्रियता होईल! कामगार चेतवले जाणार नाहीत! निरीश्वरवादी म्हणून ताशे बडवता येणार नाहीत!

यातून एकच मार्ग दिसतो; तो म्हणजे या भारतीय क्रांतिवाद्यांना सरकारी खर्चानं मानसिक विसाव्यासाठी हिमालयात एक महिनाभर पाठवावं. बरोबर प्रत्येकाला इथल्या त्याच्या स्वत:च्या भाषणांची एक कॅसेट लायब्ररी व एक टेप-रेकॉर्डर हे देणं आवश्यक. रोज एकांतात फुल् आवाजात स्वत:ची कॅसेट हिमालयास साक्ष ठेवून एक तासच ऐकावी. 'आयला, बंद कर बाबा आता तुझी झंझट!' असं म्हणून तो जेव्हा रेकॉर्डर ऑफ करील तेव्हा त्याला मानसिक विसावा मिळेल........आणि त्याच्याबरोबर तुम्हाला-आम्हांलाही!

११ ऑगस्ट — राजू पटवर्धन, तासगाव

□

# नव्याने पक्षबांधणी

## पवारांपुढील आव्हान

वा. दा. रानडे

देवराज अर्स यांनी अध्यक्षपदाचा राजिनामा दिल्यानंतर त्या जागी शरद पवारांची निवड पक्षाच्या कार्यकारिणीने केली. एका विकलांग झालेल्या पक्षाची नव्याने उभारणी करण्याचे आव्हान त्यांच्यापुढे आहे अर्स यांनी अध्यक्षपदाचा राजिनामा दिल्यानंतर अर्स कॉंग्रेस या नावाला काही अर्थ राहिला नाही. नवे नाव ठरेपर्यंत कॉंग्रेस (एस) असे तात्पुरते नाव त्यांनी पक्षाला दिले आहे निवडणूक कमिशनच्या निर्णयामुळे इंडियन नॅशनल कॉंग्रेस हे नाव आता पवारांच्या पक्षास वापरता येणार नाही. निवडणूक कमिशनचे निर्णयास हरकत घेणारा अर्ज पवारांच्या पक्षाने सुप्रीम कोर्टात केला; पण त्या कोर्टाने तो दाखल करून घेण्यासही नकार दिला. त्यामुळे दुसरे नाव घेण्याशिवाय दुसरा मार्ग राहिला नाही. कॉंग्रेस (एस) या नव्या नावाचे स्पष्टीकरण करताना पवार म्हणाले, 'यातला एस शरदचा निदर्शक नाही तर सेक्युलॅरिझम व सोशॅलिझम या प्रणालीचा निदर्शक आहे. इंग्रजी 'एस'मधून हे दोन्ही शब्द सूचित होतात;' पण या एसचे हिंदीकरण काय करणार? दोन्ही शब्द ज्यातून सूचित होतील असे एक हिंदी अक्षर मिळणे कठीण आहे. पक्षाचे नाव देतानासुद्धा आम्ही प्रथम इंग्रजीतून विचार करतो, इतके आम्ही अजूनही इंग्रजाळलेले आहोत. पक्षाला नवे नाव देताना अजूनही पूर्ण भारतीय नाव निवडण्याचा विचार पवारांनी करावा.

जानेवारी १९७८ मध्ये इंदिरा गांधींनी कॉंग्रेसमध्ये दुसऱ्यादा फूट पाडून स्वत:चा वेगळा पक्ष काढला. त्या वेळी गांधी-नेहरूंची परंपरा पुढे चालवणारी खरी कॉंग्रेस आमचीच असा दावा इंदिरा गांधींच्या पक्षात जाण्याचे नाकारणाऱ्या कॉंग्रेसजनांनी केला. त्या वेळी ब्रह्मानंद रेड्डी अध्यक्ष असल्याने तो

मलपृष्ठ २ वर

## उद्योगनगरी मुंबई

'माणूस'च्या मागील अंकात कामगार नेते डॉ. दत्ता सामंत यांच्या चळवळीचं चित्र उभं करणाऱ्या त्यांच्या समर्थकांच्या काही मुलाखती दिल्या होत्या. या उत्तरार्धात मुंबईतील इतर काही प्रमुख कामगार-नेत्यांच्या मुलाखती देत आहोत. त्याद्वारे मुंबईच्या औद्योगिक विश्वाचे अंतरंग जास्त चांगल्या प्रकारे उलगडू शकेल.

# कामगार चळवळीतील नवा अर्थवाद पूरक की मारक?

सतीश कामत

मुंबईच्या औद्योगिक क्षेत्रात आज जे अस्वस्थतेचं, अनिश्चिततेचं स्वरूप येऊ लागलं आहे त्याच्याविषयी सामान्य माणसाच्या मनामध्ये अनेक समज–गैरसमज आहेत. अर्थात यापैकी बहुतेक ऐकीव किंवा वृत्तपत्रांमधील बातम्यांवरच आधारित असतात. काही जणांना डॉ. सामंत यांच्यामुळेच मुंबईच्या औद्योगिक क्षेत्रात हिंसाचार बोकाळला आहे, असं वाटतं; या अशांततेच्या वातावरणाला शासनाची दंडुकेशाही जबाबदार असल्याचं मत काहीजण व्यक्त करतात, तर गेल्या सात–आठ–दहा वर्षांतील मुंबईच्या औद्योगिक जगतामधील घडामोडी नवा 'ट्रेंड' दाखवतात, असं काहीजणांना वाटतं.

पण अशा तऱ्हेने कामगार–चळवळीच्या किनाऱ्यावर बसून त्याविषयी मत व्यक्त करणाऱ्यापेक्षा गेली दहा–पंधरा–वीस वर्षं या चळवळीमध्ये जे प्रत्यक्ष उतरले आहेत, निरनिराळ्या अडचणीमधून मार्ग काढत ज्यानी कामगार चळवळ पुढं नेली आहे व आजच्या अशात, अस्वस्थ स्थितीमध्येही या चळवळीत नवे प्राण फुंकण्याचे प्रयत्न आशावादी मनाने जे करत आहेत अशा मुंबईतल्या काही कामगार–नेत्यांच्या मुलाखती घेतल्या. मुंबईतील सध्याच्या औद्योगिक जगताविषयी या नेत्यानी व्यक्त केलेली मतं कामगार चळवळीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्यांना निश्चितच विचारात घ्यावी लागतील.

¤

शिवसेना ही मुंबईतली एक मोठी शक्ती. विशेषत: १९६८ ते १९७४ या काळात मुंबईवर या लढाऊ संघटनेचंच आधिपत्य होतं, असं म्हटल्यास ते वावगं ठरणार नाही. याच काळात शिवसेनेने कामगार क्षेत्रातही पाऊल टाकलं आणि आपली संघटना स्थापन केली–भारतीय कामगार सेना!

गेल्या नऊ ऑगस्टला तेराव्या वर्षात पदार्पण केलेल्या या संघटनेने प्रथमपासूनच शक्यतो संघर्ष न करता कामगाराना फायदा मिळवून द्यायचं धोरण अंगिकारलं आहे, असं सांगून संघटनेचे अध्यक्ष दत्ताजी साळवी म्हणाले, 'आज देशामध्ये कामगार चळवळीच्या दृष्टीनं अतिशय अनिष्ट वातावरण दिसतं. महागाईचा डोंब सगळीकडून उफाळला आहे, सामान्य कामगार त्यामुळे अगदी गांजून गेला आहे. अशा वेळी तो भल्या–बुऱ्याचा विचार करण्याच्या मन:स्थितीत राहात नाही.

'महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्र स्थिर असणं हे सबंध देशाच्याच हिताचं आहे. कारण मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. पण शासनही याबाबतीत बेपर्वाई दाखवताना दिसतं. तसंच सर्वच राजकीय पक्षानी स्वत:च्या स्वार्थाकरता कामगार–चळवळीत घुसून संधिसाधुपणाचं राजकारण केलं आहे.

'कमीत कमी कामगारांच्या सहाय्याने जास्तीत जास्त उत्पादन करणं हे हल्लीच्या उद्योगपतींचं धोरण असतं. त्यामुळं तात्पुरते कामगार भरणं किंवा कंत्राट पद्धतीचा जास्तीत जास्त अवलंब केला जातो. यातूनच औद्योगिक क्षेत्रात असंतोषाची बीज पेरली जातात.

'आज डॉ. दत्ता सामंतानी मुंबईचं कामगारक्षेत्र काबीज केलं आहे, असं म्हटलं जातं. पण त्यांची कार्यपद्धतीच अतिशय निराळी, आमच्या तात्विक विचारामध्ये न बसणारी आहे. औद्योगिक बेशिस्त आम्हाला अजिबात मान्य नाही. जास्त आकर्षक मागण्या कामगारांपुढे ठेवून डॉ. सामंत त्यांना स्वत:कडे खेचण्याचा प्रयत्न करत असतात, पण आमचा भर केवळ आकर्षक मागण्यांपेक्षा कामगारामध्ये राष्ट्रीय वृत्ती निर्माण करण्यावर जास्त आहे. तसंच डॉ. सामंतांच्या युनियनमध्ये आमच्या संघटनेसारखं संघटन व नेतृत्व नाही. तो फक्त एकखांबी तंबू आहे भक्कम पाया व कार्यकर्त्यांचं जाळं असलेली संघटना ती नाही. त्यामुळे डॉ. सामंतांची संघटना व आमच्या संघटनेमध्ये जमीन–अस्मानाचा फरक आहे.

'मुंबईच्या कारखान्यातला कामगार जेवढा सुबुद्ध व विवेकी असायला हवा तेवढा तो आज दिसत नाही. त्याच्यामध्ये ही जागृती निर्माण करण्याचं काम खरं म्हणजे कामगार युनियनचं आहे; पण केवळ आर्थिक मागण्यासाठी युनियन-नेते कामगाराला झुजवताना दिसतात. यातून कामगार स्वत:च स्वत:चा शत्रू बनतो, हे लक्षात घ्यायला हवं.'

शिवसेनेच्या तत्त्वज्ञानावर पोसल्या गेलेल्या भारतीय कामगार

पृष्ठ २२ वर

# मी आलेय मिंटी
# एक खारोटी



स्वभाव माझा जागरूक,
वृत्ती माझी संचयी,
चालणे माझे चपळ
वागणूक माझी निगर्वी.
सेतुबंधनात आपला वाटा उचलून
रामाचा आशीर्वाद मिळवलेली
आजही थोरा–मोठ्यांचे
आशीर्वाद असेच आहेत पाठीशी.
माझं घर होतं दूर रानात
झाडांच्या ढोलीत
आता मात्र माझं घर खेड्यात, शहरात
महाबँकेच्या शेकडो शाखांत

मी आलेय मिंटी
मी म्हणजे – महाबँक

## बँक ऑफ महाराष्ट्र

( भारत सरकारचा उपक्रम )

मुख्य कचेरी : ‘लोकमंगल’, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

## उत्तरमीमांसा : २१ :

स. शि. भावे

# आमचा गणपती उत्सव : एक जमाखर्च

आज गणेशचतुर्थी. ('उत्तरमीमांसा 'देखील नेमकी २१ वी आली आहे.] अर्थात् याचे भाविकांस मुळीच आश्चर्य वाटणार नाही!)

विशेष म्हणजे आज गणपतीचा पहिला दिवस असूनही मी आरामात आहे. कारण गणपतीची मूर्ती मी परवाच आणून ठेवलेली आहे. गेल्या वर्षाची पायपीट यंदा नाही, याचे समाधान मनाच्या काठाशी सारखे उचंबळते आहे आणि आरामखुर्चीत बसून सावकाश पाय हालवून मी त्या समाधानाला वाट करून देत आहे.

अशी पंधराएक मिनिटे गेली आणि मी उडालोच!

माझ्या एकदम लक्षात आले की, गेल्या वर्षी जी पायपीट पडली होती ती माझ्या स्वत:च्या गणपतीच्या मूर्तीसाठी पडली नव्हतीच मुळी. मित्राला मूर्ती हवी होती. त्याच्याबरोबर माझीही फरपट निघाली होती.

तो धोका आजही होऊ शकत होता.

गेल्या वर्षीही मी असाच आरामात पाय हालवत आरामखुर्चीत पडलो होतो आणि अचानक मित्र उगवला होता.

"चल, तावडतोब चल. ऊठ कपडे कर!" –मित्र.

"अरे, आल्यासारखा बस. चहा घे. नैवेद्याचे पाच मोदक खा. मग जाऊ कुठं म्हणतोस तिथं."–मी.

"बसू? अरे, दोन मिटं उभं राहून गप्पा करायलाही वेळ नाही इतकी अर्जंट ऑर्डर आहे!"

"प्रसादाच्या मोदकाइतकं अर्जंट दुसरं काहीच असू शकत नाही." मी गंभीरपणाने धार्मिक सबब उभी केली.

धार्मिक सबब ही एक अशी सबब आहे, जी कुणी टाळू शकत नाही. श्रद्धा असणारे तर अडतातच; पण श्रद्धा नसणारेही अडतात कारण ते मनात भित्रे तरी असतात किंवा कनवाळू तरी.

मित्र खरा श्रद्धाळू होता. "दे बाबा दोन मोदक. मूर्ती आणायला चाललोय. आरंभीच उल्लंघन नको!"

¤

दहा मिनिटांत आम्ही बाहेर.

"यंदा केवढी मूर्ती घेणार आहेस?" मी चालता चालता सहज विचारले. खरं म्हणजे 'केवढ्याची' असंच विचारायचं होतं; पण म्हटले, देवाची मूर्ती. एकदम 'केवढ्याची' असं मूर्तीबद्दल कसं विचारायचं?

"आपली नेहमीची. जनता क्लास. पाच रुपये." मित्र.

"पाच रुपयाला गणपती विसरा आता!" मी त्याच्या भोळेपणाला हसत माहिती पुरवली. "यंदा पंधरापासून सुरुवात आहे!"

"पंधरा! साध्या काळ्या मातीच्या मूर्तीला पंधरा? मग अस्सल शाडूच्या पेणच्या गणपतीला किती रे पडत असतील?"

"पेणच्या गणपतींची तर तू–मी चौकशी-देखील करू नये. पन्नास-पाउणशेनंतरचे आकडे टिकतात तिथे!" माहिती पुरवल्यानंतर मी एक चिमटा काढला, "काय रे! गणपती देव ना? मग त्याच्या मूर्तीला साध्या काळ्या मातीची म्हणून काय हिणवतोस?"

"हे तू त्या दुकानदाराला सांग. म्हणावं, देव सारा एकच ना? मग साऱ्या मूर्त्या एकाच किमतीला विका! मग तो काय म्हणतो ते मला सांग."

मला वाटले, हा प्रयोग करूनच पाहावा.

पहिल्याच दुकानाकडे वळलो,

मूळ दुकानासमोर शिड्या लावून तात्पुरते केलेले दुकान. तिन्ही बाजूनी कितान. फळ्यांवर रंगीत कागद. वर हारीने गणपती. खालच्या दोन फळ्या रिकाम्या. वरच्या फळ्यांवर आकर्षक मूर्ती होत्या. प्रत्येकीखाली लेबल होते. आम्ही आशेने लेबले पाहू लागलो. रु.२४५।–, रु. १६५।–, रु. १०७।–, रु. ७८।–. ७८ च्या खालच्या रकमेचे लेबलच नव्हते.

मित्राचा चेहरा उदासवाणा झाला. माझाही!

स्टॉलवाले गृहस्थ तुकतुकीत गोरे. भले वाटले.

"पंधरापंधराच्या मूर्ती होत्या ना?" मी अर्धवट स्वत:शी आणि अर्धवट त्या गृहस्थांना असा प्रश्न केला.

"संपल्या!" त्याचे रामबाणासारखे नि:शंक उत्तर.

"पंधरा नाही; पण पंचवीस–चाळीस–निदान पन्नासच्या असतील ना?" आशेने मी.

"सगळ्या मूर्त्या संपल्या. आज गणेश-चतुर्थी आहे. लोकांना लौकर पूजा आटपायच्या असतात!" आमच्या उशीरावर बारीक, सूचक टीका.

मित्राने व मी एकमेकाकडे पाहिले. दोघेही बाहेर पडलो. स्टॉलवाले गृहस्थ स्थितप्रज्ञ वृत्तीने गणपतीना हलके हलके फडके मारून स्वच्छ ठेवीत होते.

पुढचा स्टॉल, त्याच्या पुढचा स्टॉल. परिस्थिती तीच. तशीच लेबले. काही काही गणपतीवर आणखी एक लेबल. 'SOLD'. किंवा 'Reserved'. किमतीची लेबले चांगली रु. २७५।– रु. ३१८।– अशी डोळे फिरवणारी होती.

मी न राहवून विचारले, "आधीपासून रिजर्व करतात कुणी कुणी?'

"मग? अहो, श्रद्धा असते कुणाकुणाची. दीडचा, साडेतीनचा, असे मुहूर्त असतात. नेमक्या मुहूर्तालाच प्राणप्रतिष्ठा व्हायला हवी असते. आता बघा. एकेकजण येऊन आपापल्या मुहूर्ताचे गणपती नेतील." तिसरा (की चौथा?) स्टॉलवाला अती आदराने सांगत होता.

"आणि एवढाले पैसे देतात लोक?" मित्राचा विश्वास बसत नव्हता.

"ज्याच्या त्याच्या भक्तीवर असतं ते. जशी भावना तसा दर." स्टॉलवाला श्रीमंत-ग्राहक स्तुतीत रंगला होता.

"पैशावर कसली आली आहे भावना? आता आमच्यापाशी पैसे नाहीत. म्हणजे आमची भावना कमी म्हणायची का?" मित्र आता गणपतीच्या किंमतीतून तात्त्विक पातळीवर येऊ बघत होता.

अशी तात्त्विक पातळी मधे आणण्याची मित्राला सवय होती. ती मला माहीत असल्याने मला जाणवले; मधे पडण्याची तयारी ठेवायला हवी.

"तसं नाही, तसं नाही" असे तो स्टॉलवाला सावरून घेत होता, इतक्यात मित्राने आपली 'भूमिका' मांडायला सुरुवात केलीच होती.

"सर्वांची धर्मश्रद्धा समान मानली पाहिजे. तिथे पैशाने कमजास्त होता कामा नये. तुम्ही स्टॉलवाले. तुम्ही हे सर्वांना समजून सांगितले पाहिजे. गणपतीच्या मूर्ती समान किंमतीला मिळायला हव्यात. हिंन्दूचा हा हक्क आहे. तुम्ही स्वतः हिंदू आहात. समान किंमतीना मूर्ती विकून इतर हिंदू स्टॉलवाल्यापुढे तुम्ही आदर्श ठेवला पाहिजे."

"हा सुद्धा धंदा असतो साहेब!" स्टॉलवाला म्हणाला, "आणि धंदा म्हटला की, थोडा पैसा सुटावाच लागतो."

"सरळ म्हणता, की हा धंदा! देवाच्या मूर्तीचा धंदा करता? आमची पवित्र धार्मिक भावना आणि तुम्ही तिचा धंदा करता? हिंदू म्हणून तुम्हाला हे पाप नाही वाटत?" मित्राला वाटले, या बिनतोड प्रश्नाने स्टॉलवाला मोडणारच!

स्टॉलवाल्याचे माधुर्य कायमच होते. "त्यात कसलं पाप? धर्म तो धर्म. धंदा तो धंदा!" मित्राच्या भोळेपणाची कीव करीत तो त्याला व्यवहार शिकवीत होता.

¤

"आणि धर्म म्हणून गणपती करतो कोण हल्ली? सगळे उत्सव करीत असतात. देवाचं फक्त निमित्त." स्टॉलवाला परिसंवादात अनुभवी असावा. त्याने विषयाला बरोबर कलाटणी दिली. त्या कलाटणीत मित्र बरोबर अडकला.

"नाही तर, काय?" मित्र दुसऱ्याचे भाषण करू लागला.

स्टॉलवाल्याचे काम झाले होते. मित्राचे भाषण त्याने चालू दिले. म्हणजेच त्याच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले आणि तेवढ्यात ६० रुपयांची एक मूर्ती 'तुम्हाला म्हणून' मित्राच्या गळ्यात बांधली!

हे सारे करताना तो सहानुभूतीनं पुटपुटत होता– "हे बघा साहेब, हिंदू म्हणून गणपतीचा धंदा करू नये, हे तुमचं म्हणणं एकदम पटलं आपल्याला; पण मला सांगा, कोण करत नाही गणपतीचा धंदा? वर्गणी जमवणारे धंदा करतात. वीजवाले, लाउडस्पीकरवाले धंदा करतात. प्रत्येकजण पैसा काढतो या मोसमात!..."

मित्रावर आणि माझ्यावरही याचा अनुकूल परिणाम होतो आहे, असे पाहून त्याला समाधान वाटले. तो आणखी विश्वासाने, आणखी खालच्या आवाजात सांगू लागला–

"आता हे चौकातले मंडळवाले आहेत ना? सकाळी माझ्याकडून शंभर रुपये घेऊन गेले. सक्तीने. दहा-बारा जणांचं टोळकं! नाही कसं म्हणणार? स्टॉलच उडवून लावला असता नाही म्हटलं असतं तर! आता यांना हिंदू म्हणून कमी आणि समान किंमतीत मूर्त्या दिल्या असत्या तर यांनी काय केलं असतं माहीत आहे?"

"काय?" माझे कुतूहल पुरते जागे झाले होते.

"सगळ्या मूर्त्या विकत घेतल्या असत्या आणि समोर स्टॉल टाकून चढ्या किंमतीला विकल्या असत्या!"

"असं कसं करतील हो ते?" मी कळवळून म्हणालो, "रागडे असले तरी ते उत्सव करणारे जनतेचे कार्यकर्ते आहेत. एवढं खपायचं, कार्यक्रम करायचे, विसर्जनाच्या दोन रात्री जागायचं. हिंदू धर्माला सामुदायिक कार्यक्रम नाहीत अशी तक्रार असते ना? बघा म्हणावं या कार्यकर्त्यांचं उदाहरण!"

माझ्या या कळकळीच्या बोलण्यावर स्टॉलवालेबाबा मोठ्याने हसले. "कार्यकर्ते? कोण कार्यकर्ते? अहो, इथे कार्यकर्ते वगैरे कुणी नसतात. इथे आहेत ते पक्के व्यावसायिक आहेत!"

"तुम्ही विनाकारण अश्रद्ध भावनेनं बोलता आहात. चांगल्या कार्यकर्त्यांत थोडेसे आपमतलबी असणारच. म्हणून काही सगळ्यांना वाईट म्हणता येणार नाही." मी जरा नेटाने सत्पक्षाचा कैवार घेतला.

पण माझ्या नेटाचा स्टॉलवाल्या बाबांवर काहीच परिणाम झाला नाही. उलट त्यांनी आता मित्राची म्हणजे व्याख्यात्याची भूमिका स्वीकारली. मित्रावर या बाबांचा प्रभाव पडला होताच. विकत घेतलेल्या मूर्तीवर रुमाल टाकून तो माझ्या बरोबरीने ऐकू लागला.

¤

"हे बघा!" बाबांनी आमच्यापुढे दोन छापील पुस्तिका टाकल्या. गणेशोत्सव-मंडळाचे ते गतवर्षीचे वृत्तांत आणि हिशेब होते. एका मंडळाचे वर्ष होते अठरावे. दुसऱ्या मंडळाचे होते पाचवे.

त्या पुस्तिका पाहून मी आनंदित झालो. म्हणालो,

"बघा तुम्हीच! हे कार्यकर्ते किती शिस्तीचे आहेत. गेल्या वर्षाचा वृत्तांत आणि हिशेब त्यांनी छापून सादर केले आहेत. हा तर त्यांच्या सुव्यवस्थितपणाचा पुरावा आहे!"

"अहो, केवळ दिखाऊ सारवासारव आहे. माझ्या प्रश्नांची उत्तरं त्यात आहेत का पाहून सांगा."

"विचारा!" पुस्तिका उघडून मी उत्साहाने सिद्ध झालो.

"हं. सांगा एकूण जमा किती?" ते.

"सात हजार सत्याऐंशी रुपये."–मी.

"पैकी मांडव?"

"बाराशे रुपये."

"सजावट?"

"१०९९, म्हणजे अकराशे."

"आता वीज-रोषणाई?"

"पंधराशे."

"आणि वीजबील?"

"अडीचशे."

"किती झाले एकूण?"

"साधारण चार हजार झाले." मला नक्की बेरीज जमली नव्हती; पण स्टॉलवालेबाबा तेवढ्याने हटणारे नव्हते.

"म्हणजे सात हजारापैकी चार हजार यात गेले. यात मिरवणूक सहाशे आणि किरकोळ ५००, म्हणून अजून अकराशे झाला म्हणजे पाच-साडेपाच हजार यातच गेले. हो हो करून रेकॉर्डस वाजवण्याचे चार पाचशे धरा. म्हणजे संपले ना पैसे? मागून सक्तीने पैसे देणारांना उत्सवाचा कोणता

लाभ मिळतो ? तर फक्त सत्यनारायणाच्या पूजेचा प्रसाद ! म्हणजे वर्गणी आमची आणि उत्सव ह्याचा !"

पुराव्यानिशी बोलत असल्याने बाबांना सात्त्विक आवेश चढला होता. पुराव्यामुळेच त्यांचे बोलणे खोडून काढणेही शक्य नव्हते. शिवाय रेकॉर्डस्‌च्या दणदणाटाने झोपमोड झालेल्या रात्री मलाही आठवत होत्याच.

तेवढ्यात स्टॉलवाल्या बाबानी विवेचनाचा धागा पुन्हा पकडला. 'उत्सव नाही हा मास्तर, केवळ धंदा उरलाय हा ! रोषणाई करावी, तीही चौथ्या-पाचव्या दिवशी पुरी होणार. आठ-दहा दिवस ठणठणा रेकॉर्डस् बडवाव्या, श्रीच्या मूर्तीपुढे रात्ररात्र पत्ते खेळावे, विसर्जनाच्या रात्री मनसोक्त धुंद होऊन किळसवाणं नाचावं ! हा कसला उत्सव ?"

मला हळूहळू बाबाचे म्हणणे पटू लागले होते. तेवढ्यात बाबांचे आणखी ऑडिट निघाले.

"मघाशी रकमा सांगितल्यात. त्यात 'श्रीपुढील जमा' किती दाखविली आहे ?'

"पाऊणशे पये," मी पुस्तिका पाहून सांगितले.

"पाऊणशे ? दहा दिवसात फक्त पाऊणशे ?" बाबांनी हसत विचारले, "आणि वर्षभरातल्या जमेचं काय ?"

"वर्षभरातली आणखी कसली जमा ?" मित्राला अगदी राहवले नाही.

"हा प्रकार नवीन आहे. गेल्या दोन-तीन वर्षातला. तुम्हाला माहीत झालेला दिसत नाही." बाबा म्हणाले, "ऐका"—

'या मोठ्या मूर्ती. त्यांचं विसर्जन करीत नाहीत. फक्त पूजेच्या मूर्तींचं करतात. माघारी आणलेल्या या मोठ्या मूर्ती आतापर्यंत वर्षभर जपून ठेवीत असत. पण दोन वर्षांपूर्वी कुणा कल्पक कार्यकर्त्याला वाटलं की, या मोठ्या मूर्तींना नुसतंच ठेवण्यापेक्षा थोडं कामाला लावावं.'

"म्हणजे काय केलं ?"—मी आणि मित्र.

"मूर्तीच्या भोवती तात्पुरते पिंजरे उभारले. समोर पैसे टाकायला पेटी ठेवली. भक्तांना असे जवळ देव हवेच होते. मग रोज दर्शन. रोज गल्ला. संकष्टीला जास्तच. 'या वर्षभराच्या पैशांचा हिशेब कुठं आहे,असं विचारलं मी मघाशी.'

स्टॉलवालेबाबा थांबले, त्यांचे ऑडिटचे शक संपलेले दिसत नव्हते; पण त्यांचा वेळ संपला होता.

¤

मित्र आणि मी घरी निघालो. दोघे गप्पच होतो. बहुधा दोघांच्या मनात एकच विचार चालू असावा.

विचार. धर्माचे. श्रद्धेचे. धार्मिक उत्सवाचे. उत्सवाच्या व्यवसायाचे. यातूनही श्रद्धा ठेवणाऱ्या भाविकांचे. ही श्रद्धा म्हणायची की दुबळ्या मनाची सवय ?

चौक आला, मित्र गेला. मी समोर पाहिले. आळीच्या मंडळाच्या गणपतीचा अर्धवट तयार झाला होता. सुतार जरा थकून विडी हाणत होता.

"केव्हा मांडव पुरा होणार ?" मी सहज विचारले.

"दोन दिवस तरी लागणारच !" सुतारबुवा ठामपणाने म्हणाले.

"मग, देव केव्हा बसवणार ?"

"बसेल संध्याकाळी—रात्रीपर्यंत."

"मंडळी दिसत नाहीत."


"ती गेलीत ढोल-ताशा आणायला."

"म्हणजे उशीर होणार गणपती बसायला."

"त्यांना कुठं घाई आहे ?"

सुतारबुवांनी विडी विझवून टाकून दिली आणि तें काडीने कान कोरू लागले.

□

**लेखक : विजय परुळकर**

**सचित्र-आवृत्ती**
**पंचरंगी मुखपृष्ठ**
**किंमत : रुपये छत्तीस**

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव
पुणे ३०.

अवती भवती । शरद कृष्णन्

# नॅशनल कॉन्फरन्समधील सत्तांतर–पिताजींच्या जागी चिरंजिवांची वर्णी

जम्मू–काश्मीर या महत्त्वपूर्ण व संवेदनाक्षम राज्यामध्ये सत्ता आहे शेख अब्दुल्ला यांची आणि राजकीय पक्ष नावाची चीज अस्तित्वात असेल तर ती आहे नॅशनल कॉन्फरन्स. अगदी अलीकडेच इंदिरा काँग्रेसने थोडी फार वळवळ करून पाहिली; परंतु शेखसाहेबांच्या पुढे डाळ शिजू शकली नाही. आयकर खात्याने जम्मू–काश्मीरमध्ये काळा पैसा काढण्यासाठी धाडी घातल्या; पण या धाडी ज्या मंडळींवर घातल्या गेल्या त्यांपैकी अनेक व्यक्ती सत्ताधारी पक्षाशी संबंधित असल्याने नॅशनल कॉन्फरन्सने या धाडीविरुद्ध तर आवाज उठवलाच; पण केंद्र सरकार व इंदिरा काँग्रेस यांच्याविरुद्ध जोरदार आघाडी उघडली. प्रकरण चांगलेच तापू लागल्यावर राजीव गांधी काश्मीर–दौरा करून आले. त्यांनी प्रामुख्याने इंदिरा काँग्रेस कार्यकर्त्यांबरोबर वाटाघाटी केल्या. एकंदर परिस्थितीची पाहणी केली. जम्मू–काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सशी संघर्ष करणे शक्य नाही आणि शेखसाहेबांबरोबर उघड उघड सामना करणे, परवडण्यासारखे नाही, हे त्यांच्या लक्षात आले. दिल्लीला परत आल्यावर मातजींनी त्यांनी काश्मीरला भेट देणे जरूर असल्याचा सल्ला दिला; जम्मू–काश्मीरचे राज्यपाल श्री. नेहरू यांनी शेखसाहेबांबरोबर थोड्या फार वाटाघाटी करून इंदिराजींच्या भेटीला अनुकूल असे वातावरण तयार केले आणि त्यानंतर इंदिराजी व शेखसाहेब यांची भेट झाली. बरेच गैरसमज दूर झाले. केंद्रशासन आपल्याला सत्ताभ्रष्ट करण्याच्या तयारीत नाही अशी शेखसाहेबांची खात्री झाली. वातावरण काहीसे निवळले. जम्मू–काश्मीरमध्ये शेखसाहेब आणि नॅशनल कॉन्फरन्स याखेरीज अन्य कोणाला फारसे स्थान नाही हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले.

शेख अब्दुल्ला आजपर्यंत नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष होते आणि मुख्यमंत्रीपदाची जबाबदारीही त्यांच्याकडेच आहे; पण आता आपली उमर झाली आहे याची त्यांना जाणीव आहे. जम्मू–काश्मीरमध्ये सत्तांतर घडवून आणण्याच्या दृष्टीने त्यांनी पावले टाकण्यास सुरुवात केली असून अगदी अलीकडेच त्यांनी आपल्या चिरंजिवांना आपल्या पक्षाच्या अध्यक्षपदी विराजमान केले आहे. याबाबतचे निर्णय त्यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी घेतले असावेत; पण तसा सुगावा मात्र त्यांनी लागू दिला नाही. शेखसाहेब मिर्झा अफझुल बेग यांच्या हाती सत्ता सुपूर्त करतील असा एक अंदाज होता; पण शेख अब्दुला यांनी, एके काळी त्यांचा उजवा हात समजल्या गेलेल्या या मिर्झा अफझुल बेग यांना पक्षातून काढून टाकले.

मिर्झा अफजल बेग यांची हकालपट्टी झाल्यावर नॅशनल कॉन्फरन्समध्ये मोठी फूट पडेल असे अनेकांना वाटले होते; पण तसे काही झाले नाही; पक्ष आणि शासन या दोन्हीवर शेखसाहेबांची घट्ट पकड असल्याची प्रचीती आली. त्यानंतर सत्तासराचा जेव्हा केव्हा प्रश्न निघाला त्या वेळी शेखसाहेबांच्या जावयाचे नाव घेतले जाऊ लागले आणि शेख अब्दुल्ला त्यावर कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त करत नसल्याने, असा बदल घडवून आणण्यास ते अनुकूल आहेत, असाच सर्वसाधारण ग्रह झाला. शेखसाहेबांचे हे जामात श्री. जी. एम्. शहा, आपण आज ना उद्या मुख्यमंत्री होणार असेच गृहीत धरून चालले होते. त्यामुळेच शेखसाहेबांनी ज्या वेळी नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्षपद आपल्या चिरंजिवांकडे सोपवायचे ठरवले त्या वेळी शहा काहीसे अस्वस्थ झाले. आपली नाराजीही त्यांनी व्यक्त केली; परंतु यापेक्षा जास्त काही करणे हितावह नाही हे ओळखूनच त्यांनी त्यानंतरची पावले टाकली. शेखसाहेबांच्या चिरंजिवांना पक्षाध्यक्षपदी विराजमान करण्याचा हा सोहाळा चांगलाच गाजला. या कार्यक्रमाला भरपूर प्रसिद्धी मिळेल अशी दक्षताही जम्मू–काश्मीरच्या प्रसिद्धिखात्याने घेतली. पक्ष आणि शासन यांच्यामध्ये अजिबात फरक नसल्याने शासकीय कामकाज करणाऱ्या मंडळींना पक्षामधील महत्त्वपूर्ण हालचालींची दखल घ्यावीच लागते. शेख अब्दुल्ला यांचे चिरंजीव डॉ. फरुक अब्दुल्ला पक्षाध्यक्षपद स्वीकारण्यापूर्वी नॅशनल कॉन्फरन्सच्या युवक–विभागाचे प्रमुख होते. फरुकसाहेबांनी या पदावरून जी भाषणे केली आणि जे विचार व्यक्त केले ते पाहता ते एकंदर भडक माथ्याचेच दिसतात. तसेच मुसलमानांच्या बाबतीत त्यांचे धोरण कमालीचे पक्षपाती असल्याचे दिसून येते. 'काश्मिरी मुसलमान' या विषयावर त्यांनी एक भाषण केले होते. त्यामध्ये काश्मीरचा उल्लेख त्यांनी 'मुस्लिम–इंडिया' असा केला होता. युवक व्यासपीठावरून त्यांनी केलेली भडक भाषणें, जमात–ए–इस्लामसारख्या निखळ जातीय संघटनेच्या नेत्याने केल्याप्रमाणे वाटतात. अर्थात आता नॅशनल–कॉन्फरन्सचे अध्यक्षपद स्वीकारल्यावर त्यांना जास्त जबाबदारीने वागावे लागेल. जाहीर व्यासपीठावरून तरी अशी जातीय गरळ त्यांना ओकता येणार नाही. आज नॅशनल–कॉन्फरन्सची सूत्रे त्याच्या हाती देणे याचा सरळ सरळ अर्थ असा की, काश्मीरच्या मुख्यमंत्रिपदाची वाट डॉक्टर फरुकसाहेबांना मोकळी करून देणे. शेखसाहेबांनी अगदी हिशेबी पद्धतीने हे पहिले पाऊल टाकले आहे. काश्मीरमध्ये आज सत्तेवर असलेल्या या सरकारची मुदत १९८३ मध्ये संपते. त्यानंतर आपण मुख्यमंत्रिपदी राहणार नाही असे शेखसाहेब आत्ताच सांगत आहेत. म्हणजेच आणखी दोन वर्षांनी काश्मीरचे मुख्यमंत्रिपद खाली होत असून, त्या जागी डॉ. फरुक शेख जाऊन बसणार ही आता सर्व विदित गोष्ट झालेली आहे. हा जो दोन वर्षांचा कालखंड मिळाला आहे त्यामध्ये डॉ. फरुक पक्षावर आपली घट्ट पकड बसवतील. काश्मीरमध्ये ज्या वेळी निवडणुका होतील त्या वेळी नॅशनल कॉन्फरन्सचे उमेदवार निवडताना फरुकसाहेबांना पूर्ण स्वातंत्र्य दिले जाईल आणि ८३ नंतरच्या

जम्मू-काश्मीरच्या विधानसभेवर फरुकसाहेबांचे पूर्ण वर्चस्व असल्याची खातरजमा करून घेऊन आणि त्यांना मुख्यमंत्रीपदी विराजमान करून शेखसाहेब निवृत्त होतील. आपल्या जावयावर त्यांचे बारीक लक्ष असून तो त्रासदायक ठरणार नाही याची दक्षता ते घेत आहेत.

### दगडापेक्षा वीट मऊ

आपला राजकीय वारसा आपल्याच कुटुंबियाकडे देण्याची प्रथा जर राष्ट्रीय पातळीवर चालते, तर शेखसाहेबांनी तसे योजनापूर्वक केले तर त्यात काही फार मोठे वावगे आहे असे म्हणता येणार नाही. डॉ. फरुक यांची शेखसाहेबांनी निवड केली हे त्यातल्या त्यात बरे म्हणावे लागेल. कारण तारिक अब्दुल्ला हे काश्मीर वादाबाबत सरळ सरळ पाकिस्तानवादी आहेत. निदान ते तसे होते असे जरूर म्हणता येईल. कारण एकदा तर या तारिकसाहेबांनी युनोमध्ये काश्मीरचा प्रश्न निघाला असताना, पाकिस्तानी प्रतिनिधी म्हणून काम केले आहे. पुढे याबाबतचे त्यांचे विचार निवळले आणि आपले पिताजी १९७५ साली २२ वर्षांच्या विजनवासानंतर पुन्हा काश्मीरच्या मुख्यमंत्रिपदी विराजमन झाल्यानंतर तारिक अब्दुल्ला भारतामध्ये परत आले. मुख्य मंत्र्यांचे हे चिरंजीव, राज्यशासनाच्या सेवेत असून जम्मू-काश्मीर टुरिझम कार्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत आणि विशेष आश्चर्याची बाब म्हणजे राजकीय हालचालीमध्ये ते प्रत्यक्षपणे कोणताही भाग घेत नाहीत.

डॉ. फरुक शेख संसदसदस्य आहेत. ते राजकारणात आले नसते तर निष्णात धन्वंतरी म्हणून त्यांनी नावलौकिक संपादन केला असता. बारा वर्षे परदेशी राहून परत आल्यावर त्यांनी काही काळ वैद्यकीय व्यवसाय केला खरा; परंतु लवकरच ते राजकारणामध्ये ओढले गेले. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रामध्ये १२ वर्षे वास्तव्य केल्यानंतर, राजकीय विचाराबाबत काही विशाल दृष्टिकोन तयार झाला असेल अशी जर कोणाची अपेक्षा असेल तर ती साफ चूक मानावी लागेल. आज तरी कडवे जातीयवादी अशीच त्यांची प्रतिमा आहे. वडिलांच्या नावाला असलेली झळाळी त्यांना नाही. १९५३ ते १९७५ अशी बावीस वर्षे तुरुंगवासात घालवूनही शेखसाहेबांच्या लोकप्रियतेमध्ये घट झाली नाही. बक्षी गुलाम अहमद किंवा सय्यद मीर कासीम यांच्या हाती सत्ता असूनही त्यांना शेखसाहेबांचे स्थान कधी प्राप्त झाले नाही. काश्मीरची सत्तासूत्रे शेखसाहेबांच्या हाती असणेच हितावह आहे अशी खातरजमा करून घेऊनच इंदिराजींनी शेखसाहेबांना परत सत्तेवर आणले. ७८ साली झालेल्या निवडणुकांमध्ये शेखसाहेबांनी प्रचंड विजय मिळवून, काश्मीर म्हणजे नॅशनल कॉन्फरन्स आणि नॅशनल कॉन्फरन्स म्हणजे मी हे पुन्हा एकदा सिद्ध केले. गेल्या ३५ वर्षांच्या काळामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाला काश्मीरमध्ये स्वतःची अशी ताकद उभी करता आलेली नाही आणि आजही नॅशनल कॉन्फरन्सखेरीज कोणताही पर्याय दृष्टिक्षेपात नाही. प्रादेशिक पक्ष आपल्याकडे नाहीत असे नाही. तामिळनाडूमध्ये ए. आय. डी. एम. के. प्रबळ आहे. पंजाबमध्ये अकाली आहेत; परंतु असे असले तरी प्रादेशिक पक्षांना शह देण्याचे प्रयत्न चालू आहेत आणि त्यांना थोडेफार यशही मिळत आहे. जम्मू-काश्मीरमध्ये मात्र, तेथील जनता शेख अब्दुल्ला आणि त्यांचा पक्ष याखेरीज अन्य काही मानण्यास तयार नाही. भारतामध्ये काश्मीरचे झालेले सामिलीकरण अपरिवर्तनीय आहे, हे शेखसाहेबांनी मान्य केले असले आणि या प्रश्नावर काश्मिरी जनतेचे मत अजमावण्याची मागणी त्यांनी सोडून दिली असली तरी भारताबाबत स्थानिक जनतेच्या मनात थोडीफार अढी जरूर आहे. ही अढी दूर करण्याचा प्रयत्न नॅशनल कॉन्फरन्सने कधीच केला नाही. उलट काश्मिरी जनतेचे वेगळेपण राखण्याचा सातत्याने आटापीटा केला. डॉ. फरुक शेख याबाबतीतही आक्रमक भूमिका घेतील असेच त्यांच्या वक्तव्यावरून दिसते. सत्ताधारी पक्षाचे अध्यक्ष म्हणून केलेल्या पहिल्याच भाषणात त्यांनी ज्या मागण्या पुढे रेटल्या आहेत त्या चिंताजनक आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सखेरीज अन्य राजकीय पक्षाना स्थान नाही हे खरे असले तरी त्याचा अर्थ असा नव्हे की, तेथे राजकीय पक्षांनी काम करू नये; परंतु फरुक शेख म्हणतात की, काश्मीरमधून इंदिरा काँग्रेसने आपला गाशा गुंडाळावा. काश्मीरला नॅशनल कॉन्फरन्सखेरीज अन्य कोणत्याही पक्षाची गरज नाही. इंदिरा काँग्रेसचे काम करणाऱ्या सर्वांनी नॅशनल कॉन्फरन्समध्ये यावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. विरोधक खपवून न घेण्याची ही भूमिका जास्त ताठर होण्याचा संभव असल्याने अन्य राजकीय पक्षांनी फरुकसाहेबांच्या या विचारांविरुद्ध आवाज उठवण्याची वेळ आली आहे.

जम्मू-काश्मीर हे भारतीय संघराज्याचा एक भाग ही वस्तुस्थिती मान्य केल्यावर हळूहळू या राज्याला इतर राज्यांच्या पातळीवर आणून ठेवणे ही एक स्वाभाविक व आवश्यक प्रक्रिया असून केंद्र सरकारने हळूहळू परंतु निश्चितपणे पावले टाकली आहेत. आता फरुकसाहेब असे म्हणतात की, जम्मू-काश्मीरबाबत १९५४ ते १९७५ या कालखंडामध्ये जे काही बदल संसदेच्या मंजुरीने करण्यात आले ते सर्व रद्दबातल करण्यात यावेत व १९५३ मध्ये जम्मू-काश्मीरला जेवढी स्वायत्तता होती तेवढी स्वायत्तता पुन्हा प्रदान करण्यात यावी. अर्थातच हे आता संभवनीय नाही; परंतु नवीन नेतृत्वाखाली उभारी घेत असलेली नॅशनल कॉन्फरन्स कोणत्या दृष्टीने विचार करत आहे याची दखल घेऊन जबाबदार राजकीय पक्षांनी आपली पावले टाकली पाहिजेत. जम्मू-काश्मीरमध्ये सर्वेसर्वा असलेल्या नॅशनल कॉन्फरन्सच्या नवीन नेतृत्वाच्या या हालचाली पाहिल्या की, शेखसाहेब हालले तरी काश्मीरची डोकेदुखी संपणार नाही असे दिसते.

## □ राज्यपाल टी. एन्. सिंग

### राजभवनातून विधायक कार्याकडे

बंगालचे राज्यपाल टी. एन. सिंग हे गेले दोन–तीन महिने सतत बातमीमध्ये चमकत होते. राज्यपाल हे सर्वसाधारणपणे नेमणुका, निवृत्ती, सभा-संमेलने व उद्घाटनसमारंभ एवढ्यापुरतेच बातमीमध्ये असतात; पण सिंग हे राज्यपाल असूनही ज्योती बसू सरकारशी ज्या पद्धतीने सूत जमवून होते त्याबाबत केंद्राची नाराजी त्यांच्या

कानी घालण्यात आली होती; पण तरीही श्री. सिंग प. बंगालच्या शासनाबाबतचे धोरण बदलण्यास तयार नव्हते. त्यानंतर इंदिराजींनी त्यांना हरिकिशन शास्त्रीमार्फत असा निरोप दिला की, त्यांनी राजिनामा देणे हितावह ठरेल. त्यावर श्री. सिंग यांनी ज्या पद्धतीने त्यांना राजिनाम्याबाबत सुचवण्यात आले त्याबद्दल विलक्षण तिखट पत्र लिहिले. त्यामुळे श्री. सिंग यांनी जावे हा निर्णय आणखीनच पक्का झाला. फक्त पटवारी अथवा तिलक यांच्याप्रमाणे त्याना बडतर्फी स्वीकारावी लागली नाही. त्यांनी आपण होऊन राजिनामा दिला आणि तो स्वीकारला गेला.

*श्री. सिंग हे माजी पंतप्रधान कै. लालबहादूर शास्त्री यांचे अगदी* वर्गमित्र. दोघे एकाच सायकलवरून शाळेत जात असत. दोघानाही राजकीय चळवळीमध्ये भाग घेतल्याबद्दल शाळा सोडावी लागली. पुढे हे दोघे काशी विद्यापीठामध्ये पुन: एकत्र आले. आपल्या व्यक्तिगत कर्तृत्वावर दोघाचीही राजकीय क्षेत्रामध्ये यशस्वी वाटचाल चालू होती. शास्त्रीजी पंतप्रधान असताना त्यांनी टी. एन. सिंग यांचा आपल्या मंत्रिमंडळामध्ये समावेश केला होता. आज आपल्या मित्राच्या मुलाकरवी, आपल्याला ज्या पद्धतीने राजिनामा देण्याबाबत सुचवण्यात आले, तो प्रकार सर्वथैव अवैध, भारतीय घटनेच्या दृष्टीने मर्यादांचे उल्लंघन करणारा आणि प्रथेच्या दृष्टीने सर्वस्वी अयोग्य असा प्रकार असल्याचे मत त्यांनी नोंदले आहे.

आपल्या राजिनाम्याबाबत श्री. सिंग यांना असे वाटते की, राज्यसरकारबरोबर संघर्षात्मक ताठर भूमिका न घेतली गेल्याने केंद्राने आपल्याकडे राजिनामा मागितला. राज्यसरकारचे काम समाधान*कारक असल्याची आपली खात्री असताना केवळ केंद्रशासन सांगते* म्हणून या सरकारबाबत ताठर भूमिका स्वीकारणे जमण्यासारखे नाही. सिंग म्हणतात आपल्या सदसद्विवेक बुद्धीलाही ते पटणार नाही. ज्योती बसू सरकारला असे वाटते की, प. बंगाल विधानसभा निवडणुकापूर्वी आपले शासन बरखास्त करण्याचा केंद्राचा विचार असून, राज्यपालाकडे राजिनामा मागणें हे त्या दृष्टीने टाकलेले पाऊल आहे. प. बंगाल–इंदिरा कॉंग्रेसच्या मते केंद्र आणि राज्यशासन यांच्यामधील दुवा असलेल्या राज्यपालाने, आपण जणु काही राज्यसरकारचाच एक भाग आहोत असे भासवणे सयुक्तिक नाही. त्यात केंद्र–शासन या विरोधी पक्षाच्या राज्यशासनाबद्दल कमालीचे असमाधानी असताना अशी भूमिका घेणे सर्वथैव अयोग्य आहे. कारणे कोणतीही असोत; परंतु दीर्घकाळ कॉंग्रेसचेच कार्य केलेल्या आणि साध्या राहणीबद्दल विशेष लौकिक असलेल्या श्री. सिंग यांच्या बाबतीत असा दुर्दैवी प्रकार घडावा याचा अनेकांना खेद होतो. सिंग यांची प्रदीर्घ राजकीय कारकीर्द म्हणजे नितळ राजकीय जीवनाचा आलेख आहे. स्वातंत्र्यसैनिक, शिक्षक, पत्रकार, अल्पकाळ उ. प्रदेशचे मुख्यमंत्री, संसदसदस्य, केंद्रीय मंत्रिमंडळामधील मंत्री आणि आता प. बंगालचे राज्यपाल असा हा प्रवास आहे. जनता सरकारने सत्तेवर आल्याबरोबर जे राज्यपाल नेमले त्यांपैकी श्री. सिंग हे एक. त्यांची चार वर्षांहून जास्त मुदत पूर्ण झाली असल्याने नियमाप्रमाणे ते वर्षभरात निवृत्त झाले असते. अराजकीय स्वरूपाचे राज्यपालपद त्यांना राजकीय कारणासाठी सोडावे लागले हा एक विचित्र योगायोग मानला पाहिजे.

## मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा

सिंग यांनी दिल्लीच्या हिंदुस्थान टाइम्स, लखनौच्या नॅशनल हेरॉल्ड आणि समाजवादी विचारसरणीचे साप्ताहिक 'संघर्ष' या संस्थांमध्ये पत्रकार म्हणून काम पाहिले. पुढे संसदसदस्य असताना लोकसभेमध्ये त्यांनी कै. फेरोझ गांधी यांच्या सहकार्याने प्रसिद्ध जीपप्रकरण उघडकीस आणून कै. कृष्ण मेनन यांना चांगलेच अडचणीमध्ये आणले होते. १९५७ मध्ये त्यांनी बनारस मतदारसंघामधून लोकसभेची निवडणूक लढवून, कै. राम मनोहर लोहिया यांना पराभूत केले होते. त्यांच्या राजकीय कारकार्दीमधील तो विजय महत्त्वपूर्ण मानावा लागेल. आपल्या राजकीय जीवनात त्यांनी अनेक चढउतार पाहिले; परंतु सर्वांत झोंबरा पराभव त्याना उ. प्रदेशचे मुख्य मंत्री असताना स्वीकारावा लागला. मात्र पोटनिवडणुकीमध्ये पराभूत झाल्यावर त्यांनी लगेच मुख्यमंत्रीपदाचा राजिनामा देऊन टाकला व निवडणुकाद्वारा मतदारानी दिलेल्या कौलाचा आदर केला. ताश्कंद येथे कै. शास्त्री याचे निधन झाले त्या वेळी ते केंद्रात मंत्री होते. कै. शास्त्री याच्या निधनाची चौकशी व्हावी अशी मागणी त्यांनी केली. १९६९ साली कॉंग्रेसमध्ये मोठी फूट पडल्यावर त्यांनी संघटना कॉंग्रेसमध्ये राहणे पसंत केले आणि शेवटी राज्यपालपदी नेमणूक होईपर्यंत ते त्याच कॉंग्रेसचे सदस्य होते. राज्यपालपद स्वीकारणाऱ्या व्यक्तीने काही संकेत पाळणे जरूर असते. राजकारण ज्याच्या हाडीमासी खेळले आहे अशा व्यक्तीला या संकेताच्या चौकटीमध्ये काम करणे अवघड जाते. कै. काकासाहेब गाडगीळ यांनी राज्यपालपद कोंडमारा झाल्यामुळेच सोडले होते. सिंग यांची प. बंगालच्या डाव्या आघाडीच्या सरकारला जी सहानुभूती होती ती त्याना नडली.

आता सेवानिवृत्तीनंतर नवी दिल्ली येथे जाण्याचा त्यांचा मानस नाही. तसेच ते लखनौलाही परतणार नाहीत. त्यांच्या नजीकच्या मंडळींनी पुरवलेल्या माहितीप्रमाणे सिंग स्वत:च्या हुरना जिल्ह्यामध्ये परत जाणार असून विधायक कार्याला वाहून घेणार आहेत. या भागामधील १२ खेड्यांच्या विकासाचे काम शास्त्री सेवा निकेतन ट्रस्टने हाती घेतले आहे. सिंग हे या ट्रस्टच्या कामात सहकार्य करणार आहेत. राज्यसरकारला नको असलेले अनेक राज्यपाल प. बंगालमधून परत गेले आहेत. धर्मवीर व सरीन यांचा या संदर्भात उल्लेख करता येईल; परंतु राज्यसरकारला हवे असूनही ज्याना केंद्रसरकारच्या इच्छेप्रमाणे राजीनामा द्यावा लागत आहे असे सिंग हे पहिले राज्यपाल आहेत. □


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# लुटुपुटूच्या लढाईतील शस्त्रास्त्रांवर बंदी घालावी काय?

कि. मो. फडके, डायरेक्टर, फडके सेंटर, मुंबई

दिवाळीच्या सुट्टीत किल्ला करण्यात दंग असलेली शाळकरी मुले दुरून पाहणेसुद्धा किती आनंददायक असते! मातीचा किल्ला बांधण्याचे काम एकीकडे चालू असताना किल्ल्याची तटबंदी, भोवती खणावयाचा खंदक व एकूण परिसराची रचना कशी करीत जावे याबद्दल एकएकजण नव्या नव्या कल्पना अगदी उत्साहाने सुचवीत असतो व सर्वजण मिळून प्रत्येक नव्या नव्या कल्पनेचा खल करीत करीत हातातील काम पुढे चालू ठेवत असतात आणि अखेर किल्ल्याभोवती मावळे व इतर चित्रे मांडून लढाईचा देखावा करण्याची वेळ झाली की तर त्या बालचमूतील प्रत्येकाला काही तरी नवी नवी शक्कल सुचत असते. किंबहुना किल्ला करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी व जमवाजमव करतानाही लढाईचा देखावा उभा करण्यासाठी लागणारे मावळे व इतर साहित्य यांना शाळकरी मुलांमध्ये बहुधा अनन्यसाधारण महत्त्व असते. तसेच, लढाईचा देखावा परिणामकारक होण्यासाठी त्याची मांडणी पुन्हा पुन्हा करण्याचा कोणाला कंटाळा म्हणून आलेला आपल्याला दिसत नाही.

मावळ्यांची चित्रे जमवून लढाईचा देखावा हुबेहुब वठविण्याची ही हौस कधी कधी मोठ्या माणसांनाही इतकी आकर्षक वाटते की, काही मोठी माणसेही अशा वेळी बाल–गोपालाच्यात केव्हा सामील होतात ते त्याचे त्यांनाही कळत नाही. लुटुपुटुच्या लढाईबद्दल माणसाला वाटणारे आकर्षण बहुधा सार्वत्रिक असावे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. सुप्रसिद्ध आंग्ल–मुत्सद्दी सर विन्स्टन चर्चिल आपल्या बालवयातील आठवणींसंबंधी लिहिताना तर असे म्हणतात की, मोठेपणी त्यांना लष्करातील जीवनक्रमाबद्दल जी ओढ वाटली त्याचे प्रमुख कारण त्यांनी लहानपणी खेळण्यातील शेकडो शिपाई-गडी जमवून ज्या लुटुपुटूच्या लढाया खेळल्या होत्या त्यातच शोधावे लागेल. त्यांना खेळण्यातील शिपाई जमविण्याचे इतके वेड होते की, लहानपणी म्हणे त्यांच्याकडे पंधराशे शिपाई गड्यांची फौज होती!

दिवाळीत मुले करतात त्या किल्ल्याभोवती मांडावयाचे पारंपारिक पद्धतीने बनविलेले मातीचे मावळे काय, किंवा अगदी चर्चिल लहानपणी खेळण्यासाठी उपयोग करीत असत त्या तऱ्हेचे शिपाईगडी काय, आता खूपच मागे पडले आहेत. आज–कालच्या जमान्यातील मुलांच्या हातात जी अनेक अद्ययावत खेळणी दिसतात त्यांपैकी लढाईशी संबंधित असलेली खेळणी, तांत्रिकदृष्ट्या किती तरी सुधारलेली आहेत. आधुनिक जगातील प्रत्यक्ष युद्धात जी संहारक शस्त्रे वापरण्यात येणे शक्य आहे तशा प्रकारच्या शस्त्रास्त्रांच्या हुबेहुब प्रतिकृती मुलांना आज लुटुपुटूच्या लढाईत वापरण्याची खेळणी म्हणून बाजारात मिळू शकतात. आणि मुलांनाही खेळण्यातील का होईना पण विजेवर चालणारे रणगाडे, विमाने व बंदुकांचे अनेक प्रकार या गोष्टींचे, किती जबरदस्त आकर्षण वाटत असते, हे खेळण्याच्या दुकानात ओझरती चक्कर टाकली तरी सहज लक्षात येते.

लहान मुले अशा आधुनिक व तांत्रिकदृष्ट्या विकसित खेळण्यांचा उपयोग करून लुटुपुटूच्या लढाईचा खेळ खेळतात व आपले मनोरंजन करून घेतात, यात बहुधा मोठ्या माणसांना काही वावगे वाटत नाही; परंतु अलीकडे काही विचारवंतांना अशी लुटुपुटूची लढाई, म्हणजे, एक चिंताजनक समस्या वाटू लागली आहे. अशा लुटुपुटुच्या लढाईत लहान मुले, ज्या संहारक शस्त्रास्त्रांच्या प्रतिकृतींचा खेळणी म्हणून वापर करतात त्यामुळे माणसातील विद्वेषी, आक्रमक, क्रूर व हिंसाचारी प्रवृत्ती उद्दीपित होतात व त्यांना चालना मिळते, असे काही विचारवंतांना प्रामाणिकपणे वाटते. म्हणून ते विचारवंत असे प्रतिपादन करतात की, माणसातील अनिष्ट प्रवृत्तींना उत्तेजन देणारी अशी खेळणी अखेरीस समाजाला विघातक ठरण्याची शक्यता असल्यामुळे त्यांच्यावर कायद्याने बंदी घालण्यात यावी. स्वीडनमध्ये या विषयावर राजकीय व सामाजिक स्तरांवर बरीच उलटसुलट चर्चा झाली व अखेर १९७९ साली मुलांच्या खेळण्यातील अशा तऱ्हेच्या आधुनिक शस्त्रास्त्रांवर कायद्याने बंदी घालण्यात आली, या कायद्यानुसार, युद्धासंबंधीचे खेळ व खेळातील लष्करी फौजा यांच्यावरही मनाई करण्यात आली. म्हणजे आधुनिक खेळणी वापरून लुटुपुटूची लढाई खेळण्याच्या सवयीमुळे मुलांच्यामधील विध्वंसक प्रवृत्तींना उत्तेजन मिळेल व ते अखेरीस समाजाला घातक ठरेल व म्हणून अशा खेळण्यांवर बंदी घालणे योग्य आहे, असे मत हिरीरीने मांडणाऱ्यांचा स्वीडनमध्ये तरी विजय झाला असे म्हटले पाहिजे.

परंतु एखाद्या देशाने एक विशिष्ट मतप्रणाली ग्राह्य मानली व त्यानुसार कायदा केला म्हणून काही ती मतप्रणाली बरोबर आहे असे सिद्ध होत नाही, वरील मतप्रणालीत दोन मुख्य सिद्धांत गृहीत धरलेले आहेत. पहिला सिद्धांत असा की, आधुनिक जगातील दोन संहारक शस्त्रास्त्रांच्या प्रतिकृती खेळणी म्हणून वापरल्यामुळे मुलांमधील विद्वेषी, आक्रमक, क्रूर व हिंसक प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळते. आणि दुसरा सिद्धांत असा की, मुलांमध्ये अशा अनिष्ट प्रवृत्ती वाढीस लागू नयेत म्हणून काही तऱ्हेचे खेळ व खेळणी यांच्यावर कायद्याने बंदी घालणे हा मार्ग योग्य आहे. या दोन्ही सिद्धांतांकडे निरनिराळ्या दृष्टिकोणांतून पाहता येणे शक्य असले तरी मुख्यत्वेकरून मानसशास्त्रज्ञ या सिद्धांताविषयी कोणत्या प्रतिक्रिया व्यक्त

करतील असा प्रश्न अनेक सुशिक्षित लोकांच्या मनात निर्माण होणे साहजिकच म्हणावे लागेल. अमेरिकेतील 'द रिॲलिस्ट' या नियतकालिकाने या विषयाची मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून चिकित्सा करणारा एक लेख काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला होता. त्या लेखाचे नाव होते : शुड वुई बॅन वॉर-टॉइज् ?

### वाचकांनी उपस्थित केलेला प्रश्न

वरील लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी त्या लेखाचे लेखक व अमेरिकेतील विख्यात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अल्बर्ट एलिस यांनी त्याच नियतकालिकाच्या एका अंकात 'अश्लील वाङ्मयावर बंदी घालावी काय ?' या प्रश्नाचा ऊहापोह करणारा एक निबंध प्रसिद्ध केला होता. अश्लील वाङ्मयामुळे मुलांच्या मनावर विशेषकरून अनिष्ट परिणाम होतात व म्हणून तशा प्रकारच्या वाङ्मयावर कायद्याने बंदी घालावी, या मताचा समाचार घेताना डॉ. अल्बर्ट एलिस यांनी अशी भूमिका घेतली होती की, एक तर अश्लील वाङ्मय मुलांना विशेष करून अपायकारक असते असे म्हणावयास काही पुरावा उपलब्ध नाही आणि दुसरे असे की, समजा, अश्लील वाङ्मय वाचल्यामुळे मुलांवर अनिष्ट परिणाम होतात असे जरी सिद्ध झाले तरी अश्लील वाङ्मयावर कायद्याने बंदी घालण्यामुळे जे काही फायदे होण्याची शक्यता आहे त्यापेक्षा नुकसान होण्याची शक्यताच अधिक आहे. डॉ. अल्बर्ट एलिस यांच्या या मतामुळे 'द रिॲलिस्ट' या नियतकालिकाच्या काही वाचकांनी असा प्रश्न उपस्थित केला की, लुटुपुटूच्या लढाईत मुले जी खेळणी आज-काल वापरीत असतात त्यामुळे मुलांना काही अपाय होणे संभवते काय ? आणि समजा, अशा आधुनिक खेळण्यांचा मुलांच्या मनावर अनिष्ट परिणाम होत असेल तर अशा तऱ्हेच्या खेळण्यांवर कायद्याने नियंत्रण घालणे किंवा सामाजिक बहिष्कार टाकणे योग्य होईल काय ?

'द रिॲलिस्ट' या नियतकालिकाच्या काही वाचकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचा मानशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करण्यासाठी डॉ. अल्बर्ट एलिस यांनी जो निबंध लिहिला तो म्हणजेच : शुड वुई बॅन वॉर-टॉइज् ?. या निबंधात डॉ. अल्बर्ट एलिस यांनी मुख्यतः माणसाच्या मनातील विद्वेष या भावनेसंबंधी व त्या अनुषंगाने माणसातील आक्रमक व हिंसक प्रवृत्तीसंबंधी त्यांनी स्वतःच शोधून काढलेल्या विवेकनिष्ठ-मानसोपचारशास्त्राच्या दृष्टिकोणातून काही मूलगामी विवेचन केले आहे. प्रस्तुत लेखात त्या निबंधातील विचारांचा वाचकांना सारांशाने परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. अल्बर्ट एलिस यांच्या मते, लहान मुले लुटुपुटूची लढाई खेळताना ज्या आधुनिक शस्त्रास्त्रांच्या प्रतिकृतींचा खेळणी म्हणून उपयोग करून मौज लुटतात त्यामुळे त्यांच्या मनातील द्वेषाला व इतरांची खोड मोडण्यासाठी ज्याचा अवलंब करता येईल अशा अनेक प्रकारच्या आक्रमक व हिंसक प्रवृत्तींना खत-पाणी मिळेल व त्यामुळे मुलांच्या मनावर एकूण अनिष्ट परिणाम होऊ शकेल, ही शक्यता क्वचितच विचारार्ह म्हणावी लागेल. लुटुपुटूच्या लढाईत वापरण्याची आधुनिक खेळणी मोठ्या प्रमाणावर विकली गेली तर त्यामुळे मुलांच्या मनावर अपायकारक परिणाम होतो असे ठामपणे सिद्ध करणारा शास्त्रीय पुरावा जरी आज उपलब्ध नाही, तरी मुलांच्या मनावर अशा प्रकारचा अनिष्ट परिणाम होऊ शकतो असे म्हणावयास काही वस्तुस्थितीचा दाखला आजही देता येण्यासारखा आहे, हे नाकारता येणार नाही. जर लहान मुले अश्लील वाङ्मय वाचतील व त्यामुळे त्यांच्या लैंगिक वासना उद्दीपित होऊन ती मुले आपल्या चाळवल्या गेलेल्या वासनांची तृप्ती करतील तर त्यामुळे फार-थोडे अपायकारक परिणाम दृष्टोत्पत्तीस येतील; कारण कामवासनेची तृप्ती हा फार मोठा विलक्षण आनंद आहे व तो आनंद या जगात कमी प्रमाणात उपलब्ध होण्याऐवजी अधिक प्रमाणात उपलब्ध होणेच श्रेयस्कर आहे, अशा मताच्या बाजूने बरेच काही म्हणता येईल. अर्थात, लैंगिक सुखप्राप्तीच्या मार्गात काही तऱ्हेचे शारीरिक रोग, अनौरस संतती इत्यादी अनिष्ट परिणामांचे धोकेही विखुरलेले आहेत; परंतु असे अनिष्ट धोके टाळण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी काही प्रमाणात कामवासनेचे नियंत्रण करणे इष्ट ठरेल आणि सुदैवाने कामवासनेचा नायनाट करण्याचा मूर्ख प्रयत्न करण्याऐवजी कामवासना शहाणपणाने काबूत ठेवणे जरूर शक्य आहे.

तथापि माणसाच्या मनातील विद्वेषाची भावना, आक्रमक प्रवृत्ती व हटवादी राष्ट्रवाद या गोष्टींवर नियंत्रण ठेवणे इतके सोपे आहे असे वाटत नाही आणि लुटुपुटूची लढाई खेळताना मुले आज-काल जी खेळणी वापरतात व खेळातील का होईना, पण शत्रूंचा नायनाट करतात, त्यामुळे त्यांच्यामधील वरील सर्व गोष्टींना नक्कीच प्रोत्साहन मिळते. शीघ्रकोपी माणसे व सतत इतरांना शिव्याशाप देत देत त्यांच्या नावाने खडे फोडणारी माणसे यांचे काळजीपूर्वक निरीक्षण केले तर असे वाटते की, मनुष्यामध्ये अशा काही जन्मजात प्रवृत्ती असाव्यात की, ज्यामुळे त्याला इतरांचा अकारण द्वेष करणे सोपे जात असावे. म्हणून लहान मुलांच्या मानसिक वाढीसंबंधी व त्यानुरूप शिक्षणासंबंधी आपल्याला जर काही सुज्ञपणे करावयाची इच्छा असेल तर त्याच्यामधील या जन्मजात प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी व त्या प्रवृत्तीची तीव्रता कमी करण्यासाठी आपण बराच वेळ व प्रयत्न खर्ची घालण्यास तयार असले पाहिजे. दुर्दैवाने आज लहान मुलांना कळत-नकळत असे शिकविले जात असते की, एखाद्याने दुसऱ्याला ठोसा लगावला किंवा दुसऱ्याच्या छातीत सुरा भोसकला की तो मनुष्य अधिक 'बलवान', 'पौरुषयुक्त' व 'सामर्थ्यवान' ठरतो व त्याचा 'आत्मविश्वास' सिद्ध होतो !

याचा अर्थ असा नाही की, लुटुपुटूच्या लढाईसाठी लहान मुले आज जी खेळणी उपयोगात आणीत असतात तेवढी खेळणीच काय ती मुलांमधील विद्वेषाला, आक्रमकतेला व क्रूर हिंसाचाराला चिथावणी देत असतात. आज-कालच्या परीकथा, लघुकथा, कादंबऱ्या, रहस्यकथा व चित्रपट किंवा दूरदर्शन यासारख्या माध्यमांमार्फत अशा प्रकारचा अनिष्ट परिणाम मुलांच्या मनावर होत असणे शक्य आहे. माणसाचे साहस, सामर्थ्य व शौर्य हे विषय अनेक तऱ्हेच्या माध्यमांतून कधी कधी अशा काही रीतीने हाताळलेले असतात की, ज्यामुळे असे सूचित होते की, जो कोणी माणूस आपला अपमान करील त्याला तत्क्षणीच यमसदनाची वाट दाखविणे म्हणजे काही तरी अफाट कर्तृत्वाचे लक्षण आहे. या संदर्भात ओवेन विस्टेर यांच्या साहित्या-

मुळे अमेरिकेत सर्वत्र प्रसिद्ध असलेला एक वाक्प्रचार असा आहे की, 'तू जर मला विषारी दूषणे देत असशील तर तसे हसत हसत कर!' याचा अर्थ असा की, जर खरोखरच तू ती दूषणे मला गंभीरपणे देत असशील तर मग मात्र मी तुझी जीभ हासडून काढल्याशिवाय मला स्वत बद्दल प्रेम वाटणार नाही; इतकेच काय पण मी माझा तिटकारा करीन किंवा वेगळ्या भाषेत सांगावयाचे म्हणजे या सर्व सामर्थ्याच्या व शौर्याच्या कल्पनेच्या मुळाशी असा अलिखित सिद्धांत दडलेला आहे की, मी तुला आवडत नसेन तर मला स्वतःलाही स्वतःबद्दल प्रेम वाटणार नाही आणि मी तुला आवडत नसेन तर तुझा निःपात करण्यासाठी मी शारीरिक किंवा इतर बळाचा वापर करणे अत्यावश्यक आहे. तुझा एकदा मी अशा प्रकारे नि.पात केला की, मग मला स्वतःबद्दल प्रेम वाटू लागेल. (निदान मला शिव्यांची लाखोली वाहणारा दुसरा एखादा माणूस परत माझ्याभोवती उपटेपर्यंत !)

वरील दृष्टिकोणाचा परिणाम म्हणजे सामान्य अमेरिकी माणूस मानसिकदृष्ट्या कमकुवत व दुबळा झालेला आहे किंवा एका अर्थाने इतरांच्या शब्दांचा गुलामच झालेला आहे. कारण इतरांच्या चेहेऱ्यावरील हावभाव, त्यांनी उच्चारलेले शब्द व त्यांची मते असा माणूस कमालीच्या सहजतेने स्वत.च्या मनाला लावून घेतो व परिणामी इतका हतबल होतो की, मग आपण शूरवीर आहोत हे दाखवून देण्यासाठी शत्रूकडून स्वत.वरऱ्होणाऱ्या संभाव्य हल्ल्यामुळे नेस्तनाबूत न होता सर्व तऱ्हेच्या घातकी शस्त्रांचा अवलंब करून शत्रूचे पारिपत्य करण्यासाठी त्याला सतत सुसज्ज राहावे लागते.

## काल्पनिक जखमांची भरपाई

वस्तुतः इतरांच्या शाब्दिक हल्ल्यामुळे तो नेस्तनाबूत होत नसतो, तर इतरानी वापरलेल्या शब्दाना स्वतःच धार लावून ते शब्द तो आपल्या स्वतःच्या छातीत खुपसून घेत असतो व स्वतःला नेस्तनाबूत करून टाकीत असतो. इतराच्या बोलण्यामध्ये किंवा मतांमध्ये खरे पाहता अशी कोणतीच अद्भुत शक्ती नसते की, ज्यामुळे असा माणूस दुखावला जाऊ शकतो. तरी अशा माणसाला मात्र मनापासून वाटत असते की, इतरानी त्याच्यावर भिरकावलेल्या वाक्बाणात अशी काही तरी किमया असते की ज्यामुळे त्याच्या अंतःकरणाला जखमा होतात. त्याच्या या समजुतीमुळे तो इतरांच्या शब्दांना अशी अद्भुत किमया बहाल करीत असतो. एकदा अशी शब्दरूपी विषारी अस्त्रे शोधून काढल्यावर ती अस्त्रे स्वत.विरुद्ध वापरण्यास इतराना जवळ जवळ भाग पाडून असा माणूस स्वतःचा बचाव करण्यासाठी मूर्खपणे शारीरिक बळ व हिंसाचार शस्त्रे पाजळू लागतो व असा समज करून घेतो की, स्वतःजवळील या आयुधामुळे तो स्वतःचे संरक्षण करू शकेल.

परंतु मूळ वस्तुस्थिती अशी असते की, इतरांचे शिव्याशाप व शाब्दिक हल्ले आपण गंभीरपणे मनाला लावून घेतल्याशिवाय आपल्याला दुखापत करू शकत नाहीत आणि अशा शिव्याशापांना प्रत्युत्तर म्हणून दुसऱ्याच्या नाकावर ठोसा हाणून किंवा त्याचे टाळके फोडून आपल्या अहंकाराला झालेल्या काल्पनिक जखमांची (किंवा काल्पनिक अहंकाराला झालेल्या जखमांची !) भरपाई होत नाही. मात्र दुर्दैवाने आपण आपल्या मुलांना नेमका चुकीचा दृष्टिकोण आत्मसात करावयास मदत करीत असतो किंवा जर मुले तसा चुकीचा दृष्टीकोण शिकत असतील तर त्याना त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्नही आपण करीत नसतो. तो दृष्टीकोण असा की आपण दुसऱ्याच्या वाकबाणामुळे कमालीचे विव्हल होतो आणि त्या दुखापतीची परतफेड किंवा भरपाई करायची म्हणजे आपल्यावर विषारी वाकबाणांचा वर्षाव करणाऱ्या माणसाचे पेकाट मोडणे किंवा आधुनिक खेळण्यांच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे त्याच्यावर बॉम्बफेक करून त्याला नामशेष करणे !

इतरानी आपल्यावर अकारण शारीरिक हल्ला केला असताना आत्मसंरक्षणार्थ प्रतिकार म्हणून वापरावयाची साधने अशा दृष्टिकोणातून आज मुले लुटुपुटूच्या लढाईत वापरतात त्या आधुनिक शस्त्रास्त्रांच्या प्रतिकृतीकडे पाहात नाहीत. उलट, अशी आधुनिक खेळणी मुलांच्या मनात कळत नकळत एक तत्त्वप्रणाली रुजवीत असतात. ती तत्त्वप्रणाली अशी की, इतर मुले, मोठी माणसे, आपल्यावर प्रेम न करणाऱ्या मुली, नोकरीतील वरिष्ठ अधिकारी, कम्युनिस्ट लोक इत्यादी माणसाच्या शाब्दिक हल्ल्यापुढे आपण दुर्बळ आहोत आणि अशा हलकटांच्या तीक्ष्ण वाकबाणांना धैर्याने व शांतपणे तोंड देणे अशक्य आहे आणि म्हणून अशा हलकटांना जहरी शब्दांच्या साहाय्याने सणसणीत प्रत्युत्तर देऊन त्यांनी केलेल्या अपमानाचा बदला घेतलाच पाहिजे–मग असे हलकट लोक म्हणजे वडीलधारी माणसे किंवा आपले वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे त्यांच्याशी सामना देताना आपले धाबे कितीही दणाणले तरी बेहत्तर ! आणि अखेर काही तरी करून अशा हलकट शत्रूचा गळा दाबून, शिरच्छेद करून किंवा गोळ्या झाडून कायमचा निकाल लावला पाहिजे; मग बहुधा ते हलकट लोक आपल्याला परत आपण कसे नालायक किंवा क्षुद्र आहोत हे सांगू शकणार नाहीत. (वस्तुतः आपली आपल्या स्वतःबद्दलची नेमकी तीच भावना आपल्याला मनातल्या मनात छळत असते !)

सखोल विचार केला तर असे दिसून येईल की, तू मला कोणत्याही प्रकारे त्रास दिलास किंवा माझ्या मार्गात अडथळे निर्माण केलेस तर मी तुला ठार केलेच पाहिजे, हे तत्त्व निखालस चूक आहे. पहिली गोष्ट म्हणजे, इतराच्या शाब्दिक हल्ल्यापुढे माणूस इतका हतबल होतो असे समजण्याचे कारण नाही. जर एखादा माणूस असा हतबल होत असेल तर त्याचे कारण म्हणजे इतरांच्या शाब्दिक हल्ल्यापुढे आपण हतबल आहोत हा त्याच्या मनात दृढमूल झालेला चुकीचा समज ! दुसरी गोष्ट म्हणजे इतराच्या शाब्दिक हल्ल्याकडे आपण जितका वेळ दुर्लक्ष करण्यास समर्थ आहोत असे माणसाला वाटेल तितका वेळ तो खरोखरच इतराच्या शाब्दिक हल्ल्याकडे दुर्लक्ष करू शकतो. तिसरी गोष्ट म्हणजे जे लोक आपल्यावर अपशब्दाचा भडिमार करतात त्यांच्यावर उलट आग पाखडणे म्हणजे वेळाचा अपव्यय आहे व तसे करणे मूर्खपणाचेही आहे. कारण अशा प्रतिहल्ल्यामुळे आपले शत्रू क्वचितच गप्प बसतात आणि जरी ते गप्प बसले तरी त्यामुळे ते आपल्याला पुढील संभाव्य शाब्दिक हल्ल्याला तोंड देण्यास काही अधिक धैर्यवान करीत नाहीत. चौथी गोष्ट अशी की, आपल्या तथाकथित शत्रूंचा कायमचा निःपात

झाला व त्यामुळे त्यांची तोंडे बंद झाली तरी इतरांच्या धारदार जिभा आपल्या हृदयाला घरे करू शकतील. या शक्यतेमुळे आपण चिंताग्रस्त, असुरक्षित व दुबळे राहतो ते राहतोच !

या सर्वांचा मथितार्थ असा की, आपल्या मार्गात कोणी कटकटी निर्माण केल्या किंवा आपले उद्दिष्ट साध्य झाले नाही म्हणजे आपल्याला जी वैफल्याची भावना जाणवते तिची परिणती फक्त आक्रमकतेतच होणे अपरिहार्य असते असे म्हणता येणार नाही. तसेच आक्रमक वर्तन केल्यामुळे पुढील वैफल्याला प्रतिबंध घातला जातो असेही म्हणता येणार नाही. म्हणजे आपल्यावर इतर कोणी कडक टीका केली व आपल्याला जे काही उद्दिष्ट साध्य करावयाचे असेल त्याला कोणी विरोध केला तर त्यावर एकमेव उत्तम उपाय असा की, दुसऱ्या माणसाच्या शब्दाचे यथायोग्य मूल्यमापन करणे–म्हणजेच असे समजावून घेणे की, दुसऱ्या माणसाचे शब्द फक्त शब्दच आहेत; प्राणघातक शस्त्रे नाहीत ! आणि मग शांतपणे आपल्या मार्गातील अडचणींचे निराकरण करण्याच्या किंवा त्या अडचणींवर मात करण्याच्या कामाला लागणे.

जे लोक आपल्याशी अन्यायाने वागतात त्यांच्या नावाने किंवा दुष्ट परिस्थितीच्या नावाने शंखध्वनी करून, चरफडून ते लोक किंवा ती परिस्थिती याच्यात क्वचितच बदल होत असतो. उलट, आपल्या शत्रूंवर चाल करून जाऊन किंवा त्यांचे नाक ठेचण्याचा प्रयत्न करून आपण अधिक बिथरून जाऊन अस्वस्थ होतो व त्यामुळे आपल्या मनातील वैफल्याशी किंवा आपल्या समोरील परिस्थितीशी यशस्वीपणे मुकाबला कसा करता येईल या मुख्य प्रश्नावरून आपले लक्ष विचलित होते आणि इतकेही करून आपण स्वत: शाबूत राहिलोच तर आपला समाचार घेण्यासाठी कोणत्या अधिक जालीम उपायांचा अवलंब कशा प्रकारे करावा याचे बेत आखणाऱ्या शत्रूंची संख्या मात्र आपण वाढवून ठेवतो !

आपल्या वैयक्तिक जीवनात शाब्दिक अपमान व त्या अपमानाची शाब्दिक किंवा शारीरिक प्रतिहल्ला चढवून करावयाची परतफेड या कल्पनांमुळे जे अनर्थ उद्भवतात तशाच तऱ्हेचे अनर्थ आंतरराष्ट्रीय पातळीवरही उद्भवतात. वैयक्तिक जीवनात आपण असे समजतो की, इतरांचे शब्द, हावभाव व त्यांची मते या सर्वांमध्ये आपल्याला दुखविण्याची काही अजब किमया आहे आणि एखाद्या राष्ट्राचे नागरिक म्हणूनही आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या मनात इतर राष्ट्रातील नागरिकांच्या मताबद्दल अशीच समजूत बाळगून असतो.

उदाहरणार्थ, ख्रुश्चेव्हसारखा एखादा राष्ट्रप्रमुख स्वत:च्या देशातील असुरक्षित व चिंताग्रस्त नागरिकांना दिलासा देण्यासाठी जेव्हा असे म्हणतो की, 'मी अमेरिकेला पुरून टाकीन !', तेव्हा अमेरिकेतील लोक वेडपटपणे असे समजतात की, ख्रुश्चेव्हने केलेल्या त्यांच्या पाणउताऱ्यामुळे त्यांना खरोखरच काही दुखापत झाली आहे. म्हणून ताबडतोब अमेरिकेतील नागरिक त्या बिचाऱ्या चिंताग्रस्त राष्ट्रप्रमुखाचा द्वेष करू लागतात व त्याच्या 'मिजासखोर' वक्तव्याबद्दल त्याच्यावर आग पाखडू लागतात. शिवाय अमेरिकेतील असे नागरिक खुळचटपणे असा समज करून घेतात की, त्यांनी तयार केलेल्या ख्रुश्चेव्हच्या बाहुलीत शाब्दिक खंजीर खुपसल्यामुळे तोही घायाळ होईल ! परिणामी ते ख्रुश्चेव्हला अगदी शेलकी विशेषणे बहाल करतात आणि मग वाऱ्याच्या वेगाने रशियातील नागरिक व अमेरिकेतील नागरिक शस्त्रास्त्रांची जमवाजमव करून कोठारे भरू लागतात. याचा अंतिम परिणाम म्हणजे शाब्दिक युद्धाचा भडका ! आणि अमेरिकेतील नागरिकांना मनोमनी असे वाटत असते की, जर अशा युद्धात त्यांचा विजय झाला तर त्यांचा प्रथम जो 'अपमान' ख्रुश्चेव्हने केला होता त्याचे परिमार्जन होईल व त्या अपमानामुळे अमेरिका या राष्ट्राची जी अपरिमित हानी झाली होती त्याची भरपाई केली जाईल !

अर्थात खरे म्हणजे, ख्रुश्चेव्हसारख्या एखाद्या राष्ट्रप्रमुखाने दुसऱ्या एखाद्या देशाचा मुळात जो अपमान केलेला असतो त्याचे कारण असे असू शकते की, त्याच्या स्वत:च्या वैचारिक गोंधळामुळे तो स्वत:च इतका बिथरलेला, गोंधळलेला व चिंताग्रस्त झालेला असतो की, त्याला त्याच्या राष्ट्रातील व इतर एखाद्या राष्ट्रातील जे काही मतभेद असतात त्या मतभेदांबद्दल शांतपणे विचार करणे शक्य होत नाही आणि अमेरिकेसारख्या दुसऱ्या राष्ट्रातील नागरिक ख्रुश्चेव्हसारख्या एखाद्या राष्ट्रप्रमुखाच्या वल्गना इतक्या गंभीरपणे घेतात त्याचे कारण असे की, ते इतरांकडून मिळणाऱ्या अनुमतीवर, मान्यतेवर व प्रेमावर इतके कमालीचे अवलंबून असतात की, जे लोक त्यांच्याशी सहमत होत नाहीत किंवा त्यांच्यावर लोभ न करता उलट टीकाच करतात त्याच्याबद्दल शांतपणे विचार करणे त्यांना जमत नाही.

## बंदुकीबरोबर विचारांची पेरणी

याचा अर्थ असा नाही की, राष्ट्रा-राष्ट्रात खरेखुरे सामाजिक व आर्थिक मतभेद वा भेदभाव नसतात किंवा वरील विवेचनाचा अर्थ असाही नाही की, राष्ट्रा-राष्ट्रातील अशा तफावती व मतभेद यांच्यामुळे आंतरराष्ट्रीय युद्धाला कारणे मिळत नाहीत; परंतु माणसाची बालिश, शेखसल्ली विचारसरणी, वैफल्य सहन करण्याची कमालीची मर्यादित कुवत आणि दुसऱ्यांच्या वाक्ताडनामुळे आपल्याला गंभीर दुखापत होते, ही त्याची समजूत या सर्वांमुळे वस्तुनिष्ठ आर्थिक व सामाजिक विषमता, मतभेद व अन्याय इत्यादी गोष्टींमुळे निर्माण झालेल्यांपैकी जे काही प्रश्न शांतपणे विचार करून सोडविणे शक्य असते तेही सोडविले जात नाहीत व परिणामी, राष्ट्रा-राष्ट्रांतील वैमनस्य वाढत जाऊन राष्ट्रे युद्धाकडे किंवा युद्धाच्या दिशेला खेचली जातात, ही दुसरी महत्त्वाची गोष्टही दृष्टिआड करता येणार नाही.

लहान मुलाना लुटुपुटुच्या लढाईतील खेळणी व शस्त्रास्त्रे काही असे शिकवित नाहीत की, आपल्याहून, आपल्या कुटुंबियांहून, आपल्या धर्मातील लोकांहून किंवा आपल्या राष्ट्रातील नागरिकांहून जे कोणी वेगळे बोलतील त्याचा नायनाट करणे इष्ट आहे. परंतु अशी खेळणी व शस्त्रास्त्रे म्हणजे वैरभाव निर्माण करणाऱ्या दृष्टिकोणाची प्रतिके असतात. त्यामुळे शांतिदूत समजल्या जाणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या जन्मदिवसानिमित्त शाळेला मिळालेली सुट्टी मुलाला आनंदाने घालविता यावी म्हणून त्याला त्याच्या वडिलानी खेळातील बंदूक आणून दिली तर त्या बंदुकीबरोबरच अशा मुलाच्या मनात एक जीवनतत्त्वज्ञान

पेरले व पोसले जाऊ लागते. लहान मुलाला खेळातील बंदुकीबरोबर नकळत मिळालेले हे जीवन-तत्त्वज्ञान म्हणजे अशी विचारसरणी की, जर कधी कोणी तुझ्याशी किंवा तुझ्या मित्रांशी असहमत होण्याचे धारिष्ट्य केले व त्यामुळे तो तुझ्या शत्रूपक्षात जमा झाल्यासारखा झाला तर त्या नराधमाला या जगात जगण्याचा, त्याचे स्वतंत्र व बदसूर विचार मांडण्याचा काहीही अधिकार नाही व म्हणून क्षणाचाही विलंब न लावता त्याला ठारच केले पाहिजे ! आजच्या शारीरिक आक्रमकतेच्या मुळाशी जो सिद्धांत अध्याहृत आहे त्याची पाळे-मुळे या अशा माणसामाणसातील वैमनस्य वाढविणाऱ्या हुकुमशाही विचारसरणीत घट्ट रुतलेली आहेत. लहान मुलाला दिलेली बंदूक जणू त्याला नकळत सांगत असते की, अशा तऱ्हेच्या विचारसरणीवर श्रद्धा असणे व त्यानुसार प्रसंगानुरुप प्रत्यक्ष कृती करणे इष्ट व न्याय्यच आहे.

लुटुपुटुच्या लढाईतील खेळणी व शस्त्रास्त्रे मुलामधील शेखसल्ली दृष्टिकोण, वैफल्य सहन करण्याची मर्यादित पात्रता आणि फाशीवादाला साजेशी हिंसाचारी प्रवृत्ती यांना एक प्रकारे उत्तेजन देतात, या सिद्धांतात जर काही तथ्य असेल तर अशा खेळण्यांच्या व शस्त्रास्त्रांच्या उत्पादनावर व विक्रीवर कायद्याने नियंत्रण घालणे हा मार्ग रास्तच नाही काय, असा प्रश्न उपस्थित केल्यास त्याला मात्र होकारार्थी उत्तर देता येणार नाही. कारण कायद्याने लुटुपुटुच्या लढाईतील खेळणी व शस्त्रास्त्रे यांच्यावर बंदी घालण्याचा मार्ग सुज्ञपणाचा ठरेल असे वाटत नाही.

अश्लील वाङ्मय राष्ट्रीय आरोग्यास धोकादायक आहे असे जरी सिद्ध झाले (आणि तसे अजून तरी सिद्ध झालेले नाही ! ) तरी तशा वाङ्मयाला स्वातंत्र्य बहाल केल्यामुळे जी काही हानी होईल त्याहीपेक्षा अधिक हानी तशा वाङ्मयावर कायद्याने बंदी घातल्यामुळे होईल. तसेच, माणसामाणसातील विद्वेष व युद्ध या गोष्टी निश्चितपणे अनिष्ट आहेत व अनावश्यकही आहेत. शिवाय, मानवी आयुष्यातून या वाईट गोष्टींची जवळजवळ हाकलपट्टी करणेही शक्य आहे. तरीसुद्धा लुटुपुटुच्या लढाईतील शस्त्रास्त्रांवर व तत्सम इतर खेळण्यांवर कायद्याने बंधने लादून अथवा तसेच इतर काही प्रतिबंधक उपाय योजून तशा खेळण्यांचे उत्पादन व विक्री मर्यादित करून किंवा अन्य काही उपाय योजून माणसातील शेखसल्लीपणे विचार करण्याची प्रवृत्ती व द्वेष-भावना दाबून टाकणे योग्य होणार नाही.

साहजिकच असा प्रश्न निर्माण होतो की, माणसाचा इतरांचा व स्वतःचा द्वेष करण्याचा अधिकार अबाधित राखावा तो का ? धूम्रपान, अतिरेकी मद्यपान वा खादाडी, दुराग्रही धर्मवेड किंवा आत्महत्येचा प्रयत्न करणे अशा सर्व तऱ्हेच्या वर्तनाला शिक्षा करणे जसे अयोग्य ठरेल तसे इतरांचा व स्वतःचा द्वेष करण्याच्या माणसाच्या अधिकारावर गदा आणणेही अयोग्य ठरेल. वरील सर्व तऱ्हेचे वर्तन नक्कीच आत्मघातकी आहे; आणि तशा तऱ्हेचे वर्तन माणसांकडून होऊ नये म्हणून त्यांना योग्य शिक्षण देणे खचितच श्रेयस्कर ठरेल. परंतु दुर्गुण म्हणजे गुन्हा नव्हे किंवा निदान दुर्गुणाला कायद्याने गुन्हा ठरविण्यात येऊ नये ! माणसाची प्रमादशील वर्तन करण्याची प्रवृत्ती त्याला स्वतःला अपायकारक किंवा अगदी आत्मघातकी असली तरी जोपर्यंत तो इतरांना अपाय करीत नाही तोपर्यंत त्याचा प्रमादशील वर्तन करण्याचा अदेय अधिकार अबाधित राखावा हेच बरे. कारण माणसाला बेशिस्त असण्याचा, भावनिकदृष्ट्या प्रक्षुब्ध असण्याचा किंवा आत्मघातकी वर्तन करण्याचा अधिकार दिला नाही तर आपण त्याचे स्वतःच्या आयुष्याचे चालक-मालक-पालक असण्याचे स्वातंत्र्यच नष्ट करू. आणि ती गोष्ट अधिकच भयावह आहे.

## लोकशिक्षणावर भर हवा

आत्मनियंत्रण, शिस्त, केवळ नजिकच्या नव्हे तर दूरवरच्या दृष्टीने विचार करणारे ऐहिक सुखाचे तत्त्वज्ञान या गोष्टींचे महत्त्व पूर्णपणे मान्य करूनही असे म्हणता येईल की, माणसाला त्याचे स्वत्त्व सोडून द्यावयास लावून 'सुधारण्यास' किंवा 'चांगले' होण्यास भाग पाडणे इष्ट नाही. अन्न व औषधी उत्पादने यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम करणाऱ्या मंडळाने अन्न व औषधी उत्पादनांची निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर त्यांचे उत्पादित पदार्थ अनिष्ट किंवा विषारी असतील तर तसे उघडपणे त्या पदार्थांच्या वेष्टणावर लिहावयास भाग पाडावे हे योग्यच झाले. परंतु जर प्रौढ व बहुतांशी समंजस व व सुशिक्षित माणसांनी विष, अफू, गांजा, मद्य, तंबाखू, सिगारेट इत्यादी गोष्टी प्रकृतीला अपायकारक आहेत हे माहित असूनही त्यांचे सेवन करण्याचे ठरविले असेल तर त्यांना वरील तऱ्हेच्या अपायकारक पदार्थांचे सेवन करण्याचा अबाधित अधिकार असावा.

वरील विवेचनाच्या अनुरोधाने असे म्हणता येईल की, सर्व तऱ्हेच्या विद्वेषी, हिंसक व क्रूर प्रवृत्तीविरुद्ध लोकशिक्षण हा उपाय अगदी योग्यच म्हटला पाहिजे आणि या बाबतीत संबंधित समाजधुरीणांनी हाती घेतलेल्या लोकशिक्षणाच्या मोहिमेमुळे जर बहुसंख्य मातापित्यांना लुटुपुटुच्या लढाईत आज-काल वापरण्यात येतात तसली आधुनिक खेळणी व शस्त्रास्त्रे त्यांच्या मुलांना विकत घेऊन देऊ नयेत असे वाटले तर उत्तमच होईल. शिवाय, अशा लोकशिक्षणामुळे सुजाण माता-पित्यांना आपल्या मुलांना अनिष्ट खेळ व खेळणी, तसेच द्वेष व हिंसाचार यांचा नंगा नाच चित्रित करणारे वाङ्मय, चित्रपट व दूरदर्शनवरील कार्यक्रम यांच्यापासून परावृत्त करण्यास प्रोत्साहन मिळाले तर फारच छान !

परंतु तरीसुद्धा लुटुपुटुच्या लढाईत वापरण्याची शस्त्रास्त्रे व तत्सम खेळणी यांचे उत्पादन करणाऱ्या कारखानदारांना किंवा त्यांची विक्री करणाऱ्या दुकानदारांना तुरुंगात डांबून किंवा त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकून त्यांचा व्यक्तिशः द्वेष करणे न्याय्य ठरणार नाही. कारण मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांनी अंगीकारलेली नाही. याला समांतर उदाहरण म्हणजे, अन्न व औषधी उत्पादने निर्माण करणाऱ्यांनी, मुले अथवा मोठी माणसे यांनी प्रमाणाबाहेर खादाडी करू नये याची खबरदारी घेण्याचे काम अंगावर घेतलेले नसते किंवा विशिष्ट तऱ्हेच्या मैदानी खेळांसाठी लागणारे साहित्य उत्पादन करणाऱ्या व विक्री करणाऱ्या लोकांनी तसे मैदानी खेळ मुलांनी उन्हात फार वेळ खेळू नयेत अशी खबरदारी घेण्याची जबाबदारी शिरावर घेतलेली नसते !

या संदर्भात शिक्षणाचे काम चांगल्या तऱ्हेने करावयाचा मार्ग म्हणजे पालकांनी व शाळांनी आपली जबाबदारी पूर्णपणे मान्य करून ती परिणामकारकपणे पार पाडण्याच्या प्रयत्नात राहणे आणि समाजातील या संबंधित घटकांनी आपले काम चोख केले-व तसे

त्यांना करता येणे अशक्य नाही–तर लुटूपुटूच्या लढाईत वापराव-याची शस्त्रास्त्रे व इतर खेळणी तयार करणारे कारखानदार व विक्रेते यांचा धंदा किफायतशीरपणे न चालल्यामुळे त्याची अपाय-कारक उत्पादने यथावकाश बाजारातून नाहीशी होतील.

येथवर आपण डॉ. अल्बर्ट एलिस यांच्या विचारांचा गोषवारा सारांशाने पाहिला. प्रस्तुत विषयावरील त्यानी आपले विचार निबंध-रूपाने 'द रिॲलिस्ट' या नियतकालिकाच्या अंकात प्रसिद्ध केले, त्याला आता खूप वर्षे झाली आहेत. त्यामुळे वाचकांच्या मनात साहजिकच अनेक प्रश्न गर्दी करू लागतील. उदाहरणार्थ, या बाब-तीत अमेरिकेतील आजची स्थिती काय आहे ? लोकशिक्षणाचे काम आज अमेरिकेतील संबंधीत घटक कोणत्या रीतीने व किती यशस्वी-पणे करीत आहेत ? लुटपुटूच्या लढाईत वापरण्याची शस्त्रास्त्रे व इतर खेळणी बनविणारे कारखानदार व विकणारे दुकानदार किती प्रमाणात अदृश्य झाले आहेत ?

वरील सर्व प्रश्नांची उत्तरे देणे कठीण असले तरी या विषयीची जी वस्तुस्थिती थोडया–अधिक संशोधनामुळे ज्ञात झालेली आहे त्यावरून असे म्हणता येईल की, गेल्या दहा–पंधरा वर्षांत सर्व तऱ्हेच्या माध्यमांमधून विद्वेषाचे व क्रूर हिंसाचाराचे चित्रण अधि-काधिक प्रमाणात अमेरिकेतील जनतेपुढे रंगविले जात आहे. अगदी अलीकडील एका सर्वेक्षणाच्या निष्कर्षावरून असे दिसून आले आहे की, एखादा अमेरिकी विद्यार्थी त्याचे शालेय शिक्षण पूर्ण करतो तोपर्यंत त्याने केवळ दूरदर्शनावरील कार्यक्रमांतून सामान्यतः तेरा हजार क्रूरपणे केलेले खून पाहिलेले असतात ! म्हणजे एकूण असे वाटते की, माणसामधील विद्वेषाला व क्रौर्याला ज्यामुळे चालना मिळेल अशा अनेक गोष्टी आज अमेरिकेतील मुलांच्या भोवती पसरलेल्या आहेत आणि वरील मानसशास्त्रीय दृष्टीकोणातून विचार केला तर असे म्हणावे लागेल की, याविषयी लोकशिक्षणाचे काम निदान अमेरीकेत तरी दिवसेंदिवस अधिक कठीण, परंतु अधिक निकडीचे होत चालले आहे.

□

---

श्यामचा संसार ( कथा २१ वी )

फिरोझ रानडे

# कंटाळा न करणारी मराठी माणसे व श्याम

'कंटाळा आला असला तर राहू दे, आताच त्याची काही एवढी घाई नाही म्हटलं,' राधाने श्यामला काही तरी काम सांगितले, ते करण्याकरता श्याम जागचा हालला तोच राधा त्याला वरीलपणे म्हणाली.

बायकांनो, हे असे उलटे–सुलटे वागणे व बोलणे तुम्हाला जमते कसे ? म्हणजे आपल्या घरातल्या जिन्यासारखे ? जिना कसा ज्या वेळी वर जात असतो त्याचवेळी खालीपण येत असतो, तसे ? प्रथम नवरा शातपणे वाचत पडला असला किंवा नुसताच पडला असला तर त्याला त्या मूडमधून जागे करा-वयाचे. मग त्याला काही काम सांगावयाचे व ते करण्याकरता नवरा लगबगीने उठला की लगेच म्हणायचे, कंटाळा आला असला तर राहू दे, आताच काही त्याची एवढी घाई नाही म्हणून ! मग आयानो, बहिणीनो, बायकांनो म्हणजे समस्त स्त्री–वर्गांनो जर तुम्हाला त्या अमुक एका गोष्टीची घाई नसते, ती गोष्ट नंतर मिळाली तरी चालण्या-सारखी असते, तर मग जरुरी नसताना नव-ऱ्याचा 'मूड भंग' का करता ? व तो तात-डीने उठला की, 'कंटाळा आला असला तर राहू दे' हे वर जखम करून मीठ का चोळता ? पण हे त्यांना खडसावून विचारणार कोण ?

श्यामला इतर समस्त नवरे लोकांप्रमाणे राधाची 'जिना पद्धती'ने वागण्याची व बोलण्याची सवय झाली होती. राधाने त्या कामाची घाई नाही म्हटले होते तरी तो उठला व स्वैपाकघराकडे जाता जाता म्हणाला, 'छे, कंटाळा कसला ? व पुरुष–जातीला कंटाळा करून चालेल कसे ? पुरुषाने कंटाळा केला की त्याच्यावर काही वेगळेच बालंट येते !'

राधाने श्यामच्या बोलण्यातला मतितार्थ ओळखला व थोडीशी लाजून म्हणाली, 'तुमचं आपलं काही तरीच !'

पुष्कळ बाबतीत स्त्रियांवर घोर अन्याय होतात हे U. N. ने स्त्री–वर्ष साजरे केल्या-पासून आपणा सर्वांच्या लक्षात आले आहे, व ते खरेच आहे. पण ज्या काही अत्यंत थोडयाबाबतीत पुरुष–वर्गावर अन्याय होतो त्यात 'कंटाळा' करण्याबाबतचा अन्याय मोडतो. एखाद्या बाईने कंटाळा केला वा वेळोवेळी कंटाळा करू लागली तर लोक तिला आळशी आहे झालं, एवढेच म्हणतात. पण तोच कंटाळा पुरुषाने करू दे, त्याच्यावर वेगळेच बालंट येण्याचा संभव असतो. आता करण्याची वा न करण्याची गोष्ट एकच, पण त्यात स्त्री–पुरुष असा भेदभाव का केला जातो बरे ? आता ह्या व अशा पुरुष–वर्गा-वर होणाऱ्या अन्यायाकडे U. N. 'पुरुष–वर्ष' साजरे करत नाही तोपर्यंत कोणाचेही लक्ष जाणार नाही. स्त्रिया असोत, बालके असोत, अपंग असोत, U. N. वर्ष साजरे करत नाही तोपर्यंत त्यांच्याकडे लक्ष द्याव-याचे नाही अशी फॅशनच पडत चालली आहे अलीकडे. पण U. N. कंटाळा–वर्ष साजरे करो वा न करो, मराठी माणसाला त्याची पर्वा करण्याचे काही कारण नाही. कंटाळा न येणे हा आमचा स्वभावच आहे मुळी, असे वेगळे वेगळे विचार श्यामच्या मनात उठून स्वैपाकघरात जाईपर्यंत आले.

श्यामने राधाने सांगितलेले, म्हटले तर घाईचे म्हटले तर नाही, असे काम म्हणजे वरच्या फळीवरची मोठी बरणी काढून दिली व कसला तरी डबा फोडून दिला व परत येऊन सकाळपासून वर्तमानपत्र चाळायला मिळालं नव्हतं तर ते चाळू लागला.

हल्ली हल्ली शाम अक्षरशः वर्तमानपत्र चाळत असे, वाचत नसे त्याला अफगाणि-

स्तानवर रकानेच्या रकाने लिहावयाचे नसल्यामुळे तेथून रशियन सैन्य काढून घेनलेना घेतले, त्याची त्याला पर्वा नव्हती. उसाला, गुळाला, साखरेला, दुधाला, तंबाखुला, गवताला, तुपाला, दगडाला नि घोडयाला काय भाव मिळावयास पाहिजे व सध्या काय मिळतो, ह्याबाबतचे त्याचे अज्ञान सरकारपेक्षाही जास्त होते. त्याला एवढेच कळत होते की, हे सगळे 'योद्धे' त्याच्यासारख्या मध्यम वर्गाचा जीव घेणार हे नक्की.

इराणने इराकवर बॉम्ब टाकला काय वा इराकने इराणवर टाकला काय म्हणजे त्यांचे युद्ध अजूनी चालले असले तर त्याला त्यात काहीच फरक वाटत नसे. इस्रायलचा प्रश्न तर क्रॉनिकच होता. तो संपण्याआधी जगातल्या पुष्कळ गोष्टी संपणार होत्या. एवंच त्याला ना महाराष्ट्रीय, ना राष्ट्रीय, ना आशियाई, ना मध्य पूर्व, ना उत्तर-पूर्व, मध्ये interest होता.

मग श्याम एवढे पैसे खर्च करून काय फक्त स्वतः चाळण्याकरिता म्हणून वर्तमानपत्र घेत असे? जवळ जवळ तसेच होत होते. त्याची मुले फक्त क्रिकेटची मॅच असली वा कपाळाला पट्टी बांधून कोणी टेनिस खेळत असले म्हणजे शेवटून दुसरे पान वाचत व वर्तमानपत्र तसेच फिसकारून टाकून निघून जात असत. राधाचं काय विचारता? श्यामला वाटायचे की आगरकरांनी स्त्रियानी लिहायला वाचायला शिकावे म्हणून किती खस्ता खाल्या, त्रास सहन केला पण तो फक्त पुस्तके वा मासिके वाचण्याकरता असावा. कारण पुरुष ज्या प्रमाणे गंभीरपणे वर्तमानपत्र वाचतो तसे गंभीरपणे वर्तमानपत्र वाचणारी बाई पाहिली आहे कधी कोणी?

श्यामला फक्त सध्या एका गोष्टीबाबत उत्सुकता, शंका, काळजी होती व ती म्हणजे 'गृह-प्रवेशांबाबत. आज मिळेल, उद्या मिळेल करत करत तो रोज वर्तमानपत्र चाळत असे. एकदा तर त्याची प्रथम आशा व मग घोर निराशा झाली होती. एकदा वर्तमानपत्रात मोठी फुलाफुलांनी सजवलेली जाहिरात आली होती व तेव्हढयाच मोठया अक्षरात 'गृह-प्रवेश' असे लिहिले होते. श्यामने सुटकेचा निश्वास टाकत म्हटले, 'चला, कंटाळा न करता दाराशी उभे राहिल्याचे फळ मिळाले. धा! हुःश्शा श्यामाने व जाहिरात करुन गृह-प्रवेश होणार आहे बघा!' पण स्वतःच पुढे बघतो तो काय? तो राकेश रोशन वा विनोद चावला आणि कोणी कोल्हापुरे वा सोलापूरेच्या सिनेमाची जाहिरात होती व 'गृह—प्रवेश' हे सिनेमाचे नाव होते!

पण म्हणून श्यामने वर्तमानपत्र चाळण्याचा कधी कंटाळा केला नाही. तो म्हणे साहेबांना जर दाराशी उभ राहण्याचा कंटाळा येत नाही तर आपल्याला नुसते वर्तमानपत्र चाळण्याचा कंटाळा करण्याचा काय अधिकार? म्हटलं ना कंटाळा करेल तो मराठी कसचा?

श्यामने पहिले पान उलटले. पाठमोऱ्या पानावर वेगळया वेगळया प्रकारच्या 'पाहिजेत'च्या जाहिराती होत्या. सरकारी नोकरी पक्की झाल्यापासून श्यामने तश्या जाहिरातीकडे ढुकूनही पाहिले नव्हते. काही जाहिराती स्वस्तात गाळे बांधून देण्याबाबतच्या होत्या. पण आजकाल गाळा विकत घेणं इतके महागाईचे झाले आहे की, त्या जाहिरातीकडे पहाण्याचीसुद्धा श्यामची हिंमत नव्हती. बाकी जाहिराती सिनेमा, नाटके वगैरे सास्कृतिक कार्यक्रमाबाबतच्या होत्या. सास्कृतिक खाते राधाकडे असल्यामुळे श्यामला त्या बातम्या वाचण्याचा अधिकार असला, तरी काही ठरवण्याचा नसल्यामुळे तो त्या वाचत नसे.

तिसऱ्या पानावर नेहमीप्रमाणे हरिजनांवर अत्याचार, स्त्रियांवर बलात्कार, S. T. ची गाडी पुलावरून पडण्याबाबत, बिहारमधल्या पोलिसानी केलेल्या धुडगुसाबाबतच्या बातम्या होत्या. त्याचे खालीच आकाशवाणी वरचे कार्यक्रम व दूरदर्शनवरचे कार्यक्रम ह्यांची यादी दिली होती. अशा गोष्टी एकत्र छापण्याबाबतच्या उप-संपादकांच्या कौशल्याबाबत श्यामला मोठे कौतुक वाटत असे.

तसे कौतुक करत श्यामने तिसरे पान उलटले. पहातो तो सर्वसामान्य लोकांच्या अत्यंत माहितीची लोकमान्यांची पगडी व मिशा असलेली छबी! 'अरे तिच्या मारी, म्हणजे आज एक ऑगस्ट आहे की काय!' माणूस वाघ्याचा पाग्या झाला तरी त्याचा स्वभाव बदलत नाही हेच खरे. इंग्रजीत ज्याला weak-moment म्हणतात, तशा क्षणाला त्याचा मूळ स्वभाव दिसून येत असतो श्याम फार पूर्वी म्हणजे मासिकला वगैरे असताना त्याच्या तोंडून 'अरे तिच्या मारी' वगैरे उद्गार निघत असत. पण बाळ गंगाधराचे छायाचित्र पाहून, तेही एक ऑगस्टला, त्याच्या तोडून अशी दलित लेखकांयोग्य आश्चर्य दाखवणारी शिवी बाहेर पडावी, ह्याचे त्याला फार वाईट वाटले.

श्यामने इतर असंख्य वाचकांप्रमाणे तो लोकमान्यावरचा भारदस्त लेख न वाचता नुसतेच त्याचे स्मरण केले व बाळ गंगाधरांनी दाखवलेल्या मार्गाने व त्यांच्या पावलावर पाऊल टाकावयाचे म्हणून तो उठला व तोंडात सुपारीचं खाड टाकून परत पूर्वीच्या जागी येऊन बसला व विचाराधीन झाला.

आपण एवढे मराठी असून एक ऑगस्ट विसरलो कसे? ह्या प्रश्नाने त्याचे मन उदास झाले. हल्लीच्या पद्धतीप्रमाणे त्याने सरकारवर सर्व दोष टाकला. 'सालं, चांगली एक ऑगस्टची सुट्टी दिली असती सरकारनं, तर काय बिघाद होती असं विसरून जायची? निदान पूर्वीसारखे एक तारखेला पगार देत असत, तसा जरी चालू ठेवला असता तरी सुद्धा आपले लक्षात आले असते की, बुवा उद्या लोकमान्यांची पुण्यतिथी आहे म्हणून व त्यांनी दाखवलेल्या मार्गाने आपणा सर्वांना जावयाचे आहे म्हणून.'

आता श्यामने पुढचे पान उलटले तर परत तेथे समोर लिहिण्याचे टेबल व साहित्य असून दुसरीकडे बघणाऱ्या बळवंतरावाची आणखी एक छबी होती. श्याम मनाशी म्हणाला, मराठी माणूस अ-कंटाळक कसा आहे, हे पहावयाचे असेल तर एक ऑगस्टकडे पहावे. आता टिळक १९ मध्ये गले की २९ मध्ये, ह्याबाबत त्याचा थोडा संभ्रम आहे. पण टिळक जाऊन खूप वर्षं झाली एवढे नक्की. पण वर्षानुं वर्षं ह्या डॉक्टर वा रिटायर्ड लोकाना लोकमान्यावर लेख लिहिण्याचा कंटाळा कसा येत नाही? त्याना कंटाळा नाही तर नाही....पण संपादकाना तरी तसले लेख व तोच तीच छायाचित्रे छापण्याचा कटाळा कसा येत नाही बरे?

जसा एक ऑगस्ट बाबत लेखक व सपादक कंटाळा करत नाहीत तद्वतच समस्त महाराष्ट्रातली व बृहन महाराष्ट्रातली वेगळी वेगळी मंडळं व त्यांचे चिटणीस लोकही एक ऑगस्ट साजरा करण्याबाबत कंटाळा करत नाहीत.

वर्षानुवर्ष भिंतीवर उंच टांगलेला बाळ गंगाधरांचा फोटो काढला जातो, व्यवस्थित पुसला जातो व मंडळाच्या चिटणीसाकडली त्यातल्या त्यातली स्वच्छ पांढरी चादर काढली जाते. फोटो उभा रहावा म्हणून डालडाचा डबा वा एखादा ठोकळा मागे उभा केला जातो व शेवटी मंडळाला परवडेल अशा किंमतीचा हार घातला जातो.

दरवर्षीप्रमाणे कंटाळा न करता कोणा भाषणाचा कंटाळा नसणाऱ्या प्रसिद्ध वा अप्रसिद्ध प्राध्यापकाचे भाषण ठेवले जाते. हे 'ठीक' पाच वाजता ठेवलेले भाषण 'अठीक' सव्वा सहा वाजता सुरू होते. कंटाळा न करण्याच्या वय-ग्रुपची म्हणजे पन्नास ते पंचावन्न वयाची पंधरा वीस माणसे हजर असतात. एवढे करून व्याख्याता न कंटाळता सांगतो काय ? तर बाळ गंगाधरांचा संदेश : 'स्वराज्य हा माझा जन्म-सिद्ध हक्क आहे व तो मिळवणारच' हा ! आता स्वातंत्र्य मिळून ८१ – (उणे) ४७ वर्षे झाली तरी संदेश तोच ! शेवटी चिटणीस महाशय न कंटाळता आभार मानायचे 'गोड' काम करतात.

आता श्यामला प्रश्न पडायचा की मराठी समाजाला असा वर्षानुवर्षे अशी पुण्यतिथी साजरी करण्याचा कंटाळा कसा येत नाही ? व अशी पुण्यतिथी साजरी करण्याचे पुण्य तरी कोणाला मिळत असेल बरे ? बरं टिळकांच्या पुण्यतिथीच्या दिवशी अगदी टिळकांवरच बोलले पाहिजे का ? दोन वर्षातच परत सत्तेवर येऊन सगळ्या जगाला तोंडात बोट घालायला लावणाऱ्या इंदिरा गांधीवर बोलले तर नाही का चालायचे ?

बरं, टिळकांवरच बोलायचे असा हट्ट असेल तर बाळ गंगाधर काय फक्त 'स्वराज्य हा माझा जन्म-सिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच' एवढे बोलून अंतर्धान पावले होते ? बाळ गंगाधरानासुद्धा एक ऑगस्टला होणारी भाषणे ऐकून आपण हा मंत्र म्हणायचा कंटाळा केला असता तर फार बरे झाले असते, असे स्वर्गात वाटत असेल नाही ? पण टिळकही शेवटी मराठीच ना ? कंटाळा करेल तो मराठी माणूस कसला ?

संघ हा महाराष्ट्रात उदय पावला, वाढला व फोफावला त्याची ऐतिहासिक, राजकीय, भौगोलिक कारणे त्या विषयावरची तज्ज्ञ डॉक्टर मंडळी देतीलच. पण श्यामचे असे ठाम मत होते की, संध्याकाळ झाली की नेहमीचे कपडे बदलून, खाकी अर्धी चड्डी घालून, त्यात पांढरा अर्धा शर्ट खोचून-मग तो नको त्या ठिकाणी हात घालून खाली ओढून घेऊन व डोक्याला काळी टोपी व हातात दंडा घेवून जाणारे शेकडो अकंटाळक तरुण फक्त महाराष्ट्रच निर्माण करू शकला. हे मुख्य कारण किंबहुना फक्त हेच एक कारण आहे.

वर्षानुवर्षे अगदी काही न करता, अगदी कंटाळा सुद्धा न करता, एखादी संस्था फक्त महाराष्ट्रच व फक्त मराठी लोकच चालवू शकतात. एवढ्या मोठ्या संघटना-रूपी वृक्षाचे बीज, असे कंटाळा न करण्याची मराठी माणसाची वृत्ती हे आहे, हे कळून समस्त मराठी बांधवास आनंद व्हावा.

लताबाईंनी तीस हजारावर गाणी म्हटली आहेत हे कुठे तरी वाचल्यावर श्यामच्या तोंडून पूर्वीच्या काळी आश्चर्य दाखवण्या करता म्हणत तसा 'अबब' हा शब्द निघाला होता. श्यामने हा अबब शब्द दोन गोष्टीबाबत आश्चर्य दाखवण्याकरता म्हटला होता. कंटाळा न करता लताबाईंनी तीस हजार गाणी म्हटली त्याबाबत तर अबब हा शब्द होताच. पण ज्या बहाद्दराने कंटाळा न करता ती ३०,००० गाणी मोजली असतील त्या माणसाच्या कंटाळा न करण्याबाबतच्या वृत्तीबद्दल आश्चर्य दाखवण्याकरतापण होता.

अशा मराठी माणसाच्या कंटाळा न करण्याच्या वृत्तीचे कौतुक करण्याचे मनःस्थितीत श्यामचा तो सगळा एक ऑगस्टचा दिवस गेला. कंटाळा न करता तो कचेरीत गेला. कंटाळा न करता त्याने चकाट्या पिटल्या व पावसाने आयुष्य कसे नकोसे झाले आहे, ह्याबाबत सहकाऱ्यांशी चर्चा केली.

हे सगळे करत असताना त्याला मराठी माणसाच्या अकंटाळक वृत्तीचा ढेकूण सारखा चावत होता. समस्त मराठी माणसाप्रमाणे मराठी माणसाच्या गुणाचे व्हावे तसे कौतुक होत नाही, असे श्यामचेही मत होते. गुजराथी, मारवाडी लोकांच्या व्यापारी वृत्तीबद्दल, मद्रासी लोकाच्या झटून काम करण्याबाबत, बंगाली लोकांच्या कला-प्रेमाबाबत, कसे नेहमी कौतुक होत असते आणि ह्या कोणाही लोकात नसलेला गुण म्हणजे कंटाळा न करण्याचा गुण, फक्त मराठी लोकांतच असून सुद्धा त्यांचे कोणी कधी नाव कसे काढत नाही ? आमच्या बाबत म्हणतात काय तर मराठी लोक म्हणे एकतर नाटक बसवतात वा भांडत तरी असतात. काय अन्याय आहे हा !

नेहमीप्रमाणे रात्र झाली. श्यामने दिवा बंद केला व तो गादीवर पडणार, एवढ्यात राधा त्याला म्हणाली, 'अहो, सकाळच्या दुधाचे पैसे काढून ठेवावयाचे राहिले बघा !' श्याम परत दिवा लावणार, तेवढ्यात राधा पुढे म्हणाली, 'अहो कंटाळा आला असला तर राहू दे. त्याची काही घाई नाही.'

श्याम परत गादीवर पडत म्हणाला, 'सांगितले ना तुला एकदा की, मला कोणत्याही गोष्टीचा कंटाळा म्हणून येत नाही !' अर्थातच कंटाळा न करणाऱ्या माणसाचा जो लाभ होतो तसा श्यामचाही झाला हे वेगळे सांगायला का पाहिजे ? □

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

**लेखिका : सौ. वीणा गवाणकर**

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
**मूल्य : रुपये पंधरा**

पुस्तके

## अंधुक चित्रणाची नेमाडपंथी कादंबरी

# 'ओढ'

भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांनी मराठी कादंबऱ्यांचे साचे मोडले. नवे किती आणि कोणत्या प्रकारे लिहिले जाऊ शकते हे त्यांच्या कादंबऱ्यांनी स्पष्ट केले. सामाजिक आशयाचा पट त्यांच्या या कृतींनी विशाल केला.

'ओढ' ही अशोक डांगे यांची कादंबरी 'कोसला' ते 'झूल' या नेमाडयाच्या कादंबऱ्याशी नाते सांगते. विस्कळीत आणि तुकडयातुकडयांनी घडणारी,निवेदन करणारी 'कोसला'तील शैली व प्रसंगचित्रण आणि पुढच्या 'बिढार', 'जरीला', 'झूल'मधील प्राध्यापकाचे जग, कॉलेजचे किळसवाणे राजकारण आणि बजबजपुरी या साऱ्यांचा प्रभाव 'ओढ' वर अतिशय खोल आहे.

केवळ प्रेरणेवर त्यांचा प्रभाव आहे असे नसून 'ओढ' मध्ये काही साम्यस्थळेही आहेत. चांगदेवला असणारा भयानक रोग 'बिढार' मध्ये सुरुवातीला येऊन जातो. यातल्याही सुर्वेला शेवटी क्षयाची बाधा होते. 'कोसला'चा स्वतःला शोधत फिरणारा नायक व 'ओढ' मधील सुर्वे यांचे बाह्यांगी साधर्म्य वाटते खरे, पण सुर्वेला मद्रासला पळून गेल्यानंतर स्वत.च्या क्षुद्रत्वाची जी जाणीव होते ती प्रगल्भपणे व्यक्त करण्यात लेखक अपयशी ठरला आहे. त्याच्या विचारांची ही प्रक्रिया वाचकांपुढे उलगडत नाही. 'मरीना बीच'वरच्या त्या वैराण रात्रीनं मात्र सुर्वेला खूप काही शिकवलं. त्या अफाट सागरविस्तारानं त्याचं स्वत च क्षुद्रत्व त्याला जाणवून दिलं' (पान १९) फक्त अशा ओळींमधून त्याच्या विचारांचं संक्रमण दिसत नाही.

नेमाडयांच्या कादंबऱ्यांतून येणारी साहित्य-चर्चा यातही आहे. पण आजच्या समीक्षेत तिचे फारसे स्थान असेल असे वाटत नाही. भाई हे जुन्या पिढीचे लेखक. त्यामुळे त्यांच्या जुन्या आदर्शवादी व ध्येयवादी लेखनाच्या संदर्भात जी चर्चा होते ती एका लुप्त शैलीविषयी सांगते. फडके खांडेकरांच्या कृतक पण आता अस्तगत झालेल्या लेखनाविषयीचीही चर्चा आज फारशी उपयुक्त वाटत नाही. कॉलेजमधील भाईंच्या भाषणानंतर सुर्वे भाईंशी वाद घालतो. 'नैतिकता, लज्जा, संस्कृती सगळे शब्द कालचेच आहेत. पण त्यांचे अर्थ आता बदललेत,' (पान २७) असे म्हणणाऱ्या सुर्वेच्या नवीन विचारांविषयीची कल्पना निश्चितपणे प्रकट होत नाही.

तसेच तो हुषार आहे असे इतर पात्रे म्हणतात. पण त्याच्या एकंदर चित्रणावरून ते पुरेसे स्पष्ट होत नाही. सर्व कादंबरी ही बऱ्याच अंधुक अशा व्यक्तिचित्रणांनीच पुसट झाली आहे.

नेमाडयांच्या प्रभावातून बाजूला काढल्यानंतर लेखकाची बलस्थाने दिसतात. यातील सर्व पात्रे ही नशिबाने चुकीच्या मारलेल्या गाठीत गुतलेली दिसतात. भाई त्यांचे लेखन चुकीच्या काळात सुरू करतात. नाटक, संपादन या क्षेत्रात अपयशच फक्त पाहातात. रंगराज या आमदार संपादकाचे पात्र पैशाच्या जोरावर साहित्यात टिकून राहाणाऱ्याचे प्रतिनिधित्व करते. एसके हे प्राचार्य निव्वळ राजकारण आणि लाचारीने स्थान टिकवून ठेवणारे असून साठे हा सुर्वेचा मित्र म्हणवणारा प्राध्यापकही शेवटी एसकेचाच माणूस निघतो.

अनू आणि सुर्वे या जोडप्याच्या संबंधाचे चित्रण हे या कादंबरीतील जिवंतपणा सुचवते. अनू ही भाईंची मुलगी. तिच्या कोडामुळे व चिडचिडया स्वभावामुळे त्यांच्या संसारात रस उरला नाही.त्यांच्या संबंधातील थंडपणा, कधीकधी दोघांचं उसळणं, शरीबरोबरचे सुर्वेचे अनैतिक संबंध निर्विकारपणे पहाणारी अनू व भाल हा शरीचा नवरा. दोघाचा थंड थिजलेपणा खूपच चांगल्या रीतीने यात व्यक्त होतो. 'सरप्लस लिस्ट'मध्ये त्याचं नाव पाहून अनू तिला चिडवते किंवा त्याच्या Nude Drawing मुळे स्वतःला खिजवल्यासारखं तिला वाटतं. हे दोघांचे एकमेकांवरील छुपे व कधीकधी उघड हल्ले त्यांच्यातील हिंसकपणा दाखवतात. लौकिक अर्थाने पतीपत्नी असलेल्या आणि समाजाच्या भयाने एकत्र राहणाऱ्या विघटित संसाराचे हे चित्रण हा लेखकाने मनःपूर्वक रेखाटलेला भाग. अनूच्या कोडामुळे त्याला वाटणारी किळस अयोग्य वाटत नसली तरी शरी व त्याच्या संबंधातून त्याने शोधलेले उत्तरही पाशवी वाटते.

शरीशी त्याचे संबंध हेही अनूवर व भालवर सूड घेण्याच्या भावनेतून आल्यासारखे वाटतात. नंतर त्या दोघांत मानसिक नाते निर्माण झाले तरी आधी त्यांचा संबंध हा दोन अतृप्तांचा संग वाटतो. शरी त्याच्या मुलालाही जन्म देत नाही, तिच्या पोटात वाढतो तो निव्वळ मांसाचा गोळा. सुर्वेच्या मनातील स्वतःच्या पुरुषत्वाची खात्री ही अशी कोसळून जाते. शेवटी त्याला झालेला क्षय हा त्याच्या मानसिक कोसळण्याचा धागा पुढे शारीरिक कोसळण्यातून स्पष्ट करतो व जोडून घेतो.

कथाबीज लेखकाच्या मनात रूजलं असेल तर त्याने अंतर्बाह्य झपाटून जाणं ही लेखकाकडून वाचकाची अपेक्षा असते. पण या कादंबरीत असा पात्रांच्या संबंधाचा तळापासून घेतलेला शोध अपवादात्मकरीत्या आढळतो. नेमाडे याचा प्रभाव असणं ही गोष्ट वाईट नाही, पण केवळ त्या प्रभावातून जर क्षीण प्रतिबिंब तयार होत असेल व त्याची चाकोरी होत असेल तर ते योग्य होणार नाही. यासाठी लेखकाने स्वतःला अशा प्रभावातून बाहेर काढून लिहिले पाहिजे. कारण त्यांच्यात (श्री. डांगे यांच्यात) तशी बलस्थाने आहेत.

—मृणालिनी नाडकर्णी

# बुद्धिवादाची पीछेहाट

समाजामध्ये होत असणारी बुद्धिवादाची पीछेहाट रोखण्यासाठी एक पुस्तिका विचारवंतांच्या एका गटाने तयार केली आहे. तिच्या नुकत्याच झालेल्या प्रकाशनासाठी मुंबईचे नेहरू शास्त्र केंद्र ही यथायोग्य जागा लाभली होती.

या आवाहनावर स्वाक्षरी करणाऱ्या मंडळीत, पी. एन. हक्सर, डॉ. राजा रामण्णा, प्रा. एम. जी. आर. मेनन, डॉ. सतीश धवन, कु. रोमीला थापर, श्रीमती तारा अली बेग आणि श्री. रजनी पटेल ही प्रगतिशील विचारांची मंडळी होती.

म्हणजे राजकीयदृष्टया ही मंडळी विविध विचारांची आहेत; पण शास्त्र आणि बुद्धिवाद यावरील विश्वास हा या सर्वांचा समान दुवा आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांचा सुरुवातीचा काळ वगळता, (कारण नंतर नंतर त्यांनीही बुद्धिवादविरोधी आणि अंधश्रद्धावादी विचाराशी तडजोड करायला सुरवात केली होती)–हे प्रसिद्ध झालेले निवेदन, हा या क्षेत्रातील महत्त्वाचा दस्तऐवज म्हटला पाहिजे–सरळ फावड्याला फावडं म्हणणारा, त्याला पारंपारिक, आध्यात्मिक किंवा गूढवादी तत्त्वाचा मुलामा न चढवता!

या मंडळीचा आक्षेप आहे, 'अनेक वेळा सत्ताधाऱ्याचे आशीर्वादाने चालणाऱ्या विचित्र कर्मकांडांना.' अर्थात त्यांचा रोख आहे मंत्री आणि मुख्यमंत्री आणि फार काय प्रधानमंत्र्यांच्यासुद्धा बंगल्यातून होणाऱ्या 'होमहवन' आणि इतर 'तांत्रिक' कर्मकांडांवर.

अशा प्रचंड जाहिरात होणाऱ्या व्रतवैकल्यांपासून सामान्य लोक काय बरे बोध घेतील? आधीच विचारी ही मंडळी अंधश्रद्धांच्या शृंखलांनी जखडलेली आहेत!

देशातील सर्वोच्चपदस्थ मंडळी असले आध्यात्मिक स्टंट करण्यात गुतलेली पाहून हे लोक अंधश्रद्धेच्या कर्दमात आणखीनच रुतत जातील. परंपरागत चालत आलेल्या औदासीन्य आणि निष्क्रियतेच्या जंजाळातून बाहेर पडण्याची इच्छा तरी मग त्यांना कशी होणार?

अखेरशेवटी अशा लोकांचा प्रत्येक विचार येऊन ठेपतो तो 'कर्म' आणि 'नियती' आणि 'विधिलिखित असेल ते आपणा पामराना कसे बदलता येईल?' या निष्कर्षावर. शासनातर्फे लोकाना चेतना देऊन प्रगतीसाठी उद्युक्त करणारी सर्व पावले मग परिणामशून्य बनतात.

## नुसत्या घोषणा

बुद्धिवादाच्या पीछेहाटीची सखोल कारण मीमांसा करणाऱ्या या निबंधात पुढे लिहिले आहे–'ज्यांचा व्यवसायच शास्त्रीय संशोधनाचा आहे अशा मंडळीकडूनही शास्त्रविरोधी सनातनी सामाजिक रूढी पाळल्या जातात.'

इथे त्यांनी त्यांच्याच समव्यावसायिकांना फटकारले आहे. त्यात स्वत च्या मुलांच्या पत्रिका घेऊन फलज्योतिषाकडे धावणारे आणि पुरुष वा स्त्री 'बुवांच्या' नादाला लागलेले प्राध्यापक आणि व्याख्याते आलेच. मुलांना लग्नाच्या जोडीदाराबाबत सक्ती करणे, हुंडा घेणे, जातिभेद पाळणे यांसारख्या सामाजिक दुष्ट प्रथा बुद्धिवादी वर्गात फार मोठ्या प्रमाणात आढळतात. शिवाय फलज्योतिषी, मांत्रिक, हस्तसामुद्रिक, तांत्रिक आणि बोगस अध्यात्मवाले यांना आश्रय देण्याचे प्रकार चालतातच.

'केवळ प्रगतिशीलतेच्या घोषणा प्रत्यक्ष कृतीऐवजी वापरण्याच्या वृत्ती'ची या जाहीरनाम्यात विषादपूर्ण दखल घेतली आहे. अशा घोषणातून काही तरी साध्य केल्याचा आभास निर्माण करणे ही उघड फसवाफसवी नसली तरी चलाखी निश्चितच आहे.

'रोजच्या जीवनातील कमालीची अनिश्चितता, असंख्य लोकांना आशा-आकांक्षांच्या अतृप्तीमुळे येणारे वैफल्य यामुळे लक्षावधी लोक दैवी उपायांच्या सहाय्याने मानसिक (शांती आणि) संतुलन प्राप्त करण्याच्या मागे लागतात.' हे उपाय अनेक प्रकारचे असतात.

कांजिण्या बऱ्या होण्याकरता रस्त्यातून देव मिरवत नेतात, त्यात तापाने फणफणलेली छोटी बालके इतरांना जणू तंतू-प्रादुर्भावाचा प्रसाद वाटत मिरवली जातात.

पाऊस पडावा म्हणून देवाची आणि त्याच्या दलालांची प्रार्थना करण्यात येते–पीर, फकीर, साधू, संत यांना अन्न-वस्त्र-नजराणे देऊन त्याच्या त्यांच्या देवाकडे दुष्काळात थोडा पाऊस पाडण्याकरता साकडे घालण्यास सांगण्यात येते.

अशा अंधश्रद्धांचा (वरवर) सोपा वाटणारा मार्ग उपलब्ध असताना पाऊस वा दुष्काळ यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्याचे कष्ट मग कोणी घेतच नाहीत.

बढती मिळण्याकरता जणू अविरत कष्ट किंवा जादा उत्पादन एवढे पुरे पडत नाही. फलज्योतिषी, मांत्रिक असल्या देवाच्या दलालांना दक्षिणा देऊन देवाजवळ दयायाचना करून आपली दैन्यावस्था दूर करण्यास सांगितले जाते.

आणि यांत्रिकी प्रकल्पसुद्धा जमिनीची पूजा, प्रार्थना आणि हवन केल्याशिवाय सुरू होत नाहीत. अशा परिस्थितीत अत्याधुनिक यंत्रसामुग्री बनवणारे (समजा एच. एम. टी. घड्याळे बनवणारे) कामगार समोर देवाचा फोटो लावत असतील तर त्यांना दोष कसा देता येईल?

या सर्व गोष्टीत शक्तीचा अपव्यय झाल्यामुळे आपले स्वत.चे भवितव्य घडविण्यासाठी अविरत कष्ट करण्याची लोकाना इच्छाच होईनाशी झाली आहे.

या देशात कमालीची अगतिकता निर्माण झाली आहे आणि या संकटकाळावर मात करण्यासाठी 'आध्यात्मिक कुबड्या' आर्थिक हानी सोसून शोधल्या जात आहेत. भारतीय समाजाला शाप ठरलेला दैववाद पुन्हा एकदा आपले वर्चस्व गाजवू लागला आहे.

अशा या अगतिकतेचा आणि अंधश्रद्धांचा सामना करण्यासाठी 'शास्त्रीय विचारसरणी' जोपासली पाहिजे असे हा जाहीरनामा सांगतो. 'आपल्या समाजाचे भवितव्यच नव्हे तर अस्तित्वदेखील अशा तऱ्हेची शास्त्रीय दृष्टी जोपासण्यावर अवलंबून आहे.' तर्कसंगतता, चिकित्सावृत्ती आणि उज्ज्वल मानवी भवितव्याबद्दल आत्मविश्वास हे गुण त्याकरता आवश्यक आहेत.

अशा तऱ्हेची वैचारिक क्रांती घडवून आणण्यासाठी विविध पातळींवर राष्ट्रीय चर्चा घडवून आणण्याचा या जाहीरनाम्याच्या लेखकांचा संकल्प आहे.

वाई —डॉ. शरद अभ्यंकर

सेनेमध्ये औद्योगिक बेशिस्तीला अजिबात थारा नाही, असंही साळवी साहेबांनी ठासून सांगितलं...

हे सर्व असलं तरी डॉ. दत्ता सामंताच्या युनियनप्रमाणेच शिवसेना व कामगार सेनेवरही हिंसाचाराचा आरोप केला जातो. १९७२ साली झालेल्या गोदरेज कंपनी प्रकरणातही शिवसेना गुंतली होती, असं विरोधकांचं म्हणणं आहे. त्याबाबतीत स्पष्टीकरण देताना सेनेचे सरचिटणीस दत्ताजी साळवी म्हणाले, 'हिंसाचारावर आमचा विश्वास नाही. आम्ही त्याला प्रोत्साहनही देत नाही. आमच्या कामगारांनी 'भावना अनावर झाल्याने' क्वचित प्रसंगी मारहाणीचे प्रकार केले असतील, पण त्यामागे हिंसक वृत्ती कधीही नसते!'

### कामगारच शोषणकर्ते!

'इंटक' चे नेते भाई भोसले हे एक भेटण्यासारखं व्यक्तिमत्त्व. गिरणी-कामगाराच्या कुटुंबात जन्मलेले व १९४६ साली गिरणीमध्येच कामाला लागलेले भाई आज टेक्सटाइल वर्कर्स आशिया रिजन ऑर्गनायझेशनचे उपाध्यक्षपद भूषवत आहेत, तर टेक्सटाइल्स वर्कर्स वर्ल्ड फेडरेशनच्या कार्यकारी समितीचंही सदस्यत्व त्यांना मिळालं आहे. पुस्तकी शिक्षण फारसं झालेलं नसलं तरी मनुष्य स्वतःच्या बुद्धीच्या व जिद्दीच्या बळावर किती मजल गाठू शकतो, याचं भाई हे आदर्श उदाहरण आहे.

'मुंबई सकाळ' चे वार्ताहर राधाकृष्ण नार्वेकर यांनी भाईंना फोन केला तेव्हा ते नुकतेच दिल्लीहून कुठल्या तरी बैठकीला हजर राहून आले होते. सर्दी–खोकल्याचाही त्रास होत होता; पण तरी त्यांनी संध्याकाळी सातला बोलावलं.

सात-सव्वा सातला भाईंच्या घरी गेलो तेव्हा बाहेरच्या खोलीत अनेक कार्यकर्ते भाईंशी काही तरी चर्चा करत बसले होते. पांच–दहा मिनिटांतच ती मंडळी उठली आणि आमची गप्पांना सुरुवात झाली.

मुंबईतल्या औद्योगिक अशांततेचा विषय काढल्यावर भाई थोडेसे गंभीर झाले. कामगारांच्या समस्या गंभीर आर्थिक परिस्थितीमधून उद्भवल्या आहेत, असं प्रतिपादन करून भाई म्हणाले, 'शासनाने अमलात आणलेल्या कामगारविषयक कायद्यामुळे शांततेच्या मार्गाने प्रश्न सुटू शकतील, अशी अपेक्षा होती; पण न्यायदानामध्ये लागणाऱ्या विलंबामुळे ती फोल ठरली. हळूहळू कामगाराचा आणि पुढाऱ्यांचा या व्यवस्थेवरील विश्वास उडू लागला. काही तरी 'शॉर्ट कटस्' काढून, 'डायरेक्ट मेथड' ने प्रश्न सोडवण्याची वृत्ती वाढू लागली. त्यातूनच औद्योगिक जगतातील हिंसाचाराला प्रोत्साहन मिळालं.

'देशातील आर्थिक परिस्थिती आज अशा धोक्याच्या टप्प्यावर येऊन पोचली आहे की, चीनमध्ये चँग कै शेकची राजवट कोलमडायला आली तेव्हा जी स्थिती होती, तीच आपल्याकडेही निर्माण होईल की काय, अशी भिती वाटू लागली आहे.

'मुंबईतल्या युनियन्समध्ये हल्ली नेतृत्वाची स्पर्धाच लागली आहे. कामगाराच्या जास्तीत जास्त मागण्या कोण पदरात पाडून देऊ शकतो, यावर कामगार संघटनांचं नेतृत्व आणि भवितव्य ठरायला लागलं आहे. कामगारांना नवनव्या मागण्यांची चटक आम्ही पुढारीच लावू लागलो आहोत. वेतनवाढ, महागाई भत्ता, बोनस, इतर नियमित सवलती हे प्रश्न सुटले तरी आणखी काही तरी नवीन मागणी पुढारी मंडळी शोधून काढतातच. मध्यंतरी एका कारखान्यात तर 'Honey-moon Leave' साठी आंदोलन झालं. यामुळे कामगार-चळवळीचं तत्त्वज्ञान मागे पडू लागलं आहे आणि कामगार फक्त Demand-Oriented बनत चालले आहेत. कामगारांची सुरक्षितता व अन्य कल्याणकारी योजनांमध्ये कोणाला फारसा रस वाटेनासा झाला आहे. समाजपरिवर्तनाच्या कार्यात कामगार अग्रदूत असल्याचं आम्ही पुढारी ठासून सांगतो; पण त्या दृष्टीने आमचे प्रयत्न कितपत असतात? तर शून्य!

'हल्लीच्या उद्योगपतींचं धोरणही अनेकदा कामगारांना डिवचणार असतं. कारखान्यात जर दोन युनियन असतील तर हे उद्योगपती मान्यता एका युनियनला देतात आणि संप-काळात वाटाघाटी दुसऱ्या युनियनच्या प्रतिनिधीशी करतात. कंत्राट पद्धतीने कामगार घेण्याचं धोरणही हल्ली अनेक कारखान्यांमध्ये वाढत चाललं आहे. अशा तऱ्हेनं कामगार घेण्यामुळं कारखानदाराचा बराच पैसा वाचतो. तोच पैसा तो इतर कामगारांना वेतनवाढ किंवा भत्ता म्हणून देतो. म्हणजे कामगारच आमच्या कामगार-बंधूचं एक प्रकारे रक्तशोषण करतात आणि आम्ही पुढारी त्याला संप–आंदोलनाद्वारे हातभार लावून मालकाचं पाप झाकत असतो.

'डॉ. दत्ता सामंत हिंसाचाराचा अवलंब करून कंपनीच्या व्यवस्थापनाला वाकवतात, असा आरोप केला जातो; पण औद्योगिक क्षेत्रात हे प्रकार डॉ. सामंत यांचा उदय होण्यापूर्वीही घडत होतेच. आता त्यांचं फक्त प्रमाण वाढलं असेल एवढंच!

'डॉ. सामंत यांना मी जवळून पाहिलं आहे. ते माझे चांगले मित्र आहेत. पूर्वी ते 'इंटक'मध्येच होते. गोदरेज कंपनीमधलं 'इंटक'चे युनिट त्यांच्याकडे होतं. पण 'इंटक'च्या ध्येय-धोरणांशी त्यांचा कधीच संबंध नव्हता. खरं सांगायचं तर डॉ. सामंतांना कोणीच पचवू शकलं नाही.

'अर्थात असे कामगार-नेते फार काळ टिकूही शकत नाहीत. सामंतापूर्वी एके काळी जॉर्ज फर्नांडिस यांचं मुंबईच्या कामगार-क्षेत्रावर वर्चस्व होतं; त्यानंतर आर. जे. मेहता आले; पण आज या दोघांचं कितपत स्थान राहिलं आहे? थोडक्यात सांगायचं तर मुंबईत असे 'कामगार–हिरो' अधूनमधून निर्माण होत असतातच.

मुंबईतल्या गिरणी-कामगाराचं क्षेत्र हे भाईंचं स्वतःचं जग. लहानपणापासून ते तिथेच वाढलेले. १९५८ साली राष्ट्रीय मिल मजदूर संघात प्रवेश केला आणि सात–आठ वर्षांतच भाई संघाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते झाले. संघटनेतील विविध पदंही भूषवली. आपल्या आवडत्या क्षेत्राचं आजचं चित्र मांडताना भाई म्हणाले,

'मुंबईतल्या इतर कामगार संघटनामध्ये दिसणारं' हिंसेचं वाता-

वरण आम्ही गिरणी–कामगारामध्ये येऊ दिलं नव्हतं. दीड वर्षापूर्वी शिवसेनेची गिरणी कामगार सेना या क्षेत्रात उतरली आणि इथंही हिंसक प्रकार होऊ लागले; पण अजूनही इथं हिंसेला फारशी मोकळी वाट मिळाली नाही. मुबईतल्या ५९ गिरण्यामध्ये आज सुमारे सव्वा दोन लाख कामगार आहेत. इथे जर आगडोब उसळला तर मुंबई शिल्लक राहाणारच नाही; पण शासनही या प्रश्नाची गंभीरपणे दखल घेत नाही!'

भाई सुमारे दीड–दोन तास बोलत होते. एकातून एक मुद्दे निघत होते आणि आपल्या अनुभवसमृद्ध बोलण्यातून भाई ते रसाळपणाने मांडत होते. वयानुसार येणारं प्रांजलपणही भाईंच्या बोलण्यात जागोजागी जाणवत होतं.

## अस्थिरता, अनिश्चिततेवर उपाय हवा!

भाईंप्रमाणेच मुंबईच्या कामगार-क्षेत्रात गेली अनेक वर्षं नेतृत्व करणारे आणखी एक प्रसिद्ध कामगार-नेते एस. वाय. कोल्हटकर यांनाही मुंबईत भेटण्याचा प्रयत्न केला. पण त्या वेळी ते दौऱ्यावर होते. त्यामुळे तेरा ऑगस्टला पुण्यात झालेल्या कामगार संघटनाच्या राज्यव्यापी परिषदेसाठी श्री. कोल्हटकर आले असताना त्यांची भेट घेतली.

मुबईच्या कामगार-क्षेत्रात हिंसाचाराचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत, अशी तक्रार आज अनेक ठिकाणी ऐकू येते. त्याबद्दल मत विचारलं असता श्री. कोल्हटकर म्हणाले, 'गेल्या अनेक वर्षांच्या अनुभवावरून हे स्पष्ट झालं आहे की, तुम्ही म्हणता तसे दीर्घ मुदतीचे संप, हिंसक प्रकार मुख्यतः ठाणे–बेलापूर पट्ट्यामध्ये, म्हणजे नव्या औद्योगिक परिसरातच घडतात. मुबईतल्या गिरण्या, गोदी, रेल्वे अशा ठिकाणी हे चित्र दिसणार नाही.

'नव्या औद्योगिक परिसरात अनेक ठिकाणी कामगाराना नियमानुसार वेतन मिळत नाही. कायद्याचंही संरक्षण नाही. कामगारांनी युनियन केली, एवढं एकच कारण काही ठिकाणी मालकाला कंपनीला टाळं ठोकायला पुरतं. न्यायदानाला विलंब लागत असल्याने कामगाराना कायद्याचाही आधार वाटत नाही. या सबंध क्षेत्रात मालक, शासन व पोलीस-यंत्रणा याचं आतून संगनमत असल्यासारखंच वाटतं. त्यामुळे नवीन, तरुण कामगार चिडून उठतात व काही हिंसक प्रकार घडतात.

'कामगाराना महागाईभत्ता दिला जातो, पण हा भत्ता आणि बाजारभाव यांचा अजिबात मेळ बसत नाही. गेल्या वर्षीच्या तुलनेत महागाई दुप्पट झाली असेल तर भत्त्यामध्येही तेवढीच वाढ झाली पाहिजे, ज्यायोगे कामगार वस्तूच्या किंमतीमधील वाढ neutralize करू शकेल. पण तसं काहीही होत नाही. दर दिवसागणिक वाढतच चाललेल्या या महागाईला आपल्या तुटपुंज्या पैशाच्या सहाय्यानं कामगार तोंड देऊ शकत नाही आणि त्यातूनच हिंसेचा डोब उसळतो.

'या सदर्भात शासनाचं धोरणही नोंद घेण्यासारखं आहे. संपबंदीच्या वटहुकुमाचा बडगा आणि पोलिसाची दंडुकेशाही अशा दुहेरी पद्धतीनं शासन कामगारांची अडवणूक करत असतं. पण त्याचबरोबर मालकाला वठणीवर आणण्यासाठी कामगारांना लढवायचं आणि नंतर आपणच पुढाकार घेऊन settlement करून द्यायची असाही शासनाचा उद्योग चालू असतो.

'अत्यावश्यक सेवांमध्ये संपबंदीचा वटहुकुम तर केन्द्र शासनाने केवळ जागतिक बँकेला खूष करण्यासाठी जारी केला आहे, असं माझं स्पष्ट मत आहे.'

डॉ. दत्ता सामंत यांचा या क्षेत्रामध्ये प्रवेश झाल्याने या सर्व परिस्थितीला काही कलाटणी मिळेल का, असं विचारलं तेव्हा श्री. कोल्हटकर म्हणाले, 'डॉ. सामंत हा माझ्या मते temporary phenomenon आहे. गरीब, असंघटित कामगार त्यांना वाटणाऱ्या असुरक्षितता, अस्थिरतेमुळे शॉर्ट कटस्‌चा अवलंब करतात, त्यामुळे डॉ. सामंतांसारख्या नेतृत्वाला वाव मिळतो.

'मला आठवतं, स्वातंत्र्यानंतर थोड्याच काळात मुंबईत आबिद-अली जाफरभाई नावाचा कामगारपुढारी फार दबदबा ठेवून होता. त्यांच्याकडे त्या वेळच्या मुंबईतल्या साठ युनियन होत्या. पण आज तो कुठे आहे? Nobody knows!

'आज अशा प्रकारच्या नेतृत्वाला संधी मिळते कारण डाव्या राजकीय पक्षांची ताकद कमी झाली आहे. त्यामुळे ट्रेड युनियनही दुबळ्या बनल्या आहेत. अर्थात ही परिस्थिती कायम राहात नसते. चळवळीतल्या चढ–उताराचा तो एक भाग आहे.'

¤

मुबईला जाण्यापूर्वी पुण्यातले स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडिया या संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते लता भिसे व रमण देशपांडे यांच्याशी थोडी चर्चा केली होती. लता भिसेने एकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे दोन अंकही दिले. या अंकामध्ये श्री. संदीप पेंडसे यांनी 'The Datta Samant Phenomenon' या शीर्षकाखाली दोन लेख लिहिले आहेत. त्यापैकी पहिल्या लेखात डॉ. सामंतांचा उदय होण्यास परिस्थिती कशी अनुकूल बनली होती, याचं विश्लेषण करताना श्री. पेंडसे म्हणतात,

'१९७७ साली जनता पक्ष सत्तेवर आल्यावर सर्वांनाच हायसं वाटलं. त्यातही मध्यम वर्गीयांना अधिक आशादायक जीवन निर्माण झालं, तर इतर सर्व वर्ग असुरक्षितता, अनिश्चिततेच्या भावनेनं ग्रासले गेले. यामध्ये उद्योगपतींचाही समावेश होता.

'जनता पक्ष राजकीयदृष्ट्या तेव्हा लोकप्रिय असेल पण कामगार क्षेत्रात या पक्षाचा कुठेही मजबूत पाया नव्हता, ट्रेड युनियनचं नेतृत्व नव्हतं. परंपरागत कामगार संघटना आणि नेतृत्वाचंही तेज लोपलं होतं. पण याच वेळी औद्योगिक क्षेत्रातील संप-टाळेबंदीला मात्र उधाण आलं होतं. शांततेसाठी ख्यातनाम असणाऱ्या कंपन्यासुद्धा जबरदस्त संघर्षाच्या खाईत लोटल्या गेल्या होत्या. अशा वेळी संप–सत्याग्रहांचा फारसा अनुभव नसलेले, नेतृत्वाचा इतिहास नसलेले, तरुण, कुशल, डाव्या राजकारणाची परंपरा नसलेले कामगार पुढे आले व त्यानी संपाचं नेतृत्व आपल्या हाती घेतलं. साहजिकच या काळातील कामगाराच्या लढ्याचे आणि भावनांचे डॉ. सामंत हे प्रातिनिधिक प्रवक्ते बनले. कामगार वर्गाजवळ लढा देण्यासाठी लागणारा आत्मविश्वास होता, पण त्या अस्थिर, अनिश्चित वातावरणात यशस्वी लढा देण्याचं हत्यार त्यांच्यापाशी नव्हतं. डॉ. सामंतानी त्यांना ते दिलं आणि ते कामगारांचे सच्चे प्रतिनिधी बनले.

२५ मार्च १९७७ ते ३१ डिसेंबर १९७७ या काळात ठाणे–बेलापूर भागातील १४० कंपन्यामध्ये संप चालू होते. त्यापैकी निम्म्याहून जास्त कंपन्यांचं नेतृत्व डॉ. सामंत करत होते. त्या वर्षी डॉ. सामंत याच्या युनियनने केलेल्या संपांमुळे १४ लाख दहा हजार Man-days वाया गेले व ६६ कोटी ५४ लाख रुपयांचं उत्पादन बुडालं. यापूर्वी कोणत्याही कामगार-नेत्यानं एवढं प्रभावी प्रतिनिधित्व केलं नव्हतं. '

पहिल्या लेखात डॉ. सामंत यांचा उदय कोणत्या परिस्थितीत झाला याविषयी चिकित्सा केल्यानंतर दुसऱ्या लेखात श्री. पेंडसे म्हणतात–

' दत्ता सामंत यांची कार्यपद्धती लक्षात घेता त्यांना ' ट्रेड युनियनिस्ट ' म्हणणे योग्य ठरणार नाही. ते फक्त संघर्ष निर्माण झाल्यास आंदोलन पुढे रेटत असतात. कामगारांना संघटित करण्यापेक्षा केवळ लढ्यासाठी उभं करण्याचं काम डॉ. सामंत करतात. संघटनेच्या दैनंदिन कामकाजात ते फारसं लक्ष घालत नाहीत. संप किंवा टाळेबंदी झाली तरच ते कामगारांचं पुढारीपण करतात. त्यांची युनियन पद्धतशीर, संघटित रचनेवर उभी नाही. लढ्याचे कोणतेही दंडक इथे ठरलेले नाहीत. कामगारांना संप-काळात आलेल्या अनुभवाच्या साह्याने त्यांचं राजकीय शिक्षण करण्याचा प्रयत्नही डॉ. सामंत करत नाहीत. ते सतत आक्रमण करण्याच्याच तयारीमध्ये असतात. कामगारांना हवा असलेला आणि कामगारांनीच सुरू केलेला लढा ते चालवत असतात. त्यामुळे विशिष्ट काळात निर्माण झालेले दंडक मोडून काढण्यासाठी झालेल्या उद्रेकांमधून डॉ. सामंतांचा उदय झाला आहे; पण अन्य परिस्थितीत कामगार-लढ्याच्या दृष्टीने ते डोकेदुखीच बनण्याची शक्यता आहे. '

¤

गेल्या अंकामध्ये ( माणूस–२९ ऑगस्ट ) प्रसिद्ध झालेल्या डॉ. सामंत यांच्या समर्थकांच्या मुलाखती, मुंबईतल्या अन्य अनुभवी कामगार-नेत्यांच्या वर दिलेल्या मुलाखती, तसंच श्री. पेंडसे यांचे लेख यामधून मुंबईतील सध्याच्या औद्योगिक विश्वाचं बऱ्याच अंशी सम्यक दर्शन घडतं. या सबंध परिस्थितीचा विचार करताना डॉ. दत्ता सामंत यांचा संदर्भ वारंवार येतो. येणं अपरिहार्यही आहे. कारण डॉ. सामंतांनी अतिशय थोड्या अवधीत अनेक मातब्बर कामगार-संघटना व कामगार-नेत्यांना मागे टाकून आघाडी मिळवली आहे.

या सर्व चर्चेमधून काही मुद्यावर निश्चितच चांगला प्रकाश पडतो. त्यापैकी डॉ. सामंतांच्या भवितव्याचा विचार करताना बहुतेक अनुभवी नेत्यांनी, हे फार काळ टिकणारं नेतृत्व नाही, असं म्हटलं आहे कदाचित ही भविष्यवाणी डॉ. सामंतांपुरती खरीही ठरेल; पण प्रश्न तो नाही. खरा सवाल असा आहे की, डॉ. सामंत पद्धतीच्या नेतृत्वाचं भवितव्य काय ?

ही ' सामंत-पद्धती ' (A New Phenomenon ?) नेमकी काय आहे ? अनेकांनी वारंवार उल्लेखिलेली त्यांची ' Direct Method ' कशा तऱ्हेने वापरली जाते ?

संप फार काळ चालल्यास जशी कामगारांची दमणूक होत असते तशीच व्यवस्थापनाचीही होऊ शकते, त्यांचे अनेक हितसंबंध उत्पादन जास्त काळ बंद राहिल्यास दुखावले जाऊ शकतात, तसेच बाजारातील त्यांची पतही कमी होते. थोडक्यात, कामगार आणि व्यवस्थापन यांपैकी कोण आधी दमतं, यावरच संघर्षाचा निकाल बहुतेक वेळा अवलंबून असतो. डॉ. सामंतांनी हे ओळखलं आहे. म्हणूनच ते कामगारांची ' sustaining power ' वाढवायचा व त्यायोगे व्यवस्थापनाला दमवण्याचा, वाकवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे ' दीर्घ मुदतीचे लढे ' हे डॉ. सामंतांच्या नेतृत्वाखालील संपाचं बहुतेकवेळा अविभाज्य अंग बनलं आहे.

डॉ. सामंतांच्या आंदोलन–तंत्राचं विश्लेषण करताना असं म्हटलं जातं की, या दीर्घ मुदतीच्या लढ्यांना ते हिंसाचाराची जोड देतात व त्याद्वारे व्यवस्थापकावर दडपण आणून कैचीमध्ये पकडतात. आता कामगार क्षेत्रातील हिंसाचार, हा तसा नाजुक भाग आहे. वर दिलेल्या मुलाखतीपैकी एकाही कामगार नेत्याने हिंसाचाराचे समर्थन तर केलेलं नाहीच, पण एकाही हिंसक घटनेमध्ये आपली संघटना गुंतली नसल्याचं ठासून सांगितलं. यातली अतिशयोक्ती सोडून देऊन विचार केला तर असं लक्षात येतं की, कामगार संघटनांनी वेळोवेळी हिंसाचाराचा अवलंब केला आहे. काही वेळा तो उघड-उघड पुढाऱ्यांच्या आदेशावरून झाला असेल, काही वेळा तत्कालीन परिस्थिती त्याला कारणीभूत ठरली असेल, तर काही वेळा अनेक दिवस संप चालवूनही पदरात काहीही पडत नसल्याचे जाणवल्यामुळे कामगारांनी निराश होऊन स्वतःच कायदा हातात घेतला असेल. अलिकडल्या काळात तर कारखान्यांचे व्यवस्थापन व शासनही या मार्गाचा छुपा किंवा उघड अवलंब करत असतं कामगारांवर लादलेल्या टाळेबंदीचं समर्थन करण्यासाठी काही वेळा व्यवस्थापनच कारखान्यात ' कृत्रिम नासधूस ' घडवून आणतं, तर काही वेळा संपावरील कामगारांमध्ये फूट पाडण्यासाठी या मार्गाचा अवलंब व्यवस्थापनाकडून केला जातो. पोलिसांची दंडुकेशाही हेही कधी व्यवस्थापनाने, तर कधी शासनाने वापरलेलं हिंसाचाराचं 'अधिकृत' व 'प्रतिष्ठित' स्वरूप असतं; पण ह्या मागील हेतू सहज लक्षात येऊ शकतात.

राजकीय पक्षाच्या कामगार संघटनांमुळे या हिंसाचाराला एक निराळाच पैलू प्राप्त झाला आहे सत्तेवर असलेला पक्ष आपल्या हातात सत्ता असेपर्यंत पक्षाच्या कामगार संघटनेचीही व्याप्ती अधिकाधिक वाढवण्याचा प्रयत्न करत असतो. कारण सत्ता गेल्यावर कोणत्या परिस्थितीला तोंड द्यावं लागेल, याची त्यांना कल्पना असते तसंच त्या काळात विरोधी पक्ष म्हणून काम करताना कामगार क्षेत्रातील संघटन आपल्याला विविध प्रकारे वापरता येईल, अशी ' दूरदृष्टि 'ही यामध्ये असते. हे जाळं पसरवण्यासाठी आणि जास्तीत जास्त मजबूत पाया करण्यासाठी सत्तेच्या दुरुपयोगाबरोबरच साम-दाम-दंड-भेद या तत्त्वानुसार कामगार क्षेत्रात हिंसा घडवून आणली जाते आणि एखादा वटहुकम जारी करण्यासाठी किंवा आपलं अपयश झाकण्यासाठी या हिंसेचं खापर विरोधकांवर फोडलं जातं. मुंबईच्या औद्योगिक क्षेत्रात आज दिसणाऱ्या हिंसाचारामागे असे विविध घटक दडलेले असतात, जे सामान्य माणसाच्या क्वचितच लक्षात येतात !

या सर्व घडामोडीकडे पाहण्याचा कामगारांचा दृष्टिकोन काय

असतो ? गेल्या सात-आठ वर्षांत निर्माण झालेल्या कामगार-पुढाऱ्यांचा त्यामध्ये काय role आहे ? औद्योगिक क्षेत्रातील बहुतेक सर्व लढे आर्थिक मुद्यावर उभे राहतात. संपावर गेल्याने आपली सध्याची वेतनचिठ्ठी बदलणार आहे, असं कामगाराला वाटत असेल तरच हे लढे उभे राहतात, टिकतात, काही वेळा काही प्रमाणात यशस्वीही होतात. कामगारांचं हे मानसशास्त्र लक्षात घेऊनच कामगार-नेते लढ्याचं नेतृत्व करत असतात. कामगारांना निव्वळ आर्थिक लाभाचं गाजर दाखवूनच ते यशस्वी केले जातात.

यामुळे आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, कोणत्या पुढाऱ्यामागे गेल्याने आपल्याला कमीत कमी श्रमात जास्तीत जास्त आर्थिक लाभ होणार आहे, याचा हिशेब करूनच कामगार एखादं नेतृत्व स्वीकारतो किंवा झिडकारतो. थोडक्यात, कामगार–चळवळीचं आज दिसणारं चित्र असं आहे–कामगार पुढारी आपापल्या संघटनांची दुकानं मांडून बसलं आहेत; त्यामध्ये विविध आकर्षक मागण्यांचे फलक ठेवलेले आहेत ! यशस्वी नेतृत्वाची हमीही दिलेली आहे. 'तुम्ही आमचं नेतृत्व स्वीकारलं तर या मागण्या तुमच्याही असू शकतील व तुमच्याही पदरात पडू शकतील,' असं काही तरी आवाहनही त्या ठिकाणी केलेलं आहे. एखाद्या भोळ्या गिऱ्हाईकाप्रमाणे कामगार या दुकानांसमोर घुटमळतो. कुठे तरी आत शिरतो. सौदा पटला तर तिथलं नेतृत्व विकत घेतो. नाही पटलं तर बाहेर येतो. पुन्हा पुढच्या दुकानाकडे आशाळभूतपणाने चालू लागतो दुकानात घुटमळण्याचा काळ कमी–जास्त असतो. पण घुटमळणं चालूच राहतं. गिऱ्हाईकाच्या अन्य गरजांविषयी दुकानदाराला घेणं नसतं, गिऱ्हाईकाचाही दृष्टिकोन यापेक्षा निराळा नसतो. उद्योगपती कामगारांची कंत्राट पद्धतीने भरती करतात, म्हणून आंदोलन पुकारणाऱ्या कामगार व त्यांच्या पुढाऱ्यांचा हा सर्व व्यवहार मात्र त्याच कंत्राट पद्धतीने होत असतो. डॉ. सामंत आणि त्यांच्यासारख्या कामगार-नेत्यांनी हे मर्म नेमकं ओळखलं आहे व म्हणूनच ते यशस्वी होत आहेत. यातूनच नव्या 'अर्थवादा' वर आधारलेलं कामगार–चळवळीचं तत्त्वज्ञान आकार घेत आहे.

डॉ. सामंताविषयी बोलताना इतर कामगार–नेत्यांनी, हे नेतृत्व फार काळ टिकणारं नाही, अशी ग्वाही दिली, त्याला आपल्या अनुभवांची पुस्तीही जोडली. पण सामंतांनंतर कोणत्या प्रकारचं नेतृत्व येणार आहे ? कामगार चळवळीमागील तत्त्वज्ञान लक्षात घेऊन कामगारांना आर्थिक मागण्यांबरोबरच त्यांच्या इतर हक्क व कर्तव्यांविषयी सदैव जागरूक ठेवणारं, डाव्या चळवळींना अभिप्रेत असणाऱ्या सामाजिक व आर्थिक क्रांतीचं अग्रदूतत्व पेलण्याचं सामर्थ्य आणि आत्मविश्वास त्यांच्यामध्ये फुंकणारं नेतृत्व इथे निर्माण होऊ शकेल का ? नजिकच्या भविष्यकाळात मला तरी ती आशा वाटत नाही. इथले अभिनेते बदलतील, पण प्रयोग मात्र बदलणार नाही. प्रस्थापित वर्गामध्ये लवकरात लवकर सहभागी होण्याची आकांक्षा बाळगणारे कामगार या प्रयोगाला साथ देतच राहतील आणि कधी हा प्रयोग जर बदललाच तर इथलं नेतृत्वही त्या बदलाबरोबरच अस्तंगत झालेलं असेल ! □

---

# प्रभु अजि गमला—

बबन प्रभू,
मुंबई
दि. २७–८–१९८१

प्रिय आकाशातील–आपलं, आकाशातील प्रिय बापा,

सखेद, सशोक नमस्कार.

तुझे पत्र मिळाले आणि स्वर्गातील पुण्यात्म्येही अखेर 'विनोद' नावाचा प्रकार आवडण्याइतके टवाळ झालेले पाहून अतिशय आनंद वाटला. स्वर्गामध्ये तुमच्या वार्षिक गॅदरिंगनिमित्त प्रथमच फार्स बसवायचा आहे हे ठीक; पण त्यासाठी लेखक–दिग्दर्शक म्हणून तू माझीच निवड करावीस, याचे अतीव दुःख झाले. (म्हणूनच सुरुवातीला तुला स. स. नमस्कार.) अन्य चावट आणि उर्मट नाट्यसंस्थांप्रमाणे मी नाटकाची परवानगी तुला नाकारू शकत नाही की तुझ्याकडून काही रॉयल्टीही मागू शकत नाही. शिवाय माझ्या नाटकांमध्ये वापरलेल्या वेषांतराच्या यशस्वी युक्त्या वापरून तुझ्याकडे मी दुसऱ्या कोणालाही पाठवू शकत नाही. सबब नाइलाजाने तुझे निमंत्रण स्वीकारून मी येत आहे. मात्र काही गोष्टींची स्पष्ट जाणीव तुला आधीच देऊन ठेवतो.

फार्स म्हणजे दोन-चार वेड्यावाकड्या उड्या मारून हशा व टाळ्या मिळविण्यासाठी केलेले अंगमेहनतीचे खेळ असा जर तुझा गैरसमज असेल तर तो संपूर्ण चुकीचा आहे. अत्यंत उन्मुक्त आविष्कारातून वास्तव आणि कल्पना यांच्या धूसर सीमारेषेवर आटयापाट्या खेळणारी ही एक अवघड कलाकृती आहे. माझ्यासारख्या माणसाला तिची नस सापडली तर स्वर्गातील देवांना ती पकडणे कितीसे अवघड असणार, असा जर तुझा होरा असेल तर तो नक्कीच चुकेल. दुसरी गोष्ट स्वर्गातील देवांना कदाचित चावटपणाबद्दल काही वाटणार नाही. (त्यांचे पुराणातील काही चाळे नुसते वाचूनसुद्धा आम्हाला शरमल्यासारखे होते.) पण माझ्या नाटकातील वात्रट चावटपणाला किंवा चावट वात्रटपणाला जर अन्य सज्जन, तापसी पुण्यात्म्यांनी नाके मुरडली, आक्षेप घेतला तर स्वर्गातील अप्सराकरवी त्याचा तपोभंग की काय म्हणतात तो करण्याचा पक्का बंदोबस्त तू ठेवायला हवास.

तुझ्या पत्रात तू आणखी एक तपशील कळवलेला नाहीस. तुला माझ्या यापूर्वीच्या 'झोपी गेलेला जागा झाला', 'दिनूच्या सासूबाई राधाबाई', 'घोळात घोळ' इत्यादि फार्सपैकीच एखादा बसवायचा आहे की नवीन लिहून हवाय ? जर तू जुन्याचीच निवड करणार असशील तर त्यात भूतलावर मी करीत असलेल्या भूमिका मीच करणार ! कारण त्या माझ्या इतक्या कौशल्याने अन्य माणसांनाही जमत नाहीत तर देवांचा काय पाड ? जर तुला नवीन फार्स लिहून हवा असेल तर छान छान विदेशी फार्सची पुस्तके माझ्यासाठी आगाऊ घेऊन ठेव ! कारण माझे याआधीचे फार्स रूपांतरित होते. तसाच तोही असणार.

स्वर्गातील देवांना ही फार्सची कला समजावून देण्यासाठी मला येथील रंगमंचावरून एक्झिट घ्यावी लागत आहे. त्याबद्दल माझ्यावर, माझ्या कलेवर प्रेमाचा आणि कौतुकाचा अमाप वर्षाव करणाऱ्या, मला 'फार्सचा अनभिषिक्त बादशहा' असा किताब देणाऱ्या असंख्य नाट्यरसिकांचा निरोप घेऊन आणि त्यांच्यापाशी दिलगिरी व्यक्त करून मी तुझ्या निमंत्रणाचा स्वीकार करतो.

तुझा लेखक–दिग्दर्शक
–बबन प्रभू

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

## नव्याने पक्षबांधणी

पृष्ठ ३ वरून

रेड्डी कॉंग्रेस म्हणून ओळखली जाऊ लागली. रेड्डीच्यानंतर स्वर्णसिंग व देवराज अर्स या पक्षाचे अध्यक्ष झाले व आता शरद पवारांकडे सूत्रे आली आहेत. या चार अध्यक्षांपैकी रेड्डी व स्वर्णसिंग इंदिरा कॉंग्रेसला मिळाले. अर्स इंदिरा कॉंग्रेसमधून आले व पुन: इंदिरा कॉंग्रेसकडे ते जाणार असल्याचे बोलले जाते. आपण इंदिरा कॉंग्रेसमध्ये जाणार नाही असे पवारानी कितीही जाहीर केले असले तरी यशवंतराव चव्हाणांशी असलेले त्यांचे गुरु-शिष्याचे नाते त्याना नडणार असे दिसते. त्यांचे विरोधक त्यांच्याविरुद्ध प्रचारासाठी या नात्याचा उपयोग करीत आहेत. आमचे राजकीय मार्ग निराळे झाले आहेत असे या दोन नेत्यांनी स्पष्टपणे सांगितल्यावर वास्तविक त्यावर विश्वास ठेवायला हवा; पण पवारविरोधी प्रचारासाठी त्यांचे विरोधक अजूनही या जुन्या संबंधाचा उपयोग करून घेत आहेत. हंगामी अध्यक्षपदी त्यांची निवड कार्यकारिणीने केली असली तरी त्यांच्या अध्यक्षपदाला पक्षातून उघडपणे विरोधही व्यक्त होऊ लागला आहे. काश्मीरचे आमदार श्री. भीमसिंग यांनी शुक्रवारी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन पवाराचे नेतृत्व नाकारले. पवार यशवंतराव चव्हाणांचे मानसपुत्र असून त्यांनाही इंदिरा कॉंग्रेसमध्ये जावयाचे आहे; पण जाण्यापूर्वी सौदेबाजीत स्वत:ची किंमत वाढावी म्हणून खटपटी-लटपटी करून त्यांनी अध्यक्षपद मिळविले आहे. पवार पक्षाला जीवदान तर देणार नाहीतच; पण एक दिवस पक्ष इंदिरा गांधींच्या दारात नेऊन बांधतील अशी टीका भीमसिंग यांनी केली. आठ-प्रदेशअध्यक्ष आपल्याशी सहमत असल्याचा दावाही त्यांनी केला, अशी बातमी तरुण भारतच्या विशेष प्रतिनिधीने दिलेली आहे. इतर कोठे ती आलेली नसली तरी पवारांना पक्षातर्गत विरोध असल्याचे ते निदर्शक आहे.

पवारांच्या पक्षाचे महाराष्ट्रातील बहुसंख्य आमदार यापूर्वीच इंदिरा कॉंग्रेसमध्ये गेले आहेत. कर्नाटकचे प्रदेशअध्यक्ष चंद्रगौडा यांनी इंदिरा कॉंग्रेस-प्रवेशाचा विचार करण्यासाठी पक्ष-कार्यकर्त्यांची बैठक रविवारी बोलावली. पवारांनी त्यांच्याविरुद्ध शिस्तभंग कारवाई करून त्यांचे पक्ष-सभासदत्वच रद्द केले. अर्थात अशा कारवाईने पक्षांतर टळेल असे नाही. अर्स हे थांबवू शकले नाहीत तर त्यांचे कर्नाटक शाखेवर काहीच वजन नाही असा त्याचा अर्थ होईल.

एकूण परिस्थिती फार प्रतिकूल व बिकट आहे. यशवंतराव चव्हाणांना अजून दाराशी तिष्ठत ठेवले असले तरी त्यांचा गट इंदिरा-कॉंग्रेसमध्ये गेला. जगजीवनरामांचे गटाने वेगळा मेळावा भरवून तो पक्षाबाहेर पडला. कर्नाटकातील बहुसंख्य कार्यकर्त्यांचा इंदिरा कांग्रेसप्रवेश थोपविता येईल असे वाटत नाही. गुजराथमधील अर्स कॉंग्रेसची शाखा तर विसर्जित करण्यात आली आहे. गेल्या तीस वर्षांत कणा नसलेला पक्ष अशीच या पक्षाची प्रतिमा जनमनात उभी राहिलेली आहे. अशा या सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीतून पक्षाची नव्याने बांधणी पवारांना करावयाची आहे.

आपला पक्ष काय, कोणताच विरोधी पक्ष स्वत:च्या बळावर इंदिरा कॉंग्रेसच्या एकाधिकारशाही कार्यपद्धतीस विरोध करण्या-इतका प्रभावी नाही याची पवारांना जाणीव आहे. अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर दिलेल्या मुलाखतीतून व भाषणातून पक्षाची जी भूमिका त्यांना विशद केली त्यावरून डाव्या पक्षांशी सहकार्यास ते तयार आहेत. वाढती महागाई आणि अन्य प्रश्नासाठी सर्व लोकशाहीवादी व डाव्या पक्षांशी आपला पक्ष सहकार्य करील असे त्यांनी सांगितले. कार्यकारिणीच्या ठरावात मार्क्सवादी व कम्युनिस्ट पक्षांशी सहकार्याचा उल्लेख नव्हता. त्याबाबत ते म्हणाले, ' काही विशिष्ट प्रश्नावर कम्युनिस्ट व मार्क्सवादी यांच्याशीही आम्ही सहकार्य करू. काल कार्यकारिणीत या संदर्भात झालेला ठराव चुकीचा आहे कम्युनिस्टांबरोबरच लोकदल, जनता लोकशाही समाजवादी पक्ष, भारतीय जनता पक्ष यांच्याशी राष्ट्रीय प्रश्नावर आम्ही सहकार्य करू ' भाजप 'ला पवारानी अस्पृश्य मानलेले नाही हे या संदर्भात महत्त्वाचे आहे. शेतमालाच्या किंमती, बेकारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, वाढती महागाई या विरुद्ध आम्ही जन-आंदोलन उभारू असे त्यांनी सांगितले.

भ्रष्टाचाराचा त्यांनी उल्लेख केलेला नसला तरी तो प्रश्नही ते हाती घेत आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अंतुले निरनिराळ्या निधीसाठी ज्या पद्धतीने देणग्या घेत आहेत त्या विरुद्ध ते मोहीम करणार आहेत. सहकारी साखरकारखान्यांनी इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठानसाठी शेतकऱ्यांकडून टनामागे दोन रुपये त्यांच्या संमतीशिवाय कापून घेतले व अशा रीतीने चार कोटी रुपये जमवून तो निधी इंदिरा प्रतिष्ठानसाठी देण्यात आला. निधीसाठी शेतकऱ्यांकडून त्यांच्या संमतीशिवाय पैसे कापून घेण्याचा कोणालाही अधिकार नाही. आपण या प्रकरणी न्यायालयात जाणार आहोत असे पवारांनी सांगितले. ते ह्या प्रश्न धसास लावणार आहेत.

आज आवश्यकता आहे ती सर्व विरोधी पक्षांनी जनतेच्या दैनंदिन प्रश्नावर सहकार्याने एकत्रित लढा देण्याची. एकेकट्या पक्षाने असे लढे उभारणे परिणामकारक ठरणार नाही. जनता पक्षाचा फसलेला प्रयोग पुन: नको; पण विरोधी पक्षांनी एकेकटेपणाने न लढता इंदिरा सरकारच्या एकाधिकारशाही कार्यपद्धतीविरुद्ध एकजुटीने लढा दिला पाहिजे. पवारांनी आपला पक्ष अशा संयुक्त लढ्यात आणला पाहिजे !

महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद मिळत असेल तर इंदिरा कॉंग्रेसमध्ये जाण्याची पवारांची तयारी होती. पेट्रोल व रसायनमंत्री प्रकाशचंद्र शेठी यांच्यामार्फत ही इच्छा त्यांनी व्यक्त केली होती असे इंदिरा कॉंग्रेसचे एक सरचिटणीस कल्पनाथ राय यांनी बंगलोर-मध्ये सांगितले. महत्त्वाचे पद मिळत असेल तर पवार अजूनही इंदिरा कॉंग्रेसमध्ये जातील असे त्यांना सूचित करायचे आहे. सत्तेच्या राजकारणामागे न लागता जनतेच्या प्रश्नासाठी लढणारा नेता अशी प्रतिमा पवार आपल्याबद्दल कितपत उभारू शकतील ? सत्तेपासून फार काळ ते दूर राहिलेले नाहीत. त्याच्या उद्देशाबद्दल शंका व्यक्त केल्या जात असता ही भूमिका वठविणे त्यांना कठीण जाणार आहे. □